

# योग्य काम करणे

## आचार संहिता

Johnson Matthey
Inspiring science, enhancing life

## आपली संहिता

जॉन्सन मॅथेबरोबर तुमच्या कार्यामध्ये लागू होणारी तत्त्वे, मानके आणि जॉन्सन मॅथेची धोरणे शोधणे आणि समजून घेणे यात आमचा कोड तुम्हाला मदत करेल.

याची चार विभागात विभागणी करण्यात आली आहे: **लोक**, **बाजारपेठ**, **कंपनी** आणि पृथ्वी.

संपूर्ण संहितेत तुमच्या विषयानुसार, मदतीसाठी कुणाकडे जावे याबद्दल तुम्हाला माहिती मिळेल.


तुम्ही यातील मजकुराशी नीट परिचय करून घ्या.

जॉन्सन मॅथेमधील तुमच्या भूमिकेशी संबंधित विषयांचा जाणीवपूर्वक विचार करा आणि जर तुम्हाला अधिक मार्गदर्शनाची गरज असेल तर मदत घ्या. पान 88 वर तुम्हाला सहयोगी धोरणे आणि मानके यांची यादी मिळेल.

जर तुमचे काही सर्वसाधारण प्रश्न असतील, किंवा तुम्हाला एखाद्या विषयासंबंधी **काही सांगायचे असेल**, तर कृपया अधिक माहितीसाठी पान 10 पाहा.

### आपली संहिता ऑनलाइन

वाचण्यासाठी भेट द्या
**ethics.johnsonmatthey.com**



### आपली बांधिलकी

आपली बांधिलकी आपल्या संहितेमध्ये बांधिलकीची सहा विधानवाक्ये आहेत जी आमच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेचे मार्गदर्शन करतात ज्याने आपण योग्य काम करीत आहोत याची खात्री होते:

- संहितेतील तत्त्वे समजून घेऊन त्यानुसार वर्तन करेन
- मला समस्या असल्यास मी मदत मागेन आणि **त्याबद्दल बोलेन**
- सुरक्षितपणे आपले काम करेन आणि इतरांच्या अधिकारांचा सन्मान करेन
- व्यवसायाचे काम जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि कायदेशीरपणे करेन
- जॉन्सन मॅथेचा ब्रँड, संपदा आणि प्रतिष्ठा यांचे संरक्षण करेन
- जॉन्सन मॅथेच्या दीर्घकालीन व्यवसाय निर्माण करण्याच्या महत्वाकांक्षेला आधार देईन

## प्रस्तावना

संहितेतील तत्त्वांना समजून घेण्याचे आणि त्यांचे अनुसरण करण्याचे मी वचन देत आहे.

| | |
|---|---|
| आपल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा संदेश | 2 |
| आपल्या संहितेला संदर्भासकट पाहाणे | 4 |
| योग्य काम करणे | 6 |
| एखादी व्यक्ती एखादी चूक का करेल? | 8 |
| योग्य निर्णय घेणे | 9 |
| मदत मागणे आणि **विचार व्यक्त करणे** | 10 |
| मी वचन देतो/देते की: | 13 |

## लोक

| | |
|---|---|
| मी सुरक्षितपणे काम करण्याचे आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करण्याचे वचन देत आहे. | 16 |
| आरोग्य आणि सुरक्षा | 18 |
| कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण | 21 |
| डेटा सुरक्षा | 24 |
| मानवाधिकार | 26 |
| हिताचा संघर्ष | 29 |

## बाजारपेठ

| | |
|---|---|
| मी जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि कायदेशीरपणे व्यवसाय करण्याचे वचन देतो | 32 |
| तृतीय पक्ष | 34 |
| लाच आणि भ्रष्टाचार | 37 |
| भेटवस्तू आणि आदरातिथ्य | 40 |
| प्रामाणिक स्पर्धा | 43 |
| आर्थिक गुन्हा | 46 |
| व्यापार आणि निर्यात नियंत्रणे | 49 |
| देवघेवीसाठी धोक्याचे इशारे | 52 |

## कंपनी

| | |
|---|---|
| मी जॉन्सन मॅथेचा ब्रँड, संपदा आणि प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्याचे वचन देत आहे | 54 |
| कॉर्पोरेट सुरक्षा | 56 |
| माहिती सुरक्षा | 59 |
| बौद्धिक संपदा | 62 |
| व्यावसायिक आणि आर्थिक अहवाल सादर करणे | 64 |
| रेकॉर्ड्सची अचूकता | 66 |
| बाहेरून संपर्क साधणे | 68 |
| सामाजिक माध्यमे | 71 |
| अंतर्गत माहिती | 73 |

## पृथ्वी

| | |
|---|---|
| मी जॉन्सन मॅथेच्या दीर्घकालीन व्यवसाय करण्याच्या महत्वाकांक्षेला पाठींबा देण्याचे वचन देत आहे. | 76 |
| पुरवठा-साखळीची अखंडता | 78 |
| पर्यावरण | 81 |
| उत्पाद प्रबंधन | 83 |
| सामाजिक गुंतवणूक | 85 |

# आपल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा संदेश



" आपल्या सर्वांनी नैतिकतेने वागण्यासाठी आणि आपल्या दैनंदिन कामात चांगले निर्णय घेण्यासाठी जबाबदारी घेणे आवश्यक आहे. "

आचारसंहितेमध्ये आपले स्वागत आहे, जे JM येथे योग्य गोष्टी करण्यासाठी आमचे मार्गदर्शक आहे.

आमच्या व्यवसायात, आम्ही योग्य त्या गोष्ट करण्याबद्दल बरेच काही बोलतो आणि त्याचे कारण असे आहे कि आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीला आधार त्याचा आधार असतो. कामाच्या ठिकाणी आपण एकमेकांशी कसा संवाद साधतो, ग्राहक, पुरवठादार आणि इतर तृतीय पक्षांसोबत आपण व्यवसाय कसा करतो इथपर्यंत, आपण ज्या प्रकारे वागतो ते नैतिक आणि आपल्या मूल्यांशी सुसंगत असले पाहिजे. हे बोलायला सोपे आहे, परंतु जीवनात उद्भवणाऱ्या दैनंदिन दबावांना तोंड देताना ते जगण्यात आम्हाला मदत करण्यासाठी संहिता येथे आहे.

आपल्या दैनंदिन कामात नैतिकतेने वागण्यासाठी आणि चांगले निर्णय घेण्यासाठी आपण सर्वांनी जबाबदारी घेणे आवश्यक आहे. कृपया संहितेशी परिचित होण्यासाठी वेळ काढा आणि आणि योग्य गोष्ट करण्याची तुमची वैयक्तिक जबाबदारी तुम्हाला समजते याची खात्री करा. आपल्याला त्याची आवश्यकता असल्यास मदतीसाठी नेहमी विचारा.  तुम्हाला योग्य वाटत नसलेली एखादी गोष्ट तुम्ही कधी पाहिली किंवा ऐकली तर कृपया बोला. आपण जितक्या लवकर काही बोलतो तितक्या लवकर काहीतरी वाईट घडू नये म्हणून आपण कारवाई करू शकतो.

आपण कुठेही जरी असलो तरी दररोज JM च्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यात आपली सर्वांची भूमिका आहे. योग्य गोष्टी करण्यात तुम्ही तुमची भूमिका बजावत आहात हे सुनिश्चित करण्यासाठी कृपया तुमच्या कामात वारंवार संहितेचा संदर्भ घ्या.

**Liam Condon,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

# संदर्भामध्ये आपला कोड टाकणे

कंपनीच्या स्वरुपात आपण कसे वागतो आणि कसे काम करतो याला फार महत्व आहे.

जॉन्सन मॅथेची कार्यपद्धती हेच कंपनीचे व्यक्तिमत्व आहे – आम्ही इकडे कशा प्रकारे काम करतो आणि आमच्यासाठी काय महत्वाचे आहे. आपल्या मूल्यांतून दिसून येते की आपण आपल्या कार्यपद्धतीचे वर्णन कसे करतो आणि त्याप्रमाणे कसे जगतो. जॉन्सन मॅथेची पाच मूल्ये आहेत जी आपण सर्वोत्कृष्ट काम कशा प्रकारे करतो ते प्रतिबिंबित करतात आपली मूल्ये आपण यापूर्वी कशामुळे यशस्वी झालेलो आहोत आणि यापुढे आपण कशामुळे यशस्वी होणार आहोत ते ओळखतात.

## आपल्या लोकांसाठी मूल्यांप्रमाणे जगणे

- **लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे**
  – आम्ही आरोग्य आणि सुरक्षा यांच्या सर्वोच्च मानकांचे पालन करतो, येथे काम करणाऱ्या आणि बाहेरच्या लोकांचे आरोग्य उत्तम राहावे या विचाराला प्रोत्साहन देतो, आणि पृथ्वीचे संरक्षण व्हावे यासाठी प्रयत्न करतो.

- **अखंडतेने काम करणे**
  – आम्ही लोकांसाठी आणि जगासाठी योग्य काम करतो. आम्ही बोलल्याप्रमाणे कृती करतो, आणि इतरांकडूनही तशीच अपेक्षा करतो आणि एखादी समस्या आल्यास त्याची **वाच्यता करतो.** आम्ही आंतरिक आणि बाह्य संबंधांना फार महत्व देतो, आणि इतरांशी सन्मानाने आणि काळजीपूर्वक वागतो.

- **एकत्रितपणे काम करणे**
  – आम्ही जेएम मध्ये आणि त्याबाहेरही सहकार्याला प्रोत्साहन देतो, तसेच वैचारिक विविधतेचा स्वीकार करतो. आम्ही समस्यांवर एकत्र काम करतो, आपले विचार अंमलात आणतो आणि एकत्र योगदानाचा अभिमान बाळगतो ज्यामुळे जेएम साठी तसेच आमच्या ग्राहकांसाठी आम्ही अधिक चांगल्याची निर्मिती करतो.

- **नाविन्य आणि सुधारणा**
  – आम्ही स्वतःला अधिक बळकट करण्यासाठी आणि जगाला अधिक स्वच्छ आणि निरोगी करण्यासाठी नवीन कल्पनांचे अनुकूलन आणि अंगीकार करतो. आम्ही बदल घडत असताना विश्वासपूर्ण आणि कणखर असतो; आम्ही स्वतःचा आणि जेएमचा विकास करतो, ज्याने आम्ही निवडलेल्या बाजारपेठेत अग्रणी असल्याची खात्री होते.

- **आपण केलेल्या कामाची जबाबदारी घेणे**
  – आम्ही स्वतःच्या कामाची जबाबदारी घेतो, आणि हे सुद्धा जाणतो की आम्ही एका विशाल चित्राचा एक भाग आहोत. आम्ही पुढाकार घेतो, स्पष्टता शोधतो आणि स्वतःकडून आणि आमच्या सहकाऱ्यांकडून उच्च मानकांची अपेक्षा करतो.



## स्वप्न

# आज आणि पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी जग हे आमचे स्वप्न आहे.

## योजना

### विज्ञान

आमच्या जागतिक दर्जाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानात गुंतवणूक करा.

### ग्राहक

याचा उपयोग आपल्या ग्राहकांच्या गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी करा; अधिक नफा असलेल्या, तंत्रज्ञानावर आधारित बाजारपेठेत अग्रणी व्हा.

### संचालन

एका अधिक सुरक्षित, अधिक परस्पर जोडलेल्या, क्रियाशील आणि कार्यक्षम वैश्विक व्यवसायाच्या रूपाने काम करा. आपल्या तीन प्रमुख रूपांतरण कार्यक्रमांच्या द्वारे सक्षम.

### लोक

आपल्या उत्कृष्ट लोकांद्वारे निकाल द्या.

## मूल्ये

- लोकांचे आणि आपल्या पृथ्वीचे संरक्षण करणे
- अखंडतेने काम करणे
- एकत्रितपणे काम करणे
- नवीन उपक्रम राबविणे आणि सुधारणा करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

## आपली संहिता



आपली संहिता आपल्या मूल्यांचा आणि योजनांचा पाया आहे, जी आपल्याला जेएम मध्ये “योग्य काम करणे” याचा अर्थ काय आहे हे समजावून घेण्यास मदत करते.

आपण कुठेही असलात, तरी आपली संहिता मदत करते.

# योग्य काम करणे

मी संहितेतील तत्वांना समजून घेण्याचे आणि त्यांचे अनुसरण करण्याचे वचन देत आहे.

**आपली संहिता म्हणजे काय?**

आपली संहिता आपल्याला योग्य काम करण्यास मदत करण्यासाठी असलेली एक रचना आहे. काही अंशी, हा एक असा नकाशा आहे ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या कामावर लागू होणारी कंपनीची तत्त्वे, मानके आणि धोरणे सापडतील आणि ती समजून घेता येतील. ती आपल्या सामुदायिक मूल्यांचे आणि व्यवसाय करण्याच्या पद्धतीचे प्रकटन सुद्धा आहे, ज्याने आपल्याला उघडपणे, प्रामाणिकपणे आणि नैतिकदृष्ट्या काम करण्यास मदत मिळते. बरेचदा जेव्हा एखादा विशिष्ठ नियम नसतो किंवा मार्गदर्शन मिळत नाही तेव्हा कामाच्या ठिकाणी आपल्याला निर्णय घ्यावे लागतात किंवा नैतिक पेचप्रसंगांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीतही आपल्याला योग्य निर्णय घ्यावे लागतात. जरी आपल्या संहितेत प्रत्येक परिस्थितीसाठी अचूक उत्तर दिलेले नसले, तरी यामुळे तुम्हाला त्या परिस्थितीला कसे तोंड द्यावे याबद्दल मदत मिळेल. आपल्या कामात वारंवार याचा संदर्भ घेत राहा, सुज्ञपणाचा आधार घ्या, आणि गरज असल्यास नेहेमी इतरांचे मार्गदर्शन घ्या.

**ही संहिता कोणाला लागू आहे?**

आपली संहिता आपल्या कंपनीमध्ये सर्वांना, सर्व स्तरांवर, सर्व ठिकाणी लागू होते. आपल्या सोबत काम करणारे लोक आणि संस्था यांनी आमच्या वतीने किंवा आमच्या नावाने काम करत असताना आपल्या संहितेप्रमाणेच वागले पाहिजे.

**आम्ही कोणासोबत व्यवसाय करतो?**

एका कंपनीच्या रूपात, जॉन्सन मॅथे अशा लोकांसोबत आणि संस्थांसोबत काम करू इच्छिते ज्यांची मूल्ये आपल्याशी सुसंगत आहेत, अशाने आपल्या व्यावसायिक जोडीदाराच्या चुकीच्या निर्णयांमुळे आपली प्रतिष्ठा खराब होत नाही. आम्ही तृतीय पक्षांची निवड (आपल्या ग्राहकांचा यात समावेश आहे) सावधपणे करतो आणि आपण कोणाबरोबर व्यवहार करत आहोत याची पूर्णपणे खात्री करून घेण्यासाठी पाउले उचलतो, मग ते ग्राहक असोत, पुरवठादार, भागीदार, एजंट, वितरक, मालाची ने-आण करणारे असोत किंवा इतर कोणी असोत ज्यांच्याशी आपले व्यावसायिक संबंध आहेत.



**माझी जबाबदारी काय आहे?**

- आपल्या संहितेतील मजकुराशी नीट परिचय करून घ्या (विशेषकरून बांधिलकींशी).
- तुमच्या भूमिकेशी संबंध असलेल्या विषयांचा नीट विचार करा आणि त्या विषयांशी निगडित सर्व धोरणे, तत्त्वे आणि मानके नीट समजून त्यांचे पालन करा.
- कठीण परिस्थितीमध्ये मार्ग शोधण्यासाठी आपल्या संहितेचा वापर करा – एखादा स्पष्ट नियम नसेल तरीही.
- तुम्हाला गरज असल्यास मदत किंवा प्रशिक्षण घ्या.

**एक व्यवस्थापक म्हणून मला काही खास जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत का?**

जॉन्सन मॅथे मध्ये व्यवस्थापक असताना, योग्य व्यावसायिक व्यवहाराचा पुरस्कार करणे आणि तुमच्यासाठी काम करणारे लोक आपली "योग्य काम करणे" ही संस्कृती उचलून धरीत आहेत आणि जतन करीत आहेत का याची खात्री करणे ही आपली विशेष जबाबदारी आहे. तुम्ही हे याप्रकारे करू शकता:

- आपल्या संहितेप्रमाणेच व्यवहार करण्याच्या बाबतीत सर्वांसमोर एक आदर्श ठेवून आणि आपल्या मूल्यांना जीवनात आत्मसात करून.
- तुमच्या गटाच्या आपल्या संहिते प्रमाणे तसेच मूल्यांप्रमाणे नसलेल्या आचरणासाठी त्यांना जबाबदार धरून.
- "योग्य काम करणे" म्हणजे काय असते याबद्दल तुमच्या गटाशी, वैयक्तिकपणे आणि एकत्रीतपणे वारंवार चर्चा करून.
- न टाळता कठीण मुद्द्यांवर बोलून.
- इतरांचे म्हणणे व्यवस्थितपणे ऐकून आणि त्यांना मार्गदर्शन करून.
- जे **वाचा फोडतात** त्यांना पाठींबा देऊन आणि प्रतिकार न होऊ देता.
- "योग्य काम करणे" याच्या सकारात्मक उदाहरणांचा पुरस्कार करून.
- "योग्य काम करणे" या मार्गातील अडथळे पुढाकार घेऊन दूर करून.
- स्वतःसाठी आणि तुमच्या गटासाठी प्रशिक्षण आणि विकासाच्या गरजा ओळखून आणि त्यांची पूर्ती करून.

**जर संहिता आणि जॉन्सन मॅथेच्या धोरणांमध्ये आणि कार्यापद्धतींमध्ये, किंवा स्थानिक कायदे आणि प्रथा यांच्यामध्ये वाद उत्पन्न झाल्यास मी काय केले पाहिजे?**

विविध संस्कृती, कायदे आणि राजकीय वातावरणाच्या संदर्भामध्ये जॉन्सन मॅथे जगभरातील अनेक देशांमध्ये कार्यरत आहे. या संहितेच्या आवश्यकतेत, आणि कंपनीच्या धोरणांमध्ये आणि कार्यापद्धतींमध्ये तसेच स्थानिक कायदे, प्रथा आणि कार्यांमध्ये वाद निर्माण होऊ शकतात. आपल्याला सर्वोच्च स्वरुपामध्ये लागू होणाऱ्या मानकाचे नेहमी अनुसरण केले पाहिजे. परिस्थिती अनाकलनीय असल्यास कृपया कृती करण्याआधी समूह कायदे विभाग (Group Legal) किंवा समूह आचार आणि अनुसरण विभाग (Group Ethics and Compliance) यांच्याशी सल्लामसलत करा.

**संहितेबद्दल असलेले प्रश्न मी कोणाला विचारु शकतो/शकते?**

आपल्या संहितेत तुमच्या विषयानुसार, मदतीसाठी कुणाकडे जावे याबद्दल तुम्हाला माहिती मिळेल. जर तुमचे काही सामान्य प्रश्न असतील, किंवा तुम्हाला एखाद्या विषयावर **काही बोलायचे असेल**, तर कृपया अधिक माहितीसाठी पान 10 पाहा.

# एखाद्या व्यक्तीच्या हातून एखादी चूक का होते?

चांगले लोक नेहेमीच योग्य काम करतात असे नाही. याची अनेक कारणे असू शकतात:

- **त्यांना माहीत नसते किंवा जाणीव नसते** – आपल्याला आपल्या विविक्षित कामाशी निगडित धोरणे आणि कार्यपद्धतींची माहिती असावी, परंतु सर्वच गोष्टींमध्ये कुशल असणे शक्य नसते. **माहिती करून घ्या की मदत हवी असल्यास ती कोणाकडे मागावी.**
- **त्यांच्यावर कामाचा फार ताण असतो** – जरी आपल्याला वाटत असेल की आपल्यावर कामाचा किंवा वेळेचा किंवा बजेटचा फार ताण आहे, तरी "कुठलीही किंमत मोजून व्यवसायाचे काम करायचेच" असे योग्य नाही. **जर तुम्हाला वाटते की तुमच्यावर असे काही करण्यासाठी दडपण येत आहे जे तुमच्या मते योग्य नाही, तर त्याबद्दल वाच्यता करा.**
- **त्यांना इतरांपेक्षा निराळे दिसायचे नसते** – आपल्याला नेहेमी वाटते की आपण गटाचा एक भाग असावे आणि आपण गटाच्या विरुद्ध जाऊ नये. निराळे मत असण्यासाठी धाडसाची गरज असू शकते. **तुम्ही जेव्हा आस्था व्यक्त करता आणि वाचा फोडता तेव्हा तुमची मदत केली जाईल.**
- **ते स्वतःची समजूत करून घेतात की एखादी कृती योग्य आहे कारण याने त्याने ते मिळते ज्याची त्यांना वाटते की त्यांची पात्रता आहे** – आपण कधी-कधी अनैतिक वागणूक या कारणामुळे योग्य ठरवतो की आपल्यासोबत अन्याय होतो आहे किंवा आपल्याशी गैरव्यवहार केला जातो आहे. **अयोग्य कामाचे कधीही समर्थन केले जात नाही .**
- **त्यांना पर्वा नसते** – काही लोकांना धोरणे आणि कार्यपध्दती काय आहेत हे माहीत असते, परंतु अनेक कारणांसाठी ते सोयीस्करपणे त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यावर गंभीरपणे विचार करत नाहीत. **कोणी नियम तोडत असल्याचे किंवा अयोग्य वर्तन करत असल्याचे आढळल्यास, त्याबद्दल वाच्यता करा.**
- **त्यांना वाटते की कोणाला कळणार नाही** – काही लोक चुका करताना विचार करतात की कोणाला कळणार नाही, विशेषकरून जेव्हा ते "लहान-सहान" निर्णय घेत असतात. **कोणीही पाहत नसले तरी तुम्हाला नेहेमी योग्य कामच केले पाहिजे.**

**काही तरी चूक असल्याचे इशारे. जर कोणी असे म्हटले तर सावध राहा:**

- "आपल्याकडे कोणताच पर्याय उरलेला नाही"
- "ती कागदपत्रे नष्ट करून टाका"
- "येथे अशा पद्धतीनेच काम केले जाते"
- "सर्व जण असेच करतात"
- "कोणाला कधीही कळणार नाही"
- "मला जाणून घ्यायचे नाही"
- "हे सर्व चांगल्या उद्देशासाठी आहे"
- "आपण हे लपवू शकतो"

# योग्य निर्णय घेणे

जेएम मध्ये तुमच्यावर उत्तम निर्णय घेण्याची जबाबदारी आहे.

तरीही काही वेळा तुम्हाला कठीण निर्णय घेण्याची किंवा पेच प्रसंगाला तोंड देण्याची वेळ येऊ शकते जेव्हा तुम्हाला योग्य काम कुठले ते स्पष्टपणे कळत नसते. अशा वेळी तुम्ही सदबुद्धीने निर्णय घेऊन आपल्या संहितेतील तत्त्वांप्रमाणे आणि आपल्या मूल्यांप्रमाणे काम केले पाहिजे, सबुरीने, त्या मुद्द्याबद्दल स्पष्टपणे विचार केला पाहिजे आणि गरज पडल्यास मदत मागितली पाहिजे.

## कोणत्या नैतिक पेच प्रसंगाला किंवा निर्णयाला मला सामोरे जायचे आहे? ?

**मग विचारा...**

हे प्रश्न तुम्हाला कठीण निर्णय घेताना मदत करतील:

- हा कायदेशीर आहे का?
- हा आपली मूल्ये आणि आपल्या संहितेशी सुसंगत आहे का?
- हे आपल्या धोरणांशी सुसंगत आहे का?
- याचा परिणाम कोणावर होणार आहे, आणि त्यांना हे स्वतःसाठी योग्य वाटेल का?
- हे मला योग्य वाटत आहे का?
- याबद्दल माझ्या सहकाऱ्यांना, मित्रांना आणि कुटुंबियांना सांगणे मला सोयीस्कर वाटेल का?
- जर हे वर्तमानपत्रात ठळक बातमी म्हणून किंवा सामाजिक मीडियावर प्रसिद्ध झाले तर मला काळजी वाटेल का?

**आणि नेहेमी लक्षात ठेवा:**

कठीण निर्णय घेताना असे मुळीच वाटून घेऊ नका की हे काम तुम्हाला एकट्याने किंवा इतरांच्या मदतीशिवाय करणे गरजेचे आहे.

## थांबा!

**जर तुमचे उत्तर "नाही" असेल, किंवा यापैकी कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देताना तुम्हाला अनिश्चितता वाटत असेल, तर लगेच थांबा आणि इतर कोणाचा तरी सल्ला घ्या.**

### सल्ला घेण्यासाठी तुम्ही खालील गोष्टी करू शकता:

- तुमच्या वरिष्ठांशी संवाद साधा
- तुमच्या स्थानिक मानव संसाधन (एचआर) विभाग किंवा कायदा (लीगल) विभाग यांचा सल्ला घ्या.
- एखाद्या नैतिकता दूताशी संवाद साधा
- समूह नैतिकता आणि अनुपालन गटाचा सल्ला घ्या

**किंवा जर तुम्हाला इतर पद्धती त्रासदायक वाटत असतील, तर तुम्ही तुमचा मुद्दा वाचा फोडा (Speak Up) द्वारे मांडू शकता. मुद्दा मांडणे आणि त्यापुढे काय होईल याबद्दल अधिक माहितीसाठी पान 10 पाहा.**

# मदत मागणे आणि वाचा फोडणे

मी मदत मागण्याचे आणि मला शंका असल्यास त्याबद्दल बोलण्याचे वचन देत आहे.

**मदत मागणे**

काही वेळा तुमची परिस्थिती अशी असते की तुम्हाला नक्की काय करावे याची खात्री नसते. आपल्या संहितेमध्ये अनेक विषयांवर माहिती तर आहेच, पण त्याचबरोबर अनेक अशा साधनांबद्दल माहिती दिलेली आहे जी तुमचे मार्गदर्शन करतात. जर या सगळ्याचा अभ्यास केल्यावरही तुम्हाला नक्की काय करावे ते कळत नसेल, तर तुमचे वरिष्ठ आणि मानव संसाधन (HR) विभागासह अनेक लोक तुमची मदत करू शकतात. अशा वेळी नेहेमी काहीही न बोलण्यापेक्षा मदत मागणेच योग्य असते.

**वाचा फोडणे**

असे काही प्रसंग असू शकतात जेव्हा तुम्ही काही पाहाता, किंवा तुम्हाला कळते, किंवा तुम्ही ऐकता किंवा तुम्हाला अशी शंका वाटते की काही तरी असुरक्षित, अनैतिक किंवा बेकायदेशीर काम आपल्या संहितेच्या विरुद्ध, धोरणंच्या विरुद्ध किंवा प्रक्रियेच्या विरुद्ध होते आहे. अशा प्रसंगी तुमची जबाबदारी आहे की तुम्ही **याबद्दल वाच्यता करावी** आणि लगेच आपला मुद्दा उपस्थित करावा. तुम्ही जेवढ्या लवकर **बोलून दाखवाल**, तेवढाच त्या प्रसंगाचा विपरीत प्रभाव कमी होण्याची शक्यता असते. इतर लोक याला **वाचा फोडतील** याची किंवा तुम्ही **वाचा फोडण्या**आधी काही वाईट घटना घडण्याची वाट पाहू नका.

**गोपनीयता आणि निनावीपणा**

जेव्हा तुम्ही **वाचा फोडता**, तेव्हा तुम्ही दिलेली माहिती गोपनीय ठेवली जाईल. याचा अर्थ असा की ती माहिती फक्त अशा लोकांसाठीच उघड केली जाईल ज्यांना सांगणे गरजेचे आहे.



तुम्ही अनेक माध्यमांनी मदत मागू शकता
आणि मुद्दा उपस्थित करु शकता:

**तुमचे व्यवस्थापक**
सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांच्या आधारावर, जेव्हा तुम्हाला काही प्रश्न विचारायचे असतील, सल्ला पाहिजे असेल किंवा कोणता मुद्दा मांडायचा असेल तर सर्वप्रथम तुम्ही व्यवस्थापकांकडे जायला पाहिजे.

**मानव संसाधन (HR), समूह कायदा विभाग, समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग** तुम्ही मानव संसाधन, समूय कायदा किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग यांना थेट प्रश्न विचारू शकता, यांचा सल्ला घेऊ शकता किंवा यांच्या समक्ष एखादा मुद्दा उपस्थित करू शकता.

**इतर समूह कार्य**
तुम्हाला इतर विभागाच्या कार्याबद्दल प्रश्न किंवा शंका असल्यास, उदा. समूह इ एच एस बद्दल प्रश्न असल्यास, तुम्ही तुमच्या प्रश्नांना स्थानिक किंवा संबंधित विभाग संपर्काकडे सांगू शकता.

**नैतिकता दूत**
तुम्हाला प्रश्न विचारण्यासाठी, मार्गदर्शनासाठी किंवा मुद्दे मांडण्यासाठी नैतिकता दूत हे आणखी एक संपर्काचे माध्यम आहे. सल्ला घेण्यासाठी ते तुम्हाला योग्य मार्ग दाखवू शकतात किंवा तुमच्या सामान्य प्रश्नांच्या बाबतीत मदत करू शकतात.

**वाचा फोडा (Speak Up) लाइन**
तुम्ही जेएमच्या वाचा फोडा (Speak Up) लाइनचा वापर करू शकता. ही दूरध्वनी/ऑनलाइन सेवा जेएम पासून स्वतंत्र आहे आणि यावर उपस्थित केलेले सर्व मुद्दे नैतिकता समितिच्या निर्देशानुसार तपासले जातात.

दूरध्वनी संपर्काचा तपशील जाणून घेण्यासाठी किंवा ऑनलाइन मुद्दा उपस्थित करण्यासाठी,
तुम्ही भेट देऊ शकता:
**www.JM.ethicspoint.com**

उपस्थित केले गेलेले सर्व मुद्दे तत्परतेने आणि सखोलपणे हाताळले जाण्याची खात्री करणे हे आमचे उद्देश्य आहे.

## मदत मागणे आणि वाचा फोडणे

पुढे चालू

कुठलाही मुद्दा उघडपणे मांडलेला असल्यास जॉन्सन मॅथेसाठी त्यावर काम करणे सोपे असते, तरीही आम्हाला जाणीव आहे की काही परिस्थिती अशा असतात ज्यात तुम्हाला तसे करणे योग्य वाटत नाही. जर मुद्दा मांडल्यानंतर तुम्हाला स्वतःची ओळख इतरांना कळू द्यायची नसेल, तर तुम्हीं तुमच्या संमतीशिवाय ओळख उघड करण्यास किंवा कायद्याप्रमाणे ओळख उघड करणे गरजेचे नसेल तर तुमची ओळख गुप्त ठेवण्यास सांगू शकता. तुम्ही **वाचा फोडा** (Speak Up) लाइनद्वारे निनावीपणे मुद्दे मांडू शकता (कायद्याप्रमाणे परवानगी असल्यास) तसेच उघडपणे सुद्धा मांडू शकता.

अशी सूचना देणाऱ्या लोकांना आम्ही शक्य असल्यास स्वतःची ओळख उघड करण्यास उत्तेजन देतो. यामुळे चौकशी पथक खालील गोष्टी करण्यास समर्थ होते:

- वस्तुस्थिती जाणून घेणे आणि स्पष्टीकरण मागणे.
- तपासणीमध्ये चुकून तुमची ओळख उघड होणार नाही किंवा तुमच्याकडे बोट दाखविले जाणार नाही याबद्दल तुम्ही आश्वस्त असल्याची खात्री करणे.
- तपासणी सुरू असताना तुम्हाला अद्ययावत करणे.
- तपासणीचे परिणाम तुमच्यापर्यंत पोहोचविणे.

**आम्ही कधीही सूड घेणे मान्य करीत नाही**

आम्ही तुम्हाला **वाचा फोडण्यासाठी** प्रोत्साहन देतो आणि जे कामगार आपले मुद्दे उपस्थित करतात त्यांचे संरक्षण कंपनी करते. मुद्दे उपस्थित केल्याबद्दल किंवा चौकशीमध्ये मदत केल्याबद्दल सूड घेण्याच्या किंवा भेदभाव होण्याच्या दाव्यांची जॉन्सन मॅथे फार गंभीरपणे दखल घेते. जे लोक योग्य काम करून **वाचा फोडतात** त्यांच्या सुरक्षेसाठी आम्ही सूड घेणाऱ्यांच्या विरुद्ध अनुशासनात्मक कारवाई करू.

सूड कसा घेतला जाऊ शकतो याबद्दल लाइन व्यवस्थापकांना माहीत असली पाहिजे, आणि त्यांनी याबद्दल संवेदनशील असले पाहिजे आणि त्यांनी प्रत्यक्ष कृती करून ते थांबवले पाहिजे.



### मी वाचा फोडल्यानंतर काय होते?

**वाचा फोडा** (Speak Up) मधील मुद्दे समूह नैतिकता आणि अनुपालन गटातील खूप कमी लोकांना कळतात. ते त्या मुद्द्याचे मूल्यमापन करतात आणि पुढील कारवाईबद्दल विचार करतात, ज्यात मुद्दा उपस्थित करणाऱ्या व्यक्तीकडून स्पष्टीकरण मागणे सामील आहे, आणि हे ठरवतात की ही चौकशी करण्यासाठी सर्वात योग्य व्यक्ती कोण आहे.

प्रत्येक **वाचा फोडा** (Speak Up) द्वारे मांडला गेलेला मुद्दा नैतिकता समितिकडे जातो. नैतिकता समितिमध्ये कुठल्याही क्षेत्रातील वरिष्ठ पुढारींचा समावेश असतो. नैतिकता समितीच्या कामामध्ये **वाचा फोडा** (Speak Up) मधील मुद्द्यांचे प्रभावी पुनर्विलोकन आणि/किंवा चौकशी केली जाते का, आणि केली जाणारी चौकशी प्रामाणिकपणे आणि सातत्याने केली जात आहे का याची खात्री करणे सामील असते. चौकशी पूर्ण झाल्यावर समिति चौकशीच्या निष्कर्षांच्या आधारावर आपल्या शिफारसी करते.

**वाचा फोडा** (Speak Up) प्रक्रियेबद्दल अधिक माहितीसाठी कृपया **एका नैतिकता दूताशी किंवा नैतिकता आणि अनुपालन गटाच्या सदस्याशी संपर्क साधा.**

जर कोणी तुमच्याकडे मुद्दा उपस्थित केला तर त्याचे बोलणे नीट ऐकून घ्या आणि नंतरच परिस्थितीचा आढावा घ्या आणि पुढे काय करायचे ते ठरवा. काही वेळेस, संबंधित लोकांत आपसातच उपस्थित मुद्द्याचे निराकरण करणे शक्य असू शकते आणि तो मुद्दा इतरांपर्यंत आणि/किंवा संबंधित व्यवस्थापकांपर्यंत न्यायची गरज भासत नाही, पण तुम्हाला काळजी वाटत असल्यास तुम्ही नक्कीच समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला याची माहिती दिली पाहिजे. इतर वेळेस, तो मुद्दा योग्य समूह कार्याकडे पोचवलाच पाहिजे. जर तुम्हाला काय करावे हा प्रश्न पडलेला असेल, तर समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाशी संपर्क साधा. यानंतर **वाचा फोडा** (Speak Up) **च्या** धोरणात तुमच्या समोर कोणी मुद्दा मांडल्यास तुमच्या मदतीसाठी क्रमाक्रमाने प्रात्यक्षिक मार्गदर्शन केले जाते.

**अधिक सहाय्य आणि साधने**

- **वाचा फोडा** (Speak Up) धोरण
- स्थानिक मानव संसाधन
- समूह कायदा विभाग
- नैतिकता दूत
- समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग

# मी वचन देतो   देते की...




कृपया आपली
वचनबद्धता पाहाण्यासाठी
पान उलटा >



मी संहितेतील तत्वांना समजून घेण्याचे आणि त्यांचे अनुसरण करण्याचे वचन देत आहे.



मी मदत मागण्याचे आणि मला समस्या असल्यास त्याबद्दल बोलण्याचे वचन देत आहे.



मी सुरक्षितपणे काम करण्याचे आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करण्याचे वचन देत आहे.



मी जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि कायदेशीरपणे व्यवसाय करण्याचे वचन देत आहे.



मी जॉन्सन मॅथेचा ब्रँड, संपदा आणि प्रतिष्ठेला सुरक्षित ठेवण्याचे वचन देत आहे.



मी जॉन्सन मॅथेच्या दीर्घकालीन व्यवसाय करण्याच्या महत्वाकांक्षेला पाठींबा देण्याचे वचन देत आहे.

# आपली वचनबद्धता

## आपल्या नैतिकता दूतांसाठी आपल्या वचनबद्धतेचा अर्थ काय आहे?

| | |
|---|---|
| **आपल्या संहितेतील तत्त्वांना समजून घेण्याचे आणि त्यांचे अनुसरण करण्याचे मी वचन देत आहे.** | *"* योग्य निर्णय घेणे नेहेमीच सोपे असते असे नाही, पण आपली संहिता मला अडचणीच्या वेळी फार मदत करते. *"* |
| **मी मदत मागण्याचे आणि मला समस्या असल्यास त्याबद्दल बोलण्याचे वचन देत आहे.** | *"* मला **वाचा फोडण्यास** आणि माझे मुद्दे मांडण्यास विश्वास वाटतो आणि मी इतरांना सुद्धा तसे करण्यासाठी प्रोत्साहन देईन. *"* |
| **मी सुरक्षितपणे काम करण्याचे आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करण्याचे वचन देत आहे.** | *"* जेएम मध्ये आमच्यासाठी लोकांची सुरक्षा सर्वोपरि आहे आणि आपली संहिता त्याला दुजोरा देत आहे. *"* |
| **मी जवाबदारीने, प्रामाणिकपणे आणि कायदेशीरपणे व्यवसाय करण्याचे वचन देत आहे.** | *"* व्यवसायाची कामे योग्य रीतिने करणे आणि कुठलीही किंमत न देता, हेच माझ्यासाठी महत्वाचे आहे. *"* |
| **मी जेएमचा ब्रँड, संपदा आणि प्रतिष्ठेला सुरक्षित ठेवण्याचे वचन देत आहे.** | *"* मला जेएम मध्ये काम करत असल्याचा अभिमान वाटतो, कारण या कंपनीची प्रतिष्ठा चांगली आहे आणि याची आणि माझी मूल्ये सारखी आहेत. *"* |
| **मी जॉन्सन मॅथेच्या दीर्घकालीन व्यवसाय करण्याच्या महत्वाकांक्षेला पाठींबा देण्याचे वचन देत आहे.** | *"* आपले जग बदलत आहे आणि कंपनीची काळजी घेणे आपण सर्वांचे कर्तव्य आहे – आजही आणि पुढील 200 वर्षांसाठी सुद्धा. *"* |

# लोक

मी सुरक्षितपणे काम करण्याचे
आणि  इतरांच्या अधिकारांचा
आदर करण्याचे वचन देत आहे.



| | |
|---|---|
| आरोग्य आणि सुरक्षा | 18 |
| कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण | 21 |
| डेटा सुरक्षा | 24 |
| मानवाधिकार | 26 |
| हिताचा संघर्ष | 29 |




# आरोग्य आणि सुरक्षा

**जॉन्सन मॅथे मध्ये आरोग्य आणि सुरक्षा ही आमची प्राथमिकता आहे.**

याचा अर्थ असा की आमच्या लोकांच्या संरक्षणावर आमचे पूर्ण लक्ष केंद्रित आहे आणि आम्ही सुरक्षेची उच्च मानके राखतो. एकत्र काम करून आपण खात्री करू शकतो की आपल्या सर्वांसाठी कामाचे वातावरण सुरक्षित आहे आणि आपण एक भक्कम सुरक्षा संस्कृती निर्माण करू शकतो आणि टिकवून ठेवू शकतो.

### सुरक्षा तत्वे

सर्व कर्मचाऱ्यांनी जॉन्सन मॅथेच्या सुरक्षा तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, ही तत्त्वे म्हणजे अशा गोष्टी आहेत ज्यांची तुम्ही आमच्याकडून एक नियोक्ता म्हणून अपेक्षा करु शकता आणि एक कर्मचारी म्हणून जॉन्सन मॅथे देखील तुमच्याकडून त्यांची अपेक्षा करु शकते.

- सर्व इजा आणि व्यवसायाशी निगडीत आजार टाळता येऊ शकतात. इजा आणि व्यवसायाशी निगडीत आजार टाळणे ही.
- सर्वांचीच जबाबदारी आहे.
- सुरक्षितपणे काम करणे ही येथे नोकरी करण्याची अट आहे.
- जीवन-सुरक्षा धोरणे आणि स्थळ सुरक्षा नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.
- आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांसाठी कार्येतर आरोग्य आणि सुरक्षा जागरुकतेचे प्रोत्साहन करू.



### हे मला कसे लागू होते?

- मला सुरक्षा तत्त्वांची आणि ईएचएसच्या वर्तन मानकांची माहिती आहे आणि त्यांचे मी समर्थन करतो/करते आणि त्यानुसार वागतो/वागते.
- मी सुरक्षित कार्यस्थळ वर्तनाचा दररोज अंगीकार करतो/करते आणि आरोग्य व सुरक्षा जोखमींना किमान करण्यावर भर देतो/देते.
- मी माझ्या आणि इतरांच्या कृतींबद्दल सजग आहे.
- प्रत्येकासाठी सुरक्षित कार्य परिसर तयार करण्यामध्ये आणि त्यात काम करण्यास प्रोत्साहन देण्यामध्ये मी सहभागी होतो/होते.
- मी सर्व ईएचएस धोरणांचे पालन करतो/करते आणि कुठल्याही अशा धोरणाबद्दल प्रश्न उपस्थित करतो/करते ज्याचे पालन करणे अशक्य असेल.
- मला प्रक्रिया-सुरक्षेचे महत्व माहीत आहे आणि याने अपायकारक आणि विषारी रसायने वातावरणात सोडली जाण्यासारख्या मोठ्या घटना टाळण्यास कशा प्रकारे मदत होते हे सुद्धा माहीत आहे.
- मला सुरक्षेबद्दल कोणाशीही बोलायला अवघड वाटत नाही, ते मग वरिष्ठ असले तरीही.

**मी खालील गोष्टी करत नाही:**

- काम करण्यासाठी घाई करणे किंवा वाम मार्गाचा वापर करणे.
- सहजपणे धोक्याच्या इशाऱ्याकडे किंवा असुरक्षित वर्तनांकडे दुर्लक्ष करणे.
- स्वतःच्या कामावर आणि भोवताली काय चालले आहे त्यावर दुर्लक्ष करणे.
- सर्व काही सुरक्षित आहे असे गृहीत धरणे.
- ज्या कामांसाठी मी सक्षम नाही ती कामे करणे.

# आरोग्य आणि सुरक्षा

पुढे चालू

## तुम्ही काय कराल?

**प्र. जिन्यातून वर जाताना तुमच्या समोरून एका वरिष्ठ व्यवस्थापकाला काही अवजड फायली दोन्ही हातांत धरून आणताना तुम्ही पहिले. तुमच्या लक्षात येते की त्यांनी जिन्याचा कठडा धरलेला नाही कारण त्यांचे दोन्ही हात गुंतलेले आहेत. तुमच्या लक्षात येते की जर त्यांचा पाय घसरला, तर ते स्वतःला पायऱ्यांवरून पडण्यापासून सावरू शकत नाहीत कारण त्यांनी कठडा धरलेला नाही.**

उ. काही वेळा लोकांना अगदी सोप्या ईएचएस नियमांचा विसर पडतो, जसे जिन्यावर असताना तीन ठिकाणी संपर्क असायला हवा. त्या व्यवस्थापकांना पडण्यापासून वाचविण्यासाठी मदत करणे महत्वाचे आहे, त्यामुळे या परिस्थितीत लगेच कृती करणे गरजेचे आहे. हे सुद्धा महत्वाचे आहे की व्यवस्थापकांनी इतरांसमोर चांगले उदाहरण ठेवावे, त्यामुळे नम्रपणे त्यांना मदत केल्याने यापुढे त्यांचे वर्तन सुरक्षित ठेवण्यात आणि एकूण मानकांचे स्तर वाढविण्यात मदत होईल. अधिक वरिष्ठ कर्मचाऱ्यांना सुरक्षित  वर्तनाचे उदाहरण सर्वांसमोर ठेवायला मदत करण्यास मागे-पुढे पाहू नका.

**प्र. तुमचा कामाच्या ठिकाणी एक लहानसा अपघात झाला आहे आणि तुम्ही घरून तुमच्या वरिष्ठांना कॉल करून डॉक्टरांच्या सांगण्यावरून तुम्ही दोन दिवसांची रजा घेत आहात हे सांगत आहात. तुमच्या वरिष्ठांचे म्हणणे आहे की तुम्ही तुमची वैयक्तिक रजा यासाठी खर्च करावी, जेणेकरून अपघात झालेला आहे ह्या माहितीची नोंद होणार नाही, कारण अशाने तुमच्या विभागाचे अपघाताचे आकडे वाढतील.**

उ. कार्यस्थळावरील झालेला अपघात लपविणे हे जेएमच्या ईएचएस धोरणांच्या विरुद्ध आहे आणि काही देशांत तर हा गुन्हा सुद्धा ठरू शकतो. या अपघाताची नोंद करण्यसाठी तुम्ही आग्रह धरावा आणि जर तसे झाले नाही तर तुम्ही तुमच्या ईएचएस प्रतिनिधीशी संपर्क साधला पाहिजे.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने वागणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- समूह इएचएस धोरण
- समूह जीवन रक्षक धोरणे

# कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण

**सर्वांना सर्वोत्कृष्ट काम करण्यास प्रोत्साहित करणारे कार्य-वातावरण निर्माण करण्यात आपली सर्वांचीच भूमिका महत्वाची आहे.**

आपण आजसाठी आणि पुढील पिढींसाठी अधिक स्वच्छ, अधिक निरोगी जग निर्माण करण्याच्या आपल्या नीतिवर काम करत असताना एक सकारात्मक कार्य-वातावरण निर्माण करणे आपल्या यशासाठी फार महत्वाचे आहे.

आपली धोरणे, प्रक्रिया आणि कार्यपद्धती आपल्या वैयक्तिक भूमिकेच्या कामाचा पायाच आहेत, आणि हे फार महत्वाचे आहे की हा पाया समानता, समावेश आणि सचोटीच्या आधारावर घातला जात आहे.

आमच्या मूल्यांचे विरोध करणारे कुठलेही वर्तन आम्ही सहन करत नाही, यात भेदभाव करणारे किंवा अपमानकारक वर्तन जसे छळवणूक किंवा धमकावणे यांचा समावेश आहे, आणि अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी धोरणे लागू केलेली आहेत.

आपली संपूर्ण क्षमता गाठण्यासाठी, आपल्या कार्य वातावरणात खालील गोष्टींचा समावेश असावा:

- जेएम मध्ये आणि त्याच्या बाहेर काम करण्यासाठी संधी **निर्माण करणे**.
- सर्वांना प्रश्न विचारायचा, तसेच समस्या असल्यास आत्मविश्वासाने **वाचा फोडण्यास अधिकार** दिला पाहिजे.
- विविध कल्पना आणि दृष्टीकोन यांना **अंगीकृत** केले पाहिजे.
- अंगीकृत केले पाहिजे. सर्वांनी स्वतःच्या वैयक्तिक विकासाची जबाबदारी घ्यावी आणि इतरांना याबाबतीत मदत करावी अशी **अपेक्षा केली** पाहिजे.



# कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण

पुढे चालू

### हे मला कसे लागू होते?

- मी पर्यायी दृष्टिकोन शोधतो/शोधते आणि त्यांचा आदर करतो/करते.
- सर्वोत्कृष्ट कार्य निष्पत्तीसाठी माझे काम इतरांच्या कामासोबत एकत्र करण्यात मला अभिमान वाटतो.
- मी प्रश्न विचारतो/विचारते आणि रचनात्मक वाद घालतो/घालते ज्याने योग्य, जाणीवपूर्वक निर्णय घेतले जातात आणि मग त्यावर कारवाई केली जाते.
- मी माझ्या गटापलिकडे जाऊन सुद्धा काम करतो/करते, मग ते जेएम मध्ये असो किंवा आपल्या ग्राहकांसोबत.
- मी माझ्या वैयक्तिक विकासाची जबाबदारी घेतो/घेते.
- ग्राहक आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी काय महत्वाचे आहे हे मी समजून घेतो/घेते.
- मी सर्व-समावेशी आणि मदत करणारा/करणारी आहे, मी सर्वांशी सन्मानाने आणि आदराने वागतो/वागते.
- मी योग्य काम करतो/करते, ते कितीही कठीण असले तरी.
- मला कळते की मला कदाचित असा पूर्वग्रह असू शकतो ज्याबद्दल मलाच माहीत नसेल, आणि मी लोकांबद्दल आणि परिस्थितीबद्दलच्या माझ्या समजुतीला आव्हान देतो/देते.
- मी जेएमची मूल्ये अंगीकृत करतो/करते आणि कोणतेही काम करत असताना माझ्याकडून अपेक्षित वर्तनच घडताना दिसून येते.



## तुम्ही काय कराल?

**प्र. एका कर्मचाऱ्याच्या कामगिरीचा आढावा तयार करत असताना तुमच्या लक्षात येते की त्या कर्मचाऱ्याला त्याच्या सहकाऱ्यांचे विचार सामील करून घेणे पटत नाही, आणि विशेषकरून असे विचार जे त्यांच्या स्वतःच्या विचारांशी जुळत नसतील. या कर्मचाऱ्याने गटासाठी फार चांगले काम केलेले आहे पण त्यामुळे गटातील इतर काही इतर काही सदस्यांना स्वतःबद्दल कमीपणा वाटायला लागला आहे. तुम्ही काय करायला हवे?**

**उ.** आपण काम कशाप्रकारे करतो हे, आपण काय काम करतो याइतकेच महत्वाचे आहे. कामगिरीचा आढावा घेताना अपेक्षित 'वर्तन' आणि केलेल्या कामाचे परिणाम दोन्हीमध्ये समतोल साधला गेला पाहिजे. मापनीय उद्दिष्टे सेट करून, ज्यात परिणाम आणि वर्तन या दोन्हीला महत्व दिलेले असेल, त्याद्वारे तुम्ही जेएमच्या मूल्यांसाठी प्रतिबद्धता आणि एक सकारात्मक कार्य-वातावरण दोन्ही दर्शवू शकता. जर तुम्हाला बोलणी सुरू कशी करावी हे कळत नसेल, किंवा तसे वर्तन थांबले नसेल, तर तुम्ही तुमच्या व्यवस्थापकांकडून किंवा मानव संसाधन विभागाकडून तुमच्या मुद्द्यांसाठी विविक्षित उदाहरणे पुढे करून मार्गदर्शन घेऊ शकता.

**प्र. एखादा सहकारी स्काइप आणि ईमेल द्वारे अप्रस्तुत टिप्पणी पाठवून तुम्हाला त्रास देत आहे, आणि त्यांच्या मते हे विनोद आणि अनौपचारिक गप्पा आहेत पण तुम्हाला वाटते की अशाने जेएमच्या सर्व-समावेशी संस्कृतीची योग्य वाढ होत नाही. तुम्हाला हा मुद्दा उपस्थित करताना काळजी वाटते पण असेही वाटते की हे थांबले पाहिजे कारण अशाने तुम्हाला कार्यालयात आल्यावर सुसह्य वाटत नाही. तुम्ही काय करायला पाहिजे?**

**उ.** जर तुम्हाला थेट तुमच्या सहकाऱ्याशी याबद्दल बोलताना अवघड वाटत असेल तर स्थापकांकडून किंवा मानव संसाधन विभागाकडून मदत घ्या. जर तुमची इच्छा तुमच्या गटाबाहेर/व्यवसाय यूनिटच्या बाहेर कोणाशी बोलावे अशी आहे तर तुम्ही समूह कायदा विभाग किंवा **समूह नैतिकता आणि अनुपालन** विभागाकडे मदत मागू शकता. हे देखील साध्य झाले नाही तर तुम्ही कुठल्याही GMC सदस्याशी संपर्क साधू शकता. जेएम मध्ये कुठल्याही प्रकारची छळवणूक किंवा भेदभाव केलेला खपवून घेतला जाणार नाही.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने वागणे
- एकत्रितपणे काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- एकत्रित कार्यासाठी समूह मानव संसाधन धोरण
- समान संधी समूह मानव संसाधन धोरण

# डेटा सुरक्षा

**जो वैयक्तिक डेटा आम्ही हाताळतो त्याचा आदर आणि त्याचे संरक्षण आम्ही करतो.**

जेएमला आपला व्यवसाय करण्यासाठी वैयक्तिक डेटा गोळा करावा लागतो आणि त्याचा वापर करावा लागतो, आणि आपल्यापैकी अनेक व्यक्ती या डेटाचा वापर (तो डेटा इतर कामगारांचा असो, ग्राहकांचा असो, पुरवठादारांचा असो किंवा इतरांचा असो) आपले काम करण्यासाठी करतात. जेव्हा आपल्या सोबत इतर लोक काम करीत असतात किंवा व्यवसाय करीत असतात तेव्हा आपण लोकांच्या गोपनीयतेचा आदर करतो आणि त्यांच्या वैयक्तिक डेटाचे संरक्षण करतो यावर लोकांचा विश्वास असायला हवा.

वैयक्तिक डेटा म्हणजे अशी माहिती की जी स्वतंत्रपणे किंवा इतर माहितीसोबत वापरल्यास एखाद्या व्यक्तीची ओळख पटवून देता येते. ही माहिती तथ्यावाचक असू शकते (उदा. नाव, ईमेल पत्ता, स्थळ किंवा जन्मतारीख) किंवा त्या व्यक्तीच्या कामातील किंवा वैयक्तिक जीवनातील कृतींबद्दल किंवा वर्तनाबद्दल इतर कोणाचे मत सुद्धा असू शकते.

जेएमचा कारभार असलेल्या अनेक देशांमध्ये असे नियम आणि कायदे आहेत जे आम्ही वैयक्तिक डेटा कसा हाताळतो याचे नियमन करतात. आम्ही नेहेमीच स्थानिक कायद्यांचे पालन करू, पण आम्ही किमान खालील गोष्टी करू:

1. वैयक्तिक डेटा फक्त तेव्हाच वापरू जेव्हा तसे करण्यासाठी आमच्यापाशी कायदेशीर व्यावसायिक कारण किंवा तसे करण्यासाठी कायदेशीररित्या गरज असेल.
2. आम्ही वैयक्तिक डेटा कसा वापरतो याबद्दल लोकांसमक्ष उघडपणा आणि पारदर्शिता ठेवू.
3. आम्ही वैयक्तिक डेटा फक्त त्याच उद्देश्यासाठी वापरू ज्यासाठी आम्ही तो गोळा केला आहे ; इतर कारणांसाठी फक्त त्या परिस्थितीतच वापरू जेव्हा तसे करण्यासाठी आम्ही त्या व्यक्तीची परवानगी घेतली असेल, किंवा तसे करण्यासाठी आमच्यावर कायदेशीर सक्ती असेल.
4. आम्हाला व्यवसायासाठी जेवढा वैयक्तिक डेटा आवश्यक असेल तेवढाच डेटा आम्ही गोळा करू.
5. आम्ही गोळा केलेला डेटा अचूक आणि अद्ययावत आहे याची खात्री करण्यासाठी योग्य ती कृती करू.
6. गरजेपेक्षा जास्त काळ वैयक्तिक डेटा आमच्यापाशी ठेवणार नाही.
7. वैयक्तिक डेटा सुरक्षित ठेवू, आणि त्याला हाताळू शकणाऱ्या लोकांची संख्या मर्यादित ठेवू.
8. ज्या इतर तृतीय पक्षांना आम्ही वैयक्तिक डेटा शेअर करू, ते सुद्धा याच्या संरक्षणाची योग्य जबाबदारी घेतील याची खात्री करू.
9. हा डेटा ज्या लोकांचा आहे त्यांच्या अधिकारांचा आदर करू.

### हे मला कसे लागू होते?

- वैयक्तिक डेटा म्हणजे काय हे मला समजून घेतलेच पाहिजे.
- जर मला माझ्या कामासाठी वैयक्तिक डेटा आवश्यक असेल तरच मी त्याचा वापर करेन.
- मी गरजेपेक्षा अधिक काळ वैयक्तिक डेटा ठेवणार नाही.
- मी वैयक्तिक डेटा सुरक्षित ठेवीन.
- केवळ गरज असल्यासच मी वैयक्तिक डेटा इतरांना देईन.

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्हाला एखाद्या व्यक्तीने संपर्क करुन तुमच्या नुकत्याच जॉन्सन मॅथे सोडलेल्या सहकाऱ्याला त्यांच्या नवीन भूमिकेसाठी शुभेच्छा देण्यासाठी त्याची संपर्क माहिती विचारली.**

**उ.** तुम्ही ही माहिती त्या व्यक्तीच्या परवानगी शिवाय इतरांना देऊ नये. तुम्ही तुमच्या स्थानिक मानव संसाधन विभागाशी थेट संपर्क केला पाहिजे किंवा तुम्ही अजूनही त्या कर्मचाऱ्याच्या संपर्कात असाल तर तुम्ही त्यांच्यापर्यंत  थेट संदेश पोहचवण्याचा विकल्प ठेवू शकता.

**प्र. तुम्ही लाईन व्यवस्थापक आहात आणि तुमच्या लक्षात येते की तुमच्या गटाच्या एका सदस्याची आजारपणाची नोट तुम्ही मानव संसाधन विभागाला पाठवण्या ऐवजी चुकून इतर कोणाला तरी पाठवली आहे.**

**उ.** तुम्हाला लगेच तो संदेश रीकॉल (परतवणे) करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्या व्यक्तीशी संपर्क केला पाहिजे ज्यांना तुम्ही चुकून तो पाठवला आहे आणि सांगितले पाहिजे की तो त्यांना चुकून पाठवला गेला आहे आणि त्यांनी तो उघडून न पाहता डिलीट करावा. जर तुमचा संपर्क त्यांच्याशी होऊ शकला नाही, तर तुम्ही लगेच DPO@matthey.com **वर डेटा सुरक्षा गटाशी संपर्क साधावा.**

हे प्रकरण वाढू नये यासाठी तुम्ही अशी संवेदनशील माहिती ईमेल द्वारे पाठवणे टाळले पाहिजे. जर तुमच्याकडे इतर पर्याय नसेल, तर तुम्ही आधी त्या दस्तऐवजाला पासवर्डने संरक्षित करून मग पाठवावे आणि त्याचा पासवर्ड ईमेल द्वारे न पाठवता इतर माध्यमाने (उदा. एसएमएस किंवा आयएम) पाठवावा. पाठवण्याआधी नेहेमी तपासून घ्यावे की तुम्ही तो योग्य व्यक्तीलाच पाठवत आहात.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- आपल्या लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- डेटा सुरक्षा धोरण
- माहिती सुरक्षा धोरण
- DPO@matthey.com
- मायजेएम ग्रुप नैतिकता आणि अनुपालन साइट

# मानव अधिकार

**मानव अधिकारांचा आदर करणे हे आमच्या व्यवसायाचे मूळ आहे.**

आम्हाला याची जाणीव आहे की आम्ही आमच्या व्यवसायामध्ये आमच्या सोबत काम करणाऱ्या लोकांवर आणि आम्ही कार्यरत असणाऱ्या समाजातील लोकांवर होणाऱ्या परिणामासाठी जबाबदार आहोत.

आम्ही ज्यांच्यासोबत काम करतो अशा आणि आसपासच्या लोकांच्या मानवाधिकारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी आमच्या प्रभावाचा वापर करून या जबाबदारीवर काम करतो.

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन कोर कन्वेन्शन्स, युनायटेड नेशन्स (यूएन) ग्लोबल कॉंपॅक्ट अँड द यूएन गायडिंग प्रिन्सिपल्स ऑन बिझनेस अँड ह्युमन राइट्समध्ये दिलेल्या तत्त्वांना जॉन्सन मॅथे पाठिंबा देते. जॉन्सन मॅथे कामाचे वातावरण, श्रमिक मानके, आधुनिक दासता, मानव तस्करी, भेदभाव आणि छळवणूक यांच्याशी संबंधित सर्व लागू असणाऱ्या नियम आणि कायद्यांचे पालन करते.



आम्ही खालील तत्वांचे समर्थन करतो:

- आम्ही प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कौशल्यांची आणि योगदानाची दखल घेतो आणि त्यांना प्रामाणिकपणे आणि योग्य मोबदला मिळावा याची खात्री देतो.
- आम्ही कर्मचाऱ्यांचे काम आणि त्यांचे कौटुंबिक जीवन यांच्यामध्ये योग्य समतोल ठेवण्यास प्रोत्साहन देतो आणि खात्री करतो की कामाचे तास आणि ओव्हरटाइम हे सर्व लागू होणाऱ्या कायद्यांप्रमाणेच असतील.
- आम्ही १६ वर्षे वयाच्या खालच्या व्यक्तीला कामावर रुजू करणार नाही आणि बाल श्रमिकांवर बंदी आणणाऱ्या सर्व कायद्यांचे पालन करू. १६ ते १८ वयोगटातील व्यक्तींना फक्त पर्यवेक्षित प्रशिक्षण कार्यक्रमाचा भाग म्हणून नियुक्त केले जाते.
- आम्ही कधीही गुलाम किंवा कुठल्याही प्रकारचे अनैच्छिक श्रमिक कामावर ठेवणार नाही आणि आम्ही मानव तस्करीच्या विरुद्ध आहोत.
- आम्ही कर्मचाऱ्यांच्या अशा संपूर्ण आणि उघडपणे केलेल्या संवादांचा आदर करण्यास प्रतिबद्ध आहोत, जो सूड घेतला जाईल या भीतिपासून मुक्त आहे, आणि असा संवाद व्यवस्थापनामार्फत किंवा इतर बाह्य सल्लागार संस्थांच्या मार्फत केलेला असू शकतो.
- आम्ही लिंग, वैवाहिक स्थिती, वय, वंश, सांस्कृतिक मूळ, यौन अभिमुखता, धार्मिक विश्वास, अपंगत्व किंवा इतर संरक्षित लक्षणांमुळे होणारा कोणत्याही प्रकारचा भेदभाव खपवून घेणार नाही.
- सर्व प्रकारच्या शारीरिक आणि मौखिक गैरवर्तनावर आणि शिक्षेवर, तसेच लैंगिक किंवा इतर छळवणुकीवर आणि इतर कुठल्याही प्रकारच्या धाकदपटशाहीवर आम्ही बंदी घातलेली आहे.
- आम्ही एक खरी लायकीवर आधारित संस्था असू जिथे सर्व प्रकारच्या वैविध्याचे स्वागत केले जाते आणि जिथे विविधतेला प्रोत्साहन दिले जाते आणि संयुक्त मूल्यांवर आधारित समानता आणि अंतर्भाव यांचा पुरस्कार केला जातो.

### हे मला कसे लागू होते?

- मी माझ्या कृतींचा इतरांवर होणारा मोठ्या प्रमाणावरील परिणाम विचारात घेतो/घेते.
- मी माझ्या कामाच्या ओघात येणाऱ्या सर्वांच्या मानवाधिकाराचा आदर करतो/करते.
- मी जॉन्सन मॅथे मध्ये एक वैविध्यपूर्ण आणि समावेशी संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे.
- मी जॉन्सन मॅथेच्या कुठल्याही भागामध्ये आधुनिक गुलामी बद्दल आणि इतर श्रमिकांसंबंधी गैरवर्तनांबद्दल मुद्दे उपस्थित करण्यासाठी जबाबदार आहे.

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुमच्या गटामध्ये एक जागा रिकामी आहे. अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी एक व्यक्ती नुकतीच लग्न झालेली असून उघडपणे लवकरच कुटुंब वाढवण्याबद्दल बोलत आहे. या पदासाठी दिले जाणारे प्रशिक्षण महाग आहे आणि जर ही व्यक्ती काही काळाने पालकत्वाच्या रजेवर जाणार असेल तर त्यांच्या प्रशिक्षणासाठी एवढा खर्च करावा अशी तुमची इच्छा नाही. तुम्हाला त्या व्यक्तीला नोकरी देण्याबद्दल विचार करायला पाहिजे का?**

**उ.** होय, तुम्हाला त्या उमेदवाराबद्दल विचार करायलाच हवा. आपण लोकांना त्यांच्या क्षमतेनुसार कामावर घेतो, त्यांच्या वैवाहिक स्थिती किंवा त्यांना मूल आहे किंवा नाही या आधारावर नाही. एखादी व्यक्ती त्या पदासाठी योग्य आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी तुम्हाला त्याची कसब आणि अनुभव याचाच सर्वस्वी विचार केला पाहिजे. जर तुमच्या मनात काही प्रश्न असतील तर तुम्ही तुमच्या स्थानिक मानव संसाधन गटाशी संपर्क साधला पाहिजे.

**प्र. अनौपचारिकपणे असे माझ्या ऐकिवात आहे की आपल्या पुरवठादारांपैकी एकाची सध्या बाल श्रमिक कायदेभंगासाठी चौकशी सुरू आहे. आजपर्यंत आमच्यासाठी ते एक अतिशय उत्तम पुरवठादार आहेत आणि मला यापूर्वी काही समस्या असल्याचे आठवत नाही. आपल्याकडे काही ठोस पुरावा नसल्यामुळे मी या अफवांकडे दुर्लक्ष करायला हवे का?**

**उ.** नाही. मानवाधिकारांचा आदर करणे हे जॉन्सन मॅथेचे कर्तव्य आहे आणि यात बाल श्रमिकांना कामावर न ठेवणे याचासुद्धा समावेश आहे. तुम्हाला लगेच तुमच्या व्यवस्थापकांना आणि खरेदी गटाला याबद्दल सांगितले पाहिजे आणि ते तुम्हाला आपल्या मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी काय करावे याबद्दल सल्ला देतील.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे
- एकत्रितपणे काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- समूह आणि स्थानिक मानव संसाधन विभाग
- मानव संसाधन धोरणे
- समूह नैतिकता आणि अनुपालन
- समूह कायदेशीर
- समूह स्थिरता
- जेएमचे आधुनिक गुलामगिरी विधान
- मायजेएम ग्रुप नैतिकता आणि अनुपालन साइट

# हित-संबंधांतील संघर्ष

**आम्ही  कर्मचाऱ्यांचे हित आणि जॉन्सन  मॅथेचे हित यांमधल्या संघर्षाच्या धोक्याबद्दल जागरुक आहोत.**

हितातील वाद तिथे निर्माण होतात जिथे कर्मचाऱ्यांच्या खाजगी, सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय कृती किंवा संबंध त्यांच्या निर्णयाच्या किंवा जॉन्सन मॅथेसाठी सर्वोत्तम कार्य करण्याच्या स्वातंत्र्याच्या आड येतात.

हितातील वादांमुळे व्यावसायिक निर्णयांच्या गुणवत्तेवर तसेच ते निर्णय घेणाऱ्या व्यक्तीच्या प्रामाणिकपणावर सुद्धा प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात. हितातील खऱ्या वादाप्रमाणेच, हितातील वाद आहेत अशी शंका येणे सुद्धा तेवढेच अपायकारक असते. आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांकडून सचोटीने कृती करण्याची अपेक्षा करतो, तसेच हितातील कुठलाही वाद टाळण्याची आणि, कंपनीच्या मंजुरीने, अशा वादाची फक्त शंका असणे किंवा शक्यता असणे सुद्धा टाळण्याची अपेक्षा करतो.

तुमच्या व्यवस्थापकांना, मानव संसाधन विभाग, समूह कायदा विभागाला किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला तत्परतेने हितांमध्ये वाद उत्पन्न करणारी वास्तविकत किंवा शक्यता असलेली परिस्थिती उघड करणे महत्वाचे आहे, त्यामुळे योग्य कृती कोणती त्यावर एकमत होऊ शकते. तत्परतेने आणि उघडपणे व्यक्त केल्यास हितातील वाद बहुधा सोप्या आणि परस्परांमध्ये मान्य होणाऱ्या पध्दतीने सोडवता येतात.



# हित-संबंधांतील संघर्ष

पुढे चालू

हितामध्ये वाद उत्पन्न करू शकणाऱ्या काही सामान्य परिस्थिती खालील प्रमाणे असू शकतात.

- अशा एखाद्या कंपनीची मालकी किंवा त्यामध्ये गुंतवणूक जी जॉन्सन मॅथे सोबत व्यवहार करते किंवा त्यांची प्रतिस्पर्धी आहे.
- कुटुंबातील व्यक्तींना किंवा मित्रांना नियुक्त करणे किंवा त्यांचे पर्यवेक्षक असणे.
- ग्राहक, पुरवठादार किंवा प्रतिस्पर्ध्यांसाठी काम करणारे कौटुंबिक सदस्य किंवा मित्र.
- बाह्य संचालक मंडळाचे सदस्यत्व.

### हे मला कसे लागू होते?

- मी अशी परिस्थिती टाळतो/टाळते ज्यात माझे खाजगी हित जॉन्सन मॅथेच्या हिताच्या विरुद्ध असू शकते.
- मी एखादी संभाव्य, शंकास्पद किंवा खरीखुरी वादाची परिस्थिती लगेच माझ्या व्यवस्थापकांना, मानव संसाधन विभागाला, समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला लगेच कळवतो/कळवते (आणि मी माझ्या सूचनेच्या समर्थनासाठी हित-संबंधांतील वाद रिपोर्ट फॉर्म भरून दाखल करेन) जेणेकरून तिचे शक्य तेवढ्या लवकर निराकरण केले जाईल.
- एखादी परिस्थिती हितातील वादासाठी कारणीभूत असण्याबद्दल साशंक असल्यास मी माझ्या व्यवस्थापकांचा किंवा समूह कायदा विभागाचा सल्ला घेतो/घेते.



## तुम्ही काय कराल?

**प्र. तुमच्या कामाच्या ठिकाणी एक पद रिक्त आहे ज्यासाठी तुमच्या मैत्रिणीला रुची असेल असे तुम्हाला वाटते; पण तुमच्या मैत्रीच्या नात्यामुळे तुम्ही तिचे नाव सादर करु शकता का अशी तुम्हाला शंका आहे.**

**उ.** आमचे काही सर्वोत्कृष्ट कर्मचारी इतर कर्मचाऱ्यांच्या मार्फतच आलेले आहेत. जर तुम्हाला वाटत असेल की तुमची मैत्रीण सर्वथा योग्य आहे आणि कंपनीला तिचा चांगला उपयोग होईल, तर तुम्ही तिच्याबद्दल, आणि तुमच्या मैत्री बद्दल सुद्धा, स्थानिक मानव संसाधन गटाला सांगा. तुम्हाला खात्री करायला हवी की त्यांना कामावर घेण्याच्या प्रक्रियेत तुमचा काहीच सहभाग नाही आणि ते पद असे नसावे ज्याचे तुम्ही थेट किंवा अपरोक्षपणे पर्यवेक्षक आहात.

**प्र. तुम्हाला एका अशा अ-लाभकारी संस्थेच्या बोर्डवर नेमले जात आहे जी जॉन्सन मॅथेमधील तुमच्या कामाशी संबंधित क्षेत्रामध्ये संशोधन करते. तुम्हाला ते काम स्वीकारायला आवडेल आणि तुम्हाला वाटते की तुमच्या करीअरच्या विकासासाठी ही संधी फार चांगली आहे.**

**उ.** तुम्हाला या संधीबद्दल तुमच्या व्यवस्थापकांशी उघडपणे चर्चा केली पाहिजे. ही संधी हित संबंधातील संघर्ष उत्पन्न तर करेलच, तसेच यामध्ये प्रतिस्पर्धेचे पैलू सुद्धा असू शकतात. जर एक योग्य कृतीचा मार्ग दोघांनी स्वीकारला (आणि त्याबद्दल हित-संबंधांतील संघर्ष रिपोर्ट फॉर्ममध्ये लिहून ठेवले) आणि त्यामुळे हित-संबंधांतील संघर्षाची किंवा प्रतिस्पर्धेची शक्यता संपते, तर जॉन्सन मॅथे तुम्हाला या बोर्डावरील पद स्वीकारण्याची मंजुरी देऊ शकते.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- मायजेएम समूह नैतिकता आणि अनुपालन साईट
- हित-संबंधांतील संघर्ष धोरण
- हित-संबंधांतील संघर्ष मार्गदर्शन
- समूह कायदेशीर
- समूह नैतिकता आणि अनुपालन
- समूह किंवा स्थानिक मानव संसाधन विभाग



# बाजारपेठ

मी व्यवसाय जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि कायदेशीरपणे करण्यास वचनबद्ध आहे.






| | |
|---|---|
| तृतीय पक्ष | 34 |
| लाच आणि भ्रष्टाचार | 37 |
| भेटवस्तू आणि आदरातिथ्य | 40 |
| प्रामाणिक स्पर्धा | 43 |
| आर्थिक गुन्हा | 46 |
| व्यापार आणि निर्यात नियंत्रणे | 49 |
| देवघेवीसाठी धोक्याचे इशारे | 52 |

# तृतीय पक्ष

**आपण नक्की कोणासोबत काम करत आहोत याची आपल्याला नेहमी जाणीव असावी.**

आपल्याला खात्री करून घ्यायला हवी की आपण अशा तृतीय पक्षांसोबत काम करू नये की जे अनैतिक कामे करून किंवा भ्रष्ट प्रक्रियांचा अवलंब करून जॉन्सन मॅथेच्या प्रतिष्ठेला धक्का लावतील. आपण नक्की कोणासोबत काम करत आहोत याची जाणीव यासाठी हवी की आपण विस्तृत आणि तांत्रिक कायद्यांचे पालन करू शकू – असे कायदे की जे लाच आणि भ्रष्टाचाराशी, व्यापार आणि निर्यात नियंत्रणांशी आणि पैशाच्या अफरा-तफरीशी संबंधित असतील. आपल्याला खात्री करायला हवी की आपण पैसा किंवा वस्तू चुकीच्या लोकांच्या हातात देऊन भ्रष्ट किंवा अनैतिक कामांना अप्रत्यक्षपणे दुजोरा देत नाही आहोत.

जॉन्सन मॅथेमध्ये आपल्या मदतीसाठी अशा काही प्रक्रिया आहेत, ज्यांच्या मार्फत आपण व्यवहार करीत असलेल्या व्यक्तींबद्दल माहिती मिळते मग ते ग्राहक, पुरवठादार, भागीदार, एजंट्स, वितरक, लॉजिस्टिक्स प्रदाते किंवा इतर तृतीय पक्ष असोत ज्यांच्यासोबत आपले व्यावसायिक किंवा इतर संबंध आहेत. विशेष करून, आपल्यापाशी उच्च जोखीम तृतीय पक्ष मध्यस्थी कार्यपद्धती (हाय रिस्क थर्ड पार्टी इंटरमीडियरी प्रोसीजर) आहे, (जी एजंट्स, वितरक, शासकीय मध्यस्थ आणि काही लॉजिस्टिक्स पुरवठादारांसाठी सर्वोच्च जोखीम असलेल्या देशांमध्ये लागू होते), ज्यामुळे आपल्याला अशा पक्षांसोबत त्यांच्या जेएमबरोबरच्या कामाच्या कालावधीत हाताळावी लागणारी जोखीम टाळण्यासाठी मदत मिळते. आम्ही फक्त अशाच लोकांसोबत काम करू जे प्रामाणिक आहेत आणि जेजॉन्सन मॅथेच्या जबाबदार आणि नैतिक व्यवसाय आचरणाच्या मानकांवर खरे उतरतात.



### हे मला कसे लागू होते?

- मी माझ्या पुरवठादारांकडून, त्यांच्या कर्मचा-यांकडून आणि पुरवठा साखळ्यांकडून जॉन मॅथेच्या दर्जा व एकात्मतेच्या मानकांप्रमाणे काम करण्याची अपेक्षा करतो/करते.
- मी या गोष्टीची खात्री करुन घेतो/घेते की ग्राहक, पुरवठादार आणि तृतीय पक्ष मध्यस्थासोबत व्यवहार करण्याआधी त्यांची संपूर्ण माहिती काढली गेली आहे.
- मी खात्री करून घेतो/घेते की जेव्हा मी एखाद्या उच्च जोखीम असलेल्या तृतीय पक्ष मध्यस्थासोबत काम करतो/करते, तेव्हा मी उच्च जोखीम तृतीय पक्ष मध्यस्थी कार्यपद्धतीचे पालन करतो/करते.
- बेकायदेशीर, भ्रष्ट किंवा इतर प्रकारचे अनैतिक वर्तन दर्शविणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या वर्तनाचा इशाऱ्याला समजण्याची मी सतर्कता ठेवतो.



**देवघेवीसाठी धोक्याचे इशारे**

तृतीय पक्षांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारामध्ये इशारे किंवा संकेत असू शकतात ज्याने कळते की काहीतरी बरोबर नाही. त्यांना व्यवहार चेतावणी चिन्हे किंवा "रेड फ्लॅग" असे म्हटले जाते आणि तपासणीसाठी यांच्याबद्दल नेहेमी समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला माहिती दिली पाहिजे. देवघेवीसाठी धोक्याचे इशारे कसे ओळखावे याबद्दल अधिक माहितीसाठी पान 52 वर दिलेली उदाहरणे पाहा.

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्हाला मलेशिया मध्ये एका एजंटची नेमणूक करण्यासाठी फार कमी वेळ उरलेला आहे, ज्याची नवीन बाजारपेठेत एक मोठे काम मिळवून देण्यासाठी फार मदत होणार आहे. तुम्हाला या एजंटबद्दल संपूर्ण माहिती काढण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही, पण तुम्ही ही नेमणूक आजच करू इच्छिता.**

**उ.** तुम्ही उच्च जोखीम तृतीय पक्ष मध्यस्थ प्रक्रिया या एजंटसाठी पूर्ण केल्याशिवाय या एजंटची नेमणूक करू शकत नाही. तुम्हाला यासाठी एक व्यावसायिक औचित्य तयार करावे लागेल आणि त्यावर मंजुरी घ्यावी लागेल, तसेच तुम्हाला योग्य प्रकारे संपूर्ण माहिती काढून नंतरच त्यांच्यासोबत मंजूर केलेल कंत्राट करून घ्यावे लागेल. अधिक मार्गदर्शनासाठी तुम्हाला समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग यांच्याशी संपर्क साधला पाहिजे. ते संपूर्ण माहिती काढण्याच्या प्रक्रियेत, तसेच योग्य त्या कंत्राटाच्या अटी लिहीण्यात तुमची मदत करतील.

**प्र. तुम्ही एका नवीन ग्राहकाला वस्तू पुरवणे नुकतेच सुरू केले आहे. तुमच्या लक्षात येते की या वस्तूंसाठी काही पैसा एक निराळ्या देशाच्या, असंबंधित वाटणाऱ्या संस्थेकडून येतो आहे आणि त्या वस्तूसुद्धा तुमच्या ग्राहकाच्या देशाला पाठवल्या जात नाहीत.**

**उ.** तुम्हाला या परिस्थितीला संपूर्णपणे समजून घेई पर्यंत आणि ही खात्री करून घेई पर्यंत की सर्व पक्षांची संपूर्ण माहिती मिळवण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, यापुढील पैसे घेणे थांबवले पाहिजे. हे फार महत्वाचे आहे की आपल्याला हे तर माहित असलेच पाहिजे की आपले ग्राहक कोण आहेत, तसेच ही खात्री सुद्धा केली पाहिजे की पैशाचा व्यवहार फक्त त्या ग्राहकांसोबतच होतो आहे आणि आपल्या वस्तू आणि तंत्रज्ञान अशा संस्थांपर्यंत पोहोचत नाही ना ज्यांच्याशी आपण थेट व्यवहार करीत नाही. अधिक मदतीसाठी तुम्हाला समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग यांच्याशी संपर्क साधला पाहिजे.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- एकत्रितपणे काम करणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- जागतिक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण
- वैश्विक उच्च जोखीम व्यवहार धोरण आणि प्रक्रिया
- कायदा विभाग
- आर्थिक गुन्हा धोरण
- समूह नैतिकता आणि अनुपालन
- समूह स्थिरता

# लाच आणि भ्रष्टाचार

**जॉन्सन मॅथेमध्ये आम्ही सर्व प्रकारच्या लाच आणि भ्रष्टाचाराचा विरोध करण्यासाठी आणि कोणत्याही भ्रष्ट कृत्याबाबत शून्य सहनशीलता दृष्टीकोन ठेवण्यासाठी वचनबद्ध आहोत.**

कुठल्याही प्रकारचा पैशासंबंधी अनुचित व्यवहार किंवा लाच देणे-घेणे यांना आमच्या व्यवसायात कुठेही स्थान नाही.

**लाच** म्हणजे पैसे देऊ करणे, देणे किंवा घेणे, तसेच इतर फायदा किंवा भेटवस्तू देणे-घेणे ज्याचा उद्देश्य एखाद्या निर्णयावर किंवा परिणामावर अयोग्यपणे प्रभाव पाडणे आहे. रोख रक्कम, भेटवस्तू, सरबराई, प्रोत्साहनपर खर्च, तत्सम रोख (जसे की गिफ्ट कार्ड्स), सेवा, मेहेरबानी, राजकीय योगदान किंवा सेवाभावी देणगी यासारख्या मार्गांनी लाच घेता येऊ शकते.

**भ्रष्टाचार** म्हणजे बेकायदेशीर, अवैध किंवा अयोग्य वर्तन, ज्याचा उद्देश्य कुठल्याही प्रकारचा फायदा घेणे असतो. यात लाच, फसवणूक, पिळवणूक, चोरी, अधिकारांचा दुरुपयोग आणि पैशांची अफरा-तफर यांचा समावेश होतो.

**सुलभता पेमेंट्स** म्हणजे अशा लहान अनधिकृत पेमेंट्सद्वारे सर्वसामान्य प्रक्रियेचे सादरीकरण स्वतःच्या बाजूने करणे किंवा तिचा वेग वाढवणे, जे करणे एखाद्या अधिकाऱ्याचे कर्तव्यच आहे. अशा प्रकारच्या पेमेंट्सना लाच म्हटले जाते (रकमेचा आकडा किंवा स्थानिक व्यवसाय कार्यपद्धतीला न जुमानता) आणि बऱ्याचदा ते बेकायदेशीर असते.

केवळ आम्हीच लाच देऊ करत, देत किंवा घेत नाही तर जॉन्सन मॅथेच्या वतीने कृती करणारे तृतीय पक्षांना (उदा. एजंट्स, वितरक/पुनर्विक्रेते, लॉजिस्टिक्स प्रदाते, शासकीय मध्यस्थ इत्यादी) देखील लाच देऊ करणे, देणे किंवा घेणे यापासून निर्बंधित करण्यात आले आहेत.





# लाच आणि भ्रष्टाचार

पुढे चालू

**शासकीय अधिकाऱ्यांसोबत काम करणे**

आपण कुठल्याही शासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाच्या दरम्यान त्यांच्यावर प्रभाव पाडून काम मिळवण्यासाठी किंवा काम मिळणे सुरू ठेवण्यासाठी किंवा व्यावसायिक फायद्यासाठी प्रत्यक्षपणे किंवा अपरोक्षपणे कुठलीही मौल्यवान वस्तू देऊ करू नये, तसे वचन देऊ नये किंवा प्रत्यक्षात देऊ नये. शासकीय मालकीच्या संस्थांच्या कर्मचाऱ्यांसोबत व्यवहार करताना विशेष दक्षता घेतली पाहिजे, कारण काही देशांमध्ये त्यांना सुद्धा शासकीय अधिकारी समजले जाऊ शकते. खात्रीसाठी, कर्मचाऱ्यांनी नेहेमी समूह कायदा विभागाचा सल्ला घेतला पाहिजे, जेव्हा त्यांना शंका असेल की एखादी व्यक्ती शासकीय अधिकारी आहे किंवा नाही.

पान 40 वरील भेटवस्तू आणि आदरसत्कार विभाग पाहा ज्यात शासकीय  अधिकाऱ्यांसोबत काम करताना कशी सावधगिरी बाळगावी याबद्दल अधिक माहिती दिलेली आहे.

### हे मला कसे लागू होते?

- मी कधीही लाच देऊ करत, देत किंवा घेत नाही.
- मी लाच आणि भ्रष्टाचार टाळण्याची, शोधण्याची आणि त्याची सूचना देण्याची वैयक्तिक जवाबदारी घेतो/घेते.
- मी लाच किंवा भ्रष्टाचाराकडे जाणारे किंवा त्याचा संकेत देणारे कोणतेही कृत्य टाळतो.
- केवळ लाच किंवा भ्रष्टाचाराची कल्पना देखील जॉन्सन मॅथेच्या आणि माझ्या प्रतिष्ठेला हानी पोहचवू शकते आणि आमच्या व्यवसाय करण्याच्या क्षमतेला धक्का पोहचवू शकते.

**देवघेवीसाठी धोक्याचे इशारे**

तृतीय पक्षांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारामध्ये इशारे किंवा संकेत असू शकतात ज्याने कळते की काहीतरी बरोबर नाही. त्यांना व्यवहार चेतावणी चिन्हे किंवा "रेड फ्लॅग' असे म्हटले जाते आणि तपासणीसाठी यांच्याबद्दल नेहेमी समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला माहिती दिली पाहिजे. देवघेवीसाठी धोक्याचे इशारे कसे ओळखावे याबद्दल अधिक माहितीसाठी पान 52 वर दिलेली उदाहरणे पाहा.

## तुम्ही काय कराल?

**प्र. बहुमूल्य रसायनांच्या शिपमेंटला कस्टममधून येण्यास उशीर होत आहे. दुर्दैवाने हे काम जलद गतीने होण्यासाठी कोणतीही अधिकृत कार्यपद्धती नाही. परंतु तुम्हाला एका कस्टम अधिकाऱ्याने सांगितले की जर जॉन्सन मॅथेने एखादे लहानसे पेमेंट केले तर शिपमेंट उद्याच येईल, नाहीतर त्यासाठी काही आठवडे लागू शकतात.**

**उ.** अशा प्रकारचे पेमेंट म्हणजे सुलभता पेमेंट असून ते बेकायदेशीर आहे. असे पैसे देऊ नका आणि लगेच पुढील सल्ल्यासाठी तुमच्या व्यवस्थापकांना, समूह कायदा विभागाला किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला संपर्क साधा.

**प्र. तुमच्या सहकाऱ्याने तुम्हाला सांगितले की त्याने जॉन्सन मॅथेसाठी एक नवीन पुरवठादार ठरविला आहे. तुम्हाला याचे आश्चर्य वाटले, कारण तुम्हाला कळले होते की त्या पुरवठादाराचे दर बाजारपेठेपेक्षा अधिक होते. करार झाल्यानंतर काही काळाने तुमच्या सहकाऱ्याच्या मुलाला त्या पुरवठादाराने नोकरी दिली हे कळल्यावर तुम्हाला संशय आला.**

**उ.** तुम्हाला याबद्दल **वाचा फोडली** पाहिजे. हा मुद्दा तुम्ही तुमच्या व्यवस्थापकांसमोर, समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागासमोर मांडला पाहिजे. तुमच्या सहकाऱ्याने त्यांच्या मुलाच्या नोकरीच्या रुपाने लाच घेतलेली असू शकते. हे खरे असले, तर तुमच्या सहकाऱ्याच्या निर्णयाने जॉन्सन मॅथेला इतर पुरवठादारांकडून मिळू शकणाऱ्या फायदेशीर ऑफर्सपासून वंचित तर केले आहेच, पण हा एक गुन्हा सुद्धा ठरू शकतो आणि अशाने जॉन्सन मॅथेवर कायदेशीर दायित्व येऊ शकते. तुम्ही तुमची शंका लगेच बोलून दाखवली पाहिजे, जेणेकरुन त्याची तपासणी केली जाऊ शकेल आणि गरज पडल्यास तुमच्या सहकाऱ्याच्या वर्तनाच्या विपरीत परिणामाचा प्रभाव कमी करता येईल.



**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- मायजेएम समूह नैतिकता आणि अनुपालन साईट
- जागतिक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण
- उच्च जोखीम तृतीय पक्ष मध्यस्थ कार्यपद्धती
- समूह कायदेशीर
- समूह नैतिकता आणि अनुपालन

# भेटवस्तू आणि आतिथ्यशीलता

**भेटवस्तू आणि आदरातिथ्य देऊ करताना, देताना किंवा घेताना आम्ही सावधगिरी बाळगतो.**

भेटवस्तू आणि आदरातिथ्याचा उपयोग कायदेशीर आणि मैत्रीपूर्ण व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी किंवा त्यांना टिवकण्यासाठी केला जाऊ शकतो. तरीही, काही वेळा एक निर्व्याज भेटवस्तू किंवा आदरातिथ्य आणि लाच यांच्यामध्ये फरक करणे अवघड असू शकते, आणि जॉन्सन मॅथेचा पैसा किंवा साधने कशी खर्च करावीत याबद्दल आपल्याला नेहेमी जाणीवपूर्वक विचार केला पाहिजे.

जेव्हा कोणतीही भेट किंवा आदरातिथ्य देऊ केले, दिले किंवा घेतले जाते तेव्हा ते आमच्या जागतिक लाच आणि भ्रष्टाचार धोरणाच्या अनुसार आणि कोणत्याही पूर्व मंजूरी, आर्थिक मर्यादांशी संबधित तुमच्या व्यवसायाला लागू होणाऱ्या स्थानिक पध्दतींप्रमाणे आहे का नाही हे ओळखण्यासाठी तुमच्या विवेकाने निर्णय घ्या. तसेच, हे बाहेरच्या जगाला कसे दिसेल याबद्दल अधिक विस्तृत विचार करा आणि याचा ही विचार करा की हा जॉन्सन मॅथेच्या पैशाचा आणि साधनांचा सदुपयोग आहे किंवा नाही. शंका असल्यास, अधिक मार्गदर्शनासाठी समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग यांचा सल्ला घ्या.

कुठलीही भेटवस्तू किंवा आदरातिथ्य असे असले पाहिजे:

**सद्भावनेने** – केवळ कायदेशीर व्यावसायिक संबंध प्रस्थापित करण्याच्या किंवा राखण्याच्या उद्देशाने किंवा सर्वसामान्य शिष्टाचार पाळण्याच्या उद्देशाने किंवा खालील उद्देशांसाठी भेट किंवा आदरातिथ्य

- देऊ केले, दिले किंवा घेतले असले पाहिजे:
  - **फारच कमी** किंवा किमान मूल्य असलेले (उदा. लहानशी प्रचारात्मक वस्तू, डायरी, कॅलेंडर्स किंवा तत्सम वस्तू ज्यावर पुरवठादाराचा ब्रँड किंवा लोगो असेल); किंवा
  - **कमी** किमतीची वस्तू जी वारेमाप किंवा खर्चिक नसेल. प्रकार, किंमत आणि प्रसंगाच्या मानान
- **वाजवी आणि योग्य** असावी, तसेच विशिष्ट कारणास्तव दिली असावी, जसे की स्थानिक सांस्कृतिक प्रसंगांच्या वेळी. योग्य व्यवसाय पद्धतींशी
- **सुसंगत** असावी.
- **कायदेशीर** असावी, तसेच स्वीकारणाऱ्या व्यक्तीच्या भेटवस्तू आणि आदरातिथ्य धोरणामध्ये मान्य असणारी असावी.

**शासकीय अधिकाऱ्यांना भेट देणे आणि त्यांचे आदरातिथ्य करणे.**

- काही देशांमध्ये शासकीय अधिकारी कुठल्या प्रकारच्या भेटवस्तू आणि आदरातिथ्य स्वीकारु शकतात, तसेच त्यांची किंमत किती पर्यंत असावी याबद्दल फार कडक कायदे आहेत. अशा मुळे, कुठल्याही शासकीय अधिकाऱ्याला भेटवस्तू आणि आदरातिथ्य देऊ करताना, देताना किंवा त्यांच्याकडून घेताना तुम्हाला अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे आणि त्यासठी पूर्वमंजुरी घेतली पाहिजे. तसेच, आपल्याला माहीत असायला हवे की 'शासकीय अधिकारी' कोण कारण याची परिभाषा निरनिराळ्या देशांमध्ये निराळी असू शकते, आणि शासनाच्या मालकीच्या व्यवसायांमधील लोक सुद्धा या परिभाषेत असू शकतात. लक्षात ठेवा, कोण शासकीय अधिकारी आहे हे नेहेमीच स्पष्ट कळत नाही, तेव्हा तुम्ही कोणासोबत व्यवहार करीत आहात याबद्दल जर तुम्हाला शंका असेल, तर समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाचा सल्ला घ्या.

### हे मला कसे लागू होते?

- मी कधीही लाच म्हणून किंवा तत्सम वाटणारी भेटवस्तू किंवा आदरातिथ्य देऊ करत, देत किंवा घेत नाही.
- मी कुठलीही भेटवस्तू किंवा आदरातिथ्य देऊ करण्याआधी, देण्याआधी किंवा घेण्याआधी काळजीपूर्वक विचार करतो/करते आणि याचा ही विचार करतो/करते की हे जेएमच्या वैश्विक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरणाशी सुसंगत आहे किंवा नाही.
- मी नेहमी शासकीय अधिकाऱ्यांना भेट किंवा आदरातिथ्य देऊ करण्याचा किंवा देण्याचा विचार करताना तसे करण्याआधी परवानगी घेतो/घेते.
- मला भेट किंवा आदरातिथ्याच्या योग्यतेविषयी कोणतीही शंका असल्यास मी पूर्व परवानगी मिळवतो/मिळवते.

**विशिष्ट प्रकारच्या भेटवस्तू किंवा आदरातिथ्याची उदाहरणे ज्यांचे कितीही मूल्य असले तरीदेखील ती मान्य केली जात नाहीत ती खालीलप्रमाणे आहेत:**

- रोख किंवा रोख सदृश वस्तू.
- अनुचित किंवा अपमानास्पद (उदा. शालीन नसलेले किंवा लैंगिक प्रवृत्तीच्या) वस्तू.
- निर्बंध असलेले (खुलेपणाऐवजी गुप्तपणे उपलब्ध करुन दिले जाणारे).
- हित-संबंधांमधील घातक असणारे किंवा घातक ठरू शकणारे.



# भेटवस्तू आणि आदरसत्कार

पुढे चालू

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्हाला एका पुरवठादाराकडून £50 (पन्नास पाउंड, साधारण रु. 5,000) किमतीचे भेट कार्ड मिळाले आहे. याचा वापर फक्त एका विशिष्ठ दुकानांच्या गटामधून खरेदी करण्यासाठीच केला जाऊ शकतो. तुम्ही याचा स्वीकार करू शकता का?**

उ. नाही, कुठल्याही व्यावसायिक जोडीदाराकडून तुम्ही भेट कार्ड, सर्टिफिकेट किंवा व्हाउचरचा स्वीकार करू शकत नाही, मग त्याची किंमत किती ही असो, कारण हे रोख रकमे सारखेच आहे आणि आपल्या धोरणाप्रमाणे आपण रोख किंवा रोख रकमे सारख्या भेटवस्तू कोणालाही देऊ शकत नाही किंवा कोणाकडून स्वीकार करू शकत नाही. तुम्ही नम्रपणे हे भेट कार्ड नाकारले पाहिजे आणि पुरवठादाराला समजावून सांगायला हवे की जेएमच्या भेटवस्तू आणि आदरातिथ्य निर्देशिकेमुळे तुम्हाला याचा स्वीकार करता येणार नाही.

**प्र. तुम्हाला तुमच्या मुख्य ग्राहकांसाठी आणि इतर व्यावसायिक जोडीदारांसाठी दोन दिवसांची तांत्रिक परिषद भरवायची आहे. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश्य भविष्यातील तांत्रिक विकासाचा पुरस्कार करणे आणि व्यावसायिक संबंधांना मजबुती देणे असा आहे. हे योग्य आहे का?**

उ. होय. स्पष्ट व्यावसायिक उद्दिष्ट असलेली परिषद भरविणे जेएममध्ये स्वीकार्य व्यावसायिक कार्यपद्धत आहे. तुमच्या परिषदेचे व्यवस्थापन करताना तुम्हाला भेटवस्तू आणि आदरातिथ्य नियमांचे पालन करणे लक्षात ठेवले पाहिजे. खाणे, राहाणे आणि इतर मोकळ्या वेळात करण्याचे कार्यक्रम यांच्या सकट सर्व आदरातिथ्य योग्य मूल्याचे असून अवाजवी आणि खर्चिक असता कामा नये. तुमच्या पाहुण्यांचा प्रवासाचा खर्च सामील करणे सामान्य कार्यपद्धतीत बसत नाही. जर तुम्हाला नक्की माहीत नसेल किंवा अधिक मार्गदर्शन हवे असेल, तर समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाशी संपर्क साधा.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- मायजेएम समूह नैतिकता आणि अनुपालन साईट
- जागतिक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण
- स्थानिक भेटवस्तू आणि आदरातिथ्य नियम/मार्गदर्शन
- कायदे विभाग
- समूह नैतिकता आणि अनुपालन

# प्रामाणिक स्पर्धा

**प्रामाणिकपणे आणि उघडपणे स्पर्धा करणे व्यवसायासाठी उत्तम आहे हे आम्हाला माहीत आहे.**

स्पर्धात्मक बाजारपेठांमध्ये ग्राहकांना उच्च दर्जाचा माल सर्वोत्तम किमतींमध्ये मिळतो आणि त्यामुळे सर्वात सक्षम कंपनींना अस्तित्व टिकवण्याची आणि प्रगती करण्याची संधी मिळते.

प्रतिस्पर्धा कायदे (ज्यांना काही वेळा विश्वास-विरोधी किंवा एकाधिकार-विरोधी कायदे म्हटले जाते) गुंतागुंतीचे असू शकतात आणि निरनिराळ्या देशांमध्ये निराळे असू शकतात. तरी देखील त्यांच्यामध्ये काही सामाईक घटक असतात जे पुरवठा साखळीतील इतरांसोबत (विशेषतः आपल्या स्पर्धकांसोबत) आपल्या करारांबद्दल, व्यावसायिक दृष्टीने संवेदनशील माहिती इतरांना देण्याबद्दल, आणि आपल्याकडे एखाद्या बाजारपेठेचा किंवा व्यवसायाचा सिंहाचा वाटा असल्यावर आपण कसे वर्तन करतो याबद्दल असतात.

स्पर्धा-विरोधी असणाऱ्या खालील कृतींपासून सावधान रहा:

- किमती, ग्राहक किंवा नीति यांच्यासकट प्रतिस्पर्धेच्या दृष्टीने संवेदनशील माहितीबद्दल आपल्या स्पर्धकांशी चर्चा करणे किंवा ही माहिती त्यांना देणे.
- ग्राहक, विभाग किंवा बाजारपेठांची प्रतिस्पर्ध्यांसोबत विभागणी किंवा भागीदारी करण्याबद्दल चर्चा करणे किंवा अशा विभागणीला मान्य करणे.
- आपण विशिष्ट करारनाम्यांसाठी कशाप्रकारे बोली लावणार आहोत (किंवा लावणार आहोत की नाही) हे प्रतिस्पर्ध्यांशी मिळून ठरवणे.





# प्रामाणिक स्पर्धा

पुढे चालू

### हे मला कसे लागू होते?

- मला तृतीय पक्षांशी (विशेषतः प्रतिस्पर्ध्यांशी, माझ्या पुरवठा साखळीतील लोकांशी आणि ग्राहकांशी) व्यवसाय करताना स्पर्धात्मक कायदे जोखमींची कल्पना आहे आणि जॉन्सन मॅथेने किमती आणि नीति यावर स्वतंत्र निर्णय घेतले पाहिजेत हे मी समजतो/समजते आणि त्याची खात्री देतो/देते.
- मी कधीही स्पर्धा-विरोधी कामे करणार नाही.
- जॉन्सन मॅथेच्या एका भागातील ग्राहक त्याच्या दुस-या विभागामध्ये स्पर्धक असू शकतो याची मला कल्पना आहे आणि मी त्याप्रमाणे वागण्याची खात्री देतो/देते.
- मी खात्री देतो/देते की जेव्हा मी आपल्या प्रतिस्पर्धीला भेटतो/भेटते, तेव्हा आपली स्पर्धा असलेल्या क्षेत्रांमधील गुप्त माहितीबद्दल चर्चा करण्याचे किंवा ती माहिती त्यांना देण्याचे मी टाळतो/टाळते. भेटण्यापूर्वीच जॉन्सन मॅथे प्रतिस्पर्धकांच्या भेटीचा फॉर्म भरणे आणि/किंवा भेटीचे उद्देश्य दर्शविणारी विषय-पत्रिका सविस्तर लिहीणे अशाने भेटीचे उद्देश्य स्पष्ट होण्यास आणि जॉन्सन मॅथेचे आणि माझेही संरक्षण होण्यास मदत होते.



## तुम्ही काय कराल?

**प्र. सध्या निविदा भरल्या जात असलेल्या कंत्राटाबद्दल चर्चा करण्यासाठी तुम्ही ग्राहकाला भेटायला जात आहात. वाटाघाटींच्या दरम्यान ग्राहक तुम्हाला तुमच्या प्रतिस्पर्धकाच्या बोलीची कल्पना देतात आणि तुम्हाला त्यांच्या बोलीची प्रत देऊ करतात.**

**उ.** ग्राहकांनी ही माहिती तुमच्यासमोर व्यावसायिक वाटाघाटींच्या दरम्यान केली आहे आणि याचे एकमेव कारण त्यांना जॉन्सन मॅथेकडून अधिक चांगल्या अटी मिळवणे असे आहे, त्यामुळे तुम्ही या माहितीचा वापर करू शकता, पण यासाठी तुम्हाला ही माहिती कुठून मिळाली हे स्पष्टपणे लेखी नमूद करून ठेवावे लागेल. पण, तुम्ही प्रतिस्पर्धकांच्या बोलीची प्रत घेण्याचे सर्वस्वी नाकारावे. जर तुम्हाला ती कागदपत्रे आधीच मिळाली असतील, तर तुम्ही समूह कायदा विभागाशी लागलीच संपर्क साधून यापुढे काय करावे लागेल हे ठरवावे.

**प्र. तुम्ही तुमच्या एका ग्राहकासोबत जेवत आहात ज्यांना तुम्ही जॉन्सन मॅथेच्या इतर विभागाचे प्रतिस्पर्धक म्हणून ओळखता. तुमच्यातील संवाद एका विशिष्ट बाजारपेठेतील तुमच्या ग्राहकांच्या किमती-संबंधी अडचणींकडे वळतो. तुम्हाला त्या बाजारपेठेची माहिती नसल्यामुळे तुम्हाला नक्की माहीत नाही की इथे प्रतिस्पर्धेचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो किंवा नाही, पण होऊ शकतो अशी तुम्हाला काळजी वाटते.**

**उ.** तुम्ही लगेच नम्रपणे हा गप्पांचा ओघ थांबवून आणि तुमची काळजी व्यक्त त्यांच्यासमोर व्यक्त करून स्वतःच्या काळजीचे निरसन करायला हवे. जेवण संपून परतल्याबरोबर लगेचच समूह कायदा विभागाशी संपर्क साधून पुढे काही कारवाईची गरज आहे का याची चौकशी करायला हवी.



**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- वैश्विक स्पर्धा कायदे धोरण आणि मार्गदर्शन
- समूह कायदेशीर
- समूह नैतिकता आणि अनुपालन
- जॉन्सन मॅथे स्पर्धक मीटिंग फॉर्म

# आर्थिक गुन्हा

**सतर्क राहण्यासाठी आणि गुन्हेगारी दर्शविणारे इशारे ओळखण्यासाठी आपण सर्वजण जबाबदार आहोत.**

जॉन्सन मॅथेमध्ये आपला व्यवसाय आणि सेवा यांचा वापर आर्थिक गुन्हेगारी साठी, जसे पैशांची अफरा-तफर, कर अपवंचन आणि आतंकवादासाठी पैसा पुरवणे अशा कामांसाठी, किंवा ज्यामुळे गुन्हेगारीचे मूळ लपविले जाऊ शकेल अशा इतर बेकायदेशीर कामांसाठी केला जात नाही याची आम्ही खात्री करतो.

म्हणूनच हे फार महत्वाचे आहे की आपल्याला आपल्या ग्राहकांच्या, पुरवठादारांच्या आणि इतर तृतीय पक्षांच्या ओळखीबद्दल, पार्श्वभूमिबद्दल आणि कामाबद्दल पुरेशी माहिती असायला हवी जेणेकरून आपण कुठल्याही अयोग्य व्यवहाराला थांबवू शकू.

- पैशाची अफरातफर म्हणजे गुन्हेगारी कृतीमधून येणारा पैसा घेणे, बेकायदेशीरपणे मिळवलेल्या पैशाचे मूळ लपवणे आणि त्याला अनेक व्यवहारांमार्फत 'स्वच्छ' असल्याचे दाखवून कायदेशीररित्या सिद्ध करणे होय.
- कर-अपवंचनेला मदत करणे हा एक कॉर्पोरेट गुन्हा आहे आणि यात एखाद्या कंपनीचे 'संबंधित व्यक्ती' (उदा. कर्मचारी, एजंट्स किंवा असे इतर लोक जे कंपनीच्या वतीने किंवा कंपनीच्या नावाने सेवा देतात) मुद्दाम आणि बेइमानी करून एखाद्या तृतीय पक्ष करदात्याला (उदा. ग्राहकाला) कर-चोरी करण्यात मदत करतात.
- आतंकवादाला पैसा पुरवणे यासाठी मुख्यतः वैचारिक भूमिकेतून प्रेरणा मिळते, पैशाच्या लोभाने नाही, आणि यात केवळ गुन्हेगारीचा पैसाच नाही, तर कायदेशीर मार्गांतून मिळवलेला पैसा किंवा संपदा यांचा ही समावेश असू शकतो.



### हे मला कसे लागू होते?

- आपण कोणासोबत काम करीत आहोत हे माहीत करून घेण्याची गरज मला कळते आणि मी संबंधित संपूर्ण माहितीची प्रक्रिया पूर्ण केली आहे.
- मी ग्राहकाच्या, पुरवठादाराच्या किंवा इतर तृतीय पक्षाच्या माहिती, परिस्थिती आणि स्वरुपामध्ये होणाऱ्या अशा कोणत्याही बदलाबद्दल जागरूक असतो/असते ज्यामुळे आर्थिक जोखीम वाढू शकते.
- संशयास्पद व्यक्ती, विनंती, व्यवहार आणि/किंवा पैशाच्या व्यवहारांची यांची सूचना देण्याची मी नेहेमीच वैयक्तिक जबाबदारी घेतो/घेते.



**देवघेवीसाठी धोक्याचे इशारे**

तृतीय पक्षांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारामध्ये इशारे किंवा संकेत असू शकतात ज्याने कळते की काहीतरी बरोबर नाही. त्यांना व्यवहार चेतावणी चिन्हे किंवा "रेड फ्लॅग' असे म्हटले जाते आणि तपासणीसाठी यांच्याबद्दल नेहेमी समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला माहिती दिली पाहिजे. देवघेवीसाठी धोक्याचे इशारे कसे ओळखावे याबद्दल अधिक माहितीसाठी पान 52 वर दिलेली उदाहरणे पाहा.

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही एका शुद्धीकरण करणाऱ्या नवीन ग्राहकासोबत काम सुरु केले आहे. त्या ग्राहकाने अलिकडेच विनंती केली आहे की त्यांच्या बँक खात्याचा तपशील बदलून दुसरे बँक खाते वापरले जावे जे पैशाच्या अफरा-तफरीबाबत अधिक उच्च जोखीम असलेल्या क्षेत्रामध्ये आहे, आणि अशीही विनंती केली आहे की आपण त्यांचे धातू एक अतिशय विविक्षित वेळी एका असंबंधित तृतीय पक्षाला पाठवावे.**

**उ.** तुमच्या ग्राहकांनी अशी विनंती करण्याची कायदेशीर कारणे असू शकतात, तरीही दोन्ही विनंत्या देवघेवीसाठी धोक्याचे इशारे असू शकतात. या विनंतीमागाची कारणे समजून घेण्यासाठी तुम्हाला तुमच्या ग्राहकाशी संवाद साधला पाहिजे. जर ग्राहकाने स्पष्टीकरण देण्यास टाळाटाळ केली किंवा अनिच्छा दर्शवली, तर तुम्हाला जेएमच्या या ग्राहकासोबत असलेल्या संबंधांचे पुनर्मूल्यांकन केले पाहिजे. हे धोक्याचे इशारे समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाच्या निदर्शनास आणून दिले पाहिजेत.

**प्र. एके दिवशी एका जेएम कंत्राटदाराने तुम्हाला सांगितले की त्यांना कंत्राटदार म्हणूनच काम करायला आवडते, पूर्ण वेळ पगारी कर्मचारी म्हणून नाही, कारण अशाने त्यांना फार कर द्यावे लागत नाहीत.**

**उ.** या संवादावरून असे वाटते की हे कंत्राटदार कर-अपवंचन करीत असावेत, आणि अशाने जॉन्सन मॅथेवर कर-अपवंचन करणे सुलभ करण्याच्या कॉर्पोरेट अपराधाचा धोका उद्भवू शकतो. तुम्हाला तुमची शंका समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाकडे लगेच सांगायला हवी.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- मायजेएम समूह नैतिकता आणि अनुपालन साईट
- समूह कायदेशीर
- समूह नैतिकता आणि अनुपालन
- समूह वित्त विभाग
- समूह कर विभाग
- समूह मानव संसाधन विभाग

# व्यापार आणि निर्यात नियंत्रणे

**आंतरराष्ट्रीय व्यवहार करताना आम्हाला आमची जबाबदारी समजते.**

जॉन्सन मॅथेच्या बहुतांश व्यवसायामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर माल, तंत्रज्ञान, सेवा, डेटा आणि पैशाची देवाण-घेवाण होते आणि असे करताना सर्व लागू असलेल्या कायद्यांचे पालन झालेच पाहिजे.

अशी देवाण-घेवाण निर्यात परवाना गरजांच्या, अंतिम उपयोग/उपयोगावरील मर्यादा, देशावरील निर्बंध, सूचीबद्ध लोक, संस्था किंवा बँकांसोबत व्यवहारावर प्रतिबंध, किंवा कस्टम्स आणि/किंवा कर-संबंधी आवश्यकतांच्या आधीन असू शकतात. त्यामुळे हे आपल्याला माहित असणे फार महत्वाचे आहे की आपण कसली देवाण-घेवाण करीत आहोत आणि आपण ते कोणासाठी करत आहोत, जेणेकरून आपण त्या आवश्यकता पूर्ण करू शकू.

**माला**मध्ये कच्चा माल, तयार उत्पादने, मोफत नमुने, उत्पादन आणि संशोधन उपकरणे तसेच भांडवली मालाचा समावेश होतो. **तंत्रज्ञाना**मध्ये चित्र, ब्लू प्रिंट्स, प्लॅन्स, आराखडे, मॉडेल्स, डिझाइन्स, तपशील, मॅन्युअल्स, दिशा-निर्देश आणि तंत्रज्ञान यांचा समावेश होतो – मग हे सर्व डिजिटल स्वरूपात पाठवलेले असो किंवा भौतिक स्वरूपात.

**नेहमी खालील मुद्दे विचारात घ्या**

- **काय:** उत्पादन वर्गीकरण: कशाची आयात किंवा निर्यात केली जात आहे? हे सॉफ्टवेअर किंवा तांत्रिक माहिती असे उत्पाद आहेत का? समान किंवा तंत्रज्ञानाचा प्रकार, किंवा त्यांचा संभाव्य वापर अशा प्रकारचा आहे का की त्यासाठी निर्यात परवाना काढण्याची गरज असू शकेल?
- **कुठे:** स्थळ: हे सर्व कुठे जाते आहे? अंतिम स्थळ असलेल्या देशामध्ये कुठले निर्बंध, प्रतिबंध किंवा इतर मर्यादा आहेत का?
- **कोण:** अंतिम वापरकर्ते: माल कोणाला मिळणार आहे? तुम्ही व्यवहार करीत असलेली व्यक्ती किंवा संस्था 'निर्बंधित' आहे का?
- **कसे:** अंतिम वापर: याचा वापर कसा होईल? वस्तूच्या संभाव्य किंवा अपेक्षित वापरावर काही मर्यादा घातलेल्या आहेत का?

# व्यापार आणि निर्यात नियंत्रणे

पुढे चालू

### हे मला कसे लागू होते?

- मला या गोष्टीची जाणीव आहे की माल, तंत्रज्ञान, सेवा, डेटा किंवा पैसा यांचे (जरी स्थानांतरण जॉन्सन मॅथेच्याच दुसऱ्या केंद्रात किंवा इतर जॉन्सन मॅथेच्या कंपनीत होत असले तरी) आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थानांतरण होत असताना ते निर्यात नियंत्रणांच्या आधीन आहे.
- मला या गोष्टीची जाणीव आहे की तंत्रज्ञानाचे स्थानांतरण भौतिक, इलेक्ट्रॉनिक (उदा. ईमेल), लिखित आणि मौखीक देवाणघेवाणीच्या, त्याचप्रमाणे दृश्य निरीक्षणांच्या स्वरुपात सुद्धा केले जाऊ शकते.
- मला माल, तंत्रज्ञान, सेवा, डेटा किंवा पैसा यांच्या स्थानांतरण मंजूरीविषयी शंका असल्यास मी त्याबद्दल नेहेमीच प्रश्न विचारतो/विचारते.
- मला या गोष्टीची जाणीव आहे की माझ्यावर किंवा माझ्या गटातील सदस्यांवर आमच्या राष्ट्रीयत्वामुळे निर्बंध येऊ शकतो आणि आम्ही विशिष्ट देशाशी संबंधित असलेल्या प्रकल्पामध्ये किंवा व्यवसायामध्ये कार्यरत असल्यास किंवा त्यांना सेवा देत असल्यास आमच्यावर बंधने येऊ शकतात.

**देवघेवीसाठी धोक्याचे इशारे**

तृतीय पक्षांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारामध्ये इशारे किंवा संकेत असू शकतात ज्याने कळते की काहीतरी बरोबर नाही. त्यांना व्यवहार चेतावणी चिन्हे किंवा "रेड फ्लॅग' असे म्हटले जाते आणि तपासणीसाठी यांच्याबद्दल नेहेमी समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाला माहिती दिली पाहिजे. देवघेवीसाठी धोक्याचे इशारे कसे ओळखावे याबद्दल अधिक माहितीसाठी पान 52 वर दिलेली उदाहरणे पाहा.

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही कॅनडा येथील एका नवीन ग्राहकासाठी उत्प्रेरकांची प्रथम विक्री पूर्ण करीत आहात, यात भविष्यात आणखी मोठी विक्री होण्याची शक्यता आहे. या विक्रीमुळे तुमचा व्यवसाय या वर्षाचे आपले बजेट पूर्ण करेल आणि तुम्हाला वितरणाबद्दलच्या त्यांच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत. तुम्ही ग्राहकाला काही तपशीलांना अंतिम स्वरूप देण्यासाठी दूरध्वनी करता आणि ते सांगतात की त्यांना या आधी त्यांच्या क्यूबा आणि वेनेझुएला मधील प्लांट्ससाठी उत्प्रेरक पुरवठादार मिळाले नव्हते. यावर तुम्हाला आश्चर्य वाटते आणि कॉल झाल्यानंतर तुम्ही सर्व कागद-पत्रे तपासून पाहाता आणि तुम्हाला कळते की या दोन देशांबद्दल कुठेही उल्लेख केलेला नाही.**

**उ.** तुमच्या क्षेत्रीय कायदा गटाशी आणि समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाशी संपर्क साधा आणि त्यांना तुम्हाला काय आढळले आहे ते सांगा आणि विचारा की ही विक्री पूर्ण करता येईल का? त्या देशाला माल पाठवला आहे किंवा नाही याकडे दुर्लक्ष करून, अशा प्रतिबंधित देशांसाठी विक्री केल्याने जेएमला मोठा दंड भरावा लागू शकतो, तसेच इतर ग्राहक गमवावे लागू शकतात कारण त्यांना यानंतर आपल्यासोबत व्यवसाय करण्याची इच्छा नसेल, इतर संबंधित लोक किंवा संस्था (जसे बँका किंवा लॉजिस्टिक्स पुरवठादार) यांचा विश्वास आपण गमावू शकतो आणि आपल्या प्रतिष्ठेचेसुद्धा नुकसान होईल. तुमचा क्षेत्रीय कायदा गट आणि समूह नैतिकता आणि अनुपालन विभाग सर्व संबंधित पक्षांसाठी संपूर्ण माहितीची प्रक्रिया करू शकतील, एखादी विक्री करण्याची परवानगी आहे किंवा नाही याचे मूल्यांकन करू शकतील, बँकांसोबत काम करणे आणि माल पाठविण्यासाठी नियामक प्राधिकरणांकडून संबंधित परवानगी मिळवतील.

**प्र. व्यवसायांतर्गत तुम्ही परदेशांमध्ये एक नवीन प्रकल्प उभारणार आहे आणि व्यवसाय नियंत्रणे विचारात घ्यावीत का याबद्दल तुम्ही साशंक आहात.**

**उ.** नवीन प्रकल्पासाठी उत्पादन उपकरणे किंवा कच्चा माल पाठवताना निर्यात आणि/किंवा आयात परवान्यांची गरज असू शकते. तसेच, त्या देशामध्ये तंत्रज्ञान पाठवले किंवा तांत्रिक सेवा दिल्या असल्यास त्यासाठी सुद्धा परवान्यांची गरज भासू शकते. अधिक मार्गदर्शनासाठी समूह कायदा विभागाशी बोला.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- जॉन्सन मॅथे संघ व्यापार आणि निर्यात मर्यादा धोरण
- जॉन्सन मॅथे व्यापार अनुपालन मॅन्युअल
- कायदा विभाग
- समूह नैतिकता आणि अनुपालन

# देवघेवीसाठी धोक्याचे इशारे

**देवघेवीसाठी धोक्याच्या इशाऱ्यांबद्दल किंवा "रेड फ्लॅग' बद्दल आपण नेहेमी सावध असले पाहिजे.**

जरी तुम्ही तृतीय पक्षांबरोबरच्या कामामध्ये प्रत्यक्षरित्या गुंतलेला नसलात, तरीही तुम्हाला अशा गोष्टींची माहिती असायला पाहिजे की जिथे जॉन्सन मॅथे साठी जोखीम असू शकते. लक्षात ठेवा, कुठल्याही किमतीवर व्यवसाय करणे गरजेचे नाही.

देवघेवीसाठी धोक्याचे इशारे अशा सूचना असतात ज्याने कळते की या व्यवहारात काही तरी काळेबेरे असू शकते. या अशा सूचना असे इशारे असू शकतात की जे सांगतात लाच आणि भ्रष्टाचार, आर्थिक गुन्हा, प्रतिबंध आणि निर्यात नियंत्रणे, किंवा इतर कायदेशीर किंवा अनुपालन या पैकी एक किंवा अनेक दृष्टीने काही तरी चूक आहे. एका धोक्याच्या इशाऱ्यातून अनेक समस्या उद्भवू शकतात. खालील यादी संपूर्ण नाही:

- तृतीय पक्ष प्रश्नांची कोणतीही किंवा पुरेशी माहिती संपूर्ण माहितीच्या प्रक्रियेत उत्तरादाखल देण्यास नकार देतात.
- तृतीय पक्षांकडून नेहेमीपेक्षा निराळे पेमेंट आराखडे दिले जात आहेत, यात असे पेमेंट सामील आहेत:
  - रोख किंवा 'लेखी पुरावा नसलेले';
  - अशा क्षेत्रांतून किंवा अशा क्षेत्रांना पेमेंट जे पैशांच्या अफरा-तफरीच्या बाबतीत किंवा कर-अपवंचनाच्या बाबतीत उच्च जोखीम असलेले आहेत;
  - अशा पक्षाकडून किंवा अशा पक्षाला ज्यांचा आणि जॉन्सन मॅथे यांचा काहीच संबंध नाही; आणि
  - पेमेंटसाठी कुठलेही इनव्हॉइस किंवा पावती न देता.
- इनव्हाइसमध्ये पुरेशा प्रमाणात वर्णन न केलेल्या किंवा काम करण्याच्या अपुऱ्या पुराव्याच्या स्थितीत पेमेंट करणे.
- तृतीय पक्ष मध्यस्थांना फार अधिक कमीशनवर किंवा खूप मोठ्या रकमेसाठी एक-रकमी पेमेंट करणे.
- तृतीय पक्षांना एकसारख्या भेटवस्तू आणि आदरातिथ्य, दानधर्म किंवा प्रायोजकत्व दिले जात आहे ज्यासाठी पुरेशी कारणे नाहीत.
- तृतीय पक्षाचे नाव किंवा पत्ता नकार दिलेल्या किंवा प्रतिबंधित पक्ष सूचीमधील एका पक्षासारखा असल्यास.
- ग्राहक किंवा खरेदी करणारा एजंट मालाच्या अंतिम वापराबद्दल माहिती देण्यास अनिच्छुक आहे किंवा माल कुठे पाठवायचा यासाठी नेहेमीपेक्षा निराळा पत्ता देत आहे.
- तृतीय पक्षाने माल पाठविण्यासाठी नेहेमीपेक्षा निराळ्या अटी सांगितल्या आहेत किंवा निराळी व्यवस्था करायला सांगितले आहे (बहुधा माल नक्की कोणाला पाठवला जात आहे हे लपविण्यासाठी).
- एखाद्या विशिष्ट ग्राहक, पुरवठादार किंवा एखाद्या प्रकारच्या ग्राहक किंवा पुरवठादासाठी झालेली अशी खरेदी किंवा विक्री जी सहसा त्यांच्यासाठी होत नाही (उदा. जी त्यांच्या व्यवसायाशी संबंधित नसेल किंवा त्यांच्या तांत्रिक क्षमतेनुसार नसेल).



कुठल्या ही देवघेवीसंबंधी धोक्याच्या इशाऱ्याला समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाकडे सूचित करा, जे तुम्हाला आधी परिस्थितीचा आढावा घेऊन नंतर पुढे काम करण्यास मदत करतील.

# कंपनी

मी जॉन्सन मॅथेचा ब्रॅंड, संपदा आणि प्रतिष्ठेला
सुरक्षित ठेवण्याचे वचन देत आहे.



| | |
|---|---|
| कॉर्पोरेट सुरक्षा | 56 |
| माहिती सुरक्षा | 59 |
| बौद्धिक संपदा | 62 |
| व्यवसाय आणि आर्थिक अहवाल सादर करणे | 64 |
| रेकॉर्ड्सची अचूकता | 66 |
| बाह्यतः संपर्क साधणे | 68 |
| सामाजिक माध्यमे | 71 |
| अंतर्गत माहिती | 73 |




# कॉर्पोरेट सुरक्षा

**सर्वांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वाटेल याची आम्ही खात्री करतो.**

जॉन्सन मॅथेमध्ये, आम्ही सुरक्षित कार्य वातावरण देण्यासाठी आणि सुरक्षा जोखमींचा परिणाम कमी करण्यासाठी व्यवसाय करताना अतिशय खबरदारी घेतो.

आम्ही  सुरक्षा-जोखमींचे प्रभावी व्यवस्थापन करून आमच्या लोकांचे, मालमत्तेचे, उत्पादांचे आणि प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आमच्या संपूर्ण कंपनीमध्ये सुरक्षा मानकांचा एक किमान स्तर बाळगून आणि त्याचे पालन करून, तसेच  व्यावसायिक सातत्याची खात्री करण्यासाठी उपाययोजना लागू करून आम्ही तसे करतो. जॉन्सन मॅथेच्या मूल्यांप्रमाणे सुरक्षा ही नेहेमीच सर्वोपरि राहाणार आणि अशा जोखमी कमी करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना आपली भूमिका वठवावी लागणार ज्या  स्थानिक सुरक्षेचा जाणूनबुजून किंवा अपघाती भंग झाल्यामुळे किंवा सहकाऱ्यांना जोखीम असल्यामुळे उद्भवतात.

### वैयक्तिक सुरक्षा आणि व्यावसायिक कारणांस्तव प्रवास

जॉन्सन मॅथे कर्मचाऱ्यांना ते जिथे काम करतात त्या ठिकाणी किंवा ते जिथे प्रवास करणार असतील तिथे असलेल्या सुरक्षा जोखमींसाठी वाजवी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन करते. आपल्या समोर असलेल्या सुरक्षा जोखमींची जाण ठेवणे, तसेच सुरक्षा-संबंधी काही घटना घडल्यावर तिला प्रत्युत्तर कसे द्यावे हे माहीत असणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.



जॉन्सन मॅथेचे कर्मचारी म्हणून आपल्याला काही वेळा व्यावसायिक कारणांसाठी प्रवास करावा लागतो आणि जरी व्यावसायिक मुद्दे महत्वाचे असले, तरी ते वैयक्तिक सुरक्षेपेक्षा ते कधीही महत्त्वाचे नसतात. आम्ही ही खात्री करण्यासाठी प्रतिबद्ध आहोत की प्रवासाला जाण्यापूर्वी सर्वांना संपूर्ण माहिती आणि सल्ला मिळेल, तसेच परदेशात असताना सर्वोत्कृष्ट मदत मिळेल ज्यात काही उच्च जोखीम असलेल्या देशांमध्ये प्रवास करताना जास्त सावधगिरी कशी बाळगावी हे सामील आहे. आपल्या सर्व कार्यस्थळांना शारीरिक सुरक्षेची किमान मानके तर पूर्ण करायलाच हवी त्याचबरोबर आम्ही आपल्या व्यावसायिक जोडीदारांना, पुरवठादारांना आणि कंत्राटदारांना सुद्धा अशीच व्यवस्था करण्यासाठी सांगतो.

जर तुम्ही व्यवस्थापक आहात, तर तुमच्या गटासमोर असलेल्या जोखमींचे व्यवस्थित मूल्यमापन करण्याची, तसेच त्यासाठी यथायोग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन आणि मदत उपलब्ध केले गेले आहेत का याची खात्री करणे ही तुमची अतिरिक्त जबाबदारी आहे.

### हे मला कसे लागू होते?

- जरी मी एखाद्या उच्च जोखीम असणाऱ्या देशात काम करत असलो/असले तरी, मला माझ्या स्थानिक सुरक्षा मार्गदर्शनांबद्दल माहीत आहे याची मी खात्री करतो/करते.
- जर माझ्या कार्यस्थळी एखादा आणीबाणीचा प्रसंग उद्भवला तर काय करावे हे मला माहीत आहे.
- मी नेहेमी प्रवास जोखमींसकट सर्व सुरक्षा जोखमी कमी करण्यासाठी पाउले उचलतो/उचलते आणि जोखीम आढळल्यास त्याबद्दल व्यवस्थापनाला सल्ला देतो/देते.
- माझ्या ताब्यात असलेल्या सुरक्षित सामान आणि उपकरणांची जबाबदारी माझी आहे याची मी खात्री करतो/करते.
- सामुग्री आणि उत्पादनांच्या अप-टू डेट आणि सविस्तर नोंदी ठेवण्याची मी खात्री करुन घेतो/घेते.

कंपनी

**व्यवसाय सातत्य व्यवस्थापन**

व्यवसाय सातत्य राखणे खूप महत्वाचे आहे आणि प्रत्येक कार्यस्थळासाठी एक असा व्यवसाय सातत्य प्लॅन तयार केलेला असायला हवा ज्याचे वार्षिक मूल्यमापन आणि चाचणी अशा व्यवस्थापन गटाद्वारे केली जाते ज्यांना सुरक्षा जोखमीच्या समस्यांना कसे हाताळायचे याचे प्रशिक्षण मिळालेले आहे. याबद्दल आणि किमान आवश्यक मानकांवर मार्गदर्शन कॉर्पोरेट सुरक्षा गटाकडून मिळू शकेल.

## कॉर्पोरेट सुरक्षा

पुढे चालू

### तुम्ही काय कराल?

**प्र. मला लवकरच एका व्यावसायिक प्रवासावर जावे लागेल आणि मला सांगण्यात आले आहे की निघण्यापूर्वी प्रवास सुरक्षा पडताळून पहा. असे का? माझे व्यवस्थापक मला नक्कीच असुरक्षित ठिकाणी तर पाठवणार नाहीतच?**

**उ.** नाही, तुमचे व्यवस्थापक मुद्दाम असे करणार नाहीत – पण काही देश किंवा जागा अशा असतात की जिथे अधिक सुरक्षा खबरदारी घेणे इष्ट असते आणि काही वेळा सुरक्षा-परिस्थिती फार लवकर बदलू शकते. आणीबाणीच्या प्रसंगी तुम्हाला काय करायला हवे, तसेच कॉर्पोरेट सुरक्षा विभाग किंवा स्थानिक सुरक्षा व्यवस्थापकांशी कसा संपर्क साधावा हे तुम्हाला माहीत आहे याची खात्री करून घ्यावी. प्रवास सुरक्षा मार्गदर्शनाचा संदर्भ घ्या, आणि अद्ययावत प्रवास सूचना आणि प्रतिबंध यांची माहिती ठेवा.

**प्र. एखादी अपरीचीत व्यक्ती तुमच्या कार्यालयात काम करीत आहे. त्यांच्याकडे अभ्यागत पास देखील नाही.**

**उ.** जर तुम्हाला असे कोणी दिसले ज्यांच्याकडे अभ्यागत पास नाही किंवा ज्यांच्या हालचाली संदिग्ध वाटत आहेत, तर त्यांना नम्रपणे विचारा की ते कोणाला भेटायला आलेले आहेत आणि तुम्ही त्यांची मदत करू शकता का. यानंतरही जर तुम्हाला संदेह वाटत असेल, तर तुम्ही त्यांना परत रिसेप्शनवर न्या. जर तुम्हाला तुमच्या सुरक्षिततेची काळजी वाटत असेल, तर त्या व्यक्तीच्या जवळ जाऊ नका आणि कार्यस्थळ सुरक्षा गटाशी लागलीच संपर्क साधा.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- मायजेएम सुरक्षा ज्ञान क्षेत्र साइट
- प्रवास सुरक्षा दिशा-निर्देश
- समूह सुरक्षा धोरण
- समूह सुरक्षा मॅन्युअल
- कार्पोरेट जोखीम आणि शाश्वती विभाग

# माहिती सुरक्षा

**जॉन्सन मॅथेची माहिती सुरक्षित आणि गुप्त ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.**

जॉन्सन मॅथेची माहिती आपल्या सर्व कामांसाठी फार महत्वाची आहे. आपण पाठवलेल्या ईमेल्स आणि आपली इतरांसोबत चर्चा ही सर्व माहिती कंपनीची बहुमूल्य संपदा आहे ज्याचे आपण काळजीपूर्वक जतन आणि व्यवस्थापन केले पाहिजे. जर आपण तसे केले नाही, आणि आपल्या माहितीला जोखमीत टाकले, तर अशाने प्रभावीपणे आणि सुरक्षितपणे काम करण्याच्या आपल्या क्षमतेवर प्रभाव पडू शकतो.

जॉन्सन मॅथेमध्ये आम्ही आपल्या मालकीची गुप्त माहिती, तसेच तृतीय पक्षाने आम्हाला दिलेली माहिती सुरक्षित ठेवतो जेणेकरून आमच्या हितांचे आणि आमच्या व्यासायिक जोडीदारांच्या हितांचे संरक्षण होते. आम्हाला परवानगी मिळाल्याशिवाय किंवा कायद्याने आवश्यक असल्याशिवाय आम्ही कोणतीही गुप्त माहिती उघड करणार नाही, आणि तसे केल्यास ती नियंत्रित पद्धतीने उघड करू.

**गोपनीय माहिती**

गोपनीय माहितीमध्ये आर्थिक माहिती, पेटंट, व्यवसाय किंवा विपणन नीति, भविष्यातील अंदाज, माहिती, पद्धती, सिस्टिम्स आणि प्रदर्शन, उत्पाद वर्णन आणि दर, उत्पादन आणि विस्तार क्षमता, ग्राहक आणि पुरवठादार व्यवस्था (करारातील नियमांसकट) आणि वैयक्तिक माहिती यासारख्या घटकांचा समावेश होतो. काही वेळा, गोपनीय माहितीमध्ये मालाचे नमुने किंवा प्रोटोटाइप उपकरणे यांचा समावेश होतो. तांत्रिक मजकूर असलेल्या गोपनीय माहितीला काही वेळा ट्रेड सीक्रेट (व्यापारी गोपनीयता) संबोधले जाते.





### माहिती सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा वापर

आपण ज्यासाठी जबाबदार आहोत किंवा जी आपल्याला विश्वासाने दिली आहे अशा माहितीला अनधिकृत हातांत पडू न देण्यासाठी, आपला युसर आयडी सुरक्षित ठेऊन, कठीण पासवर्ड निर्माण करून आणि सिस्टिम्सचा वापर जबाबदारीने करून आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

आपल्याला जेएमच्या सिस्टिममध्ये चुकून एखादा वायरस, मालवेअर किंवा स्पायवेअर यांचा प्रवेश टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि फक्त तेच कॉम्प्युटर हार्डवेअर, ॲप्लीकेशन आणि सॉफ्टवेअर वापरले पाहिजे जे जेएमच्या आयटी विभागाने अधिकृत केले आहेत. ईमेल मधील अटॅचमेंट्स उघडताना आणि लिंक्स वर क्लिक करताना आपण नेहेमी सावध असले पाहिजे आणि हा विचार केला पाहिजे की व्यावसायिक दृष्टिकोनातून या लिंक्सचा काही उपयोग आहे का, आणि या तुमच्या ओळखीच्या लोकांनी पाठवल्या आहेत का.

### निर्माण करणे, प्रवेश असणे आणि देखभाल करणे

नवीन माहिती निर्माण करताना किंवा ती इतरांना देताना आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. आपण ती कोणाला पाठवीत आहोत याचा विचार केला पाहिजे आणि याचा कसा अर्थ लावला जाईल – किंवा चुकीचा अर्थ लावला जाईल याचा ही विचार केला पाहिजे. जर आपण संवेदनशील माहिती निर्माण केली असेल, उदाहरणार्थ एखाद्या दस्तऐवजात किंवा ईमेलमध्ये, तर ही माहिती संवेदनशील आहे असे इतरांना सांगणे किंवा न सांगणे याचा निर्णय आपण घेतला पाहिजे.

माहिती वापरण्याजोगी हवी: ती अचूक असायला हवी, संघटीत असायला हवी आणि वर्तमानात आणि भविष्यात ती सहजपणे उपलब्ध असायला हवी. आपण व्यावसायिक रेकॉर्ड्स आणि वैयक्तिक माहिती सकट आपल्या सर्व माहितीचे व्यवस्थापन, संरक्षण, देखरेख कशी करतो आणि वासलात कशी लावतो याबद्दल असलेल्या सर्व संभाव्य कायद्यांची आणि नियामक नियमांची माहिती आपल्याला हवी.

### हे मला कसे लागू होते?

- मला एका ईमेलबद्दल शंका वाटते जी अनोळखी व्यक्तीकडून आलेली आहे किंवा अनपेक्षित विषयावर आहे.
- मी पासवर्ड गोपनीय ठेवतो/ठेवते आणि त्यांना अधिक मोठे आणि अधिक किचकट बनवतो/बनवते.
- मी फक्त सुरक्षित आयटीचा वापर करतो/करते.
- मी गोपनीय माहिती इतरांना देण्यासाठी वैयक्तिक ईमेल किंवा व्हॉट्सॲप आणि वीचॅट सारखे मंच वापरत नाही.
- मी कधीही वैयक्तिक किंवा गोपनीय माहिती दूरध्वनीवरून, व्यक्तिशः किंवा इतर कुठल्याही मार्गाने तोपर्यंत कोणालाही देत नाही जोपर्यंत मला नक्की माहीत नसते की ही माहिती कोणाला देण्यात येत आहे आणि त्या व्यक्तीला ही माहिती मिळण्याचा अधिकार आहे.
- मी माझ्या सहकाऱ्यांना सुरक्षित कार्य पद्धतींसाठी मदत करतो/करते आणि प्रोत्साहन देतो/देते आणि मला काही शंका असतील तर माझ्या व्यवस्थापकांना, कार्यस्थळाच्या सुरक्षा व्यवस्थापकांना किंवा जेएमच्या आयटी सेवा डेस्कला बोलून दाखवतो/दाखवते.
- मी स्वतः निर्माण केलेल्या डेटाच्या मूल्याचा विचार करतो/करते आणि त्यापर्यंत पोहोचण्यासाठी आणि देखरेखीसाठी योग्य ती नियंत्रणे लागू करतो/करते.
- मी माझ्या डेस्कवर संवेदनशील माहिती ठेवत नाही आणि नेहेमी घरी जाताना माझा लॅपटॉप कुलुपात ठेवतो/ठेवते.

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही एका आठवड्यासाठी रजेवर जात आहात. तुमच्या गैरहजेरीत तुम्ही वापरत असलेल्या ॲप्लीकेशन्समध्ये लॉग इन करण्यासाठी आणि ग्राहकांच्या महत्वाच्या ईमेल पाहाण्यासाठी तुमच्या अशा सहकाऱ्याला तुमचा पासवर्ड देणे योग्य आहे का ज्यांच्यावर तुमचा पूर्ण विश्वास आहे?**

**उ.** तुम्ही तुमचा पासवर्ड स्टाफमधील इतर कोणालाही कधीही देता कामा नये. जर तुम्हाला काळजी वाटत असेल की तुम्ही रजेवर असताना एखादा महत्वाचा ईमेल येईल, तर तुम्ही ग्राहकांना आधीच सांगून ठेवा की तुमच्या अनुपस्थितीमध्ये त्यांनी कोणाशी संपर्क साधावा, किंवा आउटलुक मध्ये तुम्ही एक 'नियम' तयार करू शकता जेणेकरून ईमेल तुमच्या सहकाऱ्यांना फॉरवर्ड केला जाईल.

**प्र. तुम्हाला एका पुरवठादाराकडून एक ईमेल मिळाला आहे ज्यात एका इनव्हॉइसचा उल्लेख आहे आणि त्याचे पेमेंट निराळ्या बँकेत करण्याची विनंती केली आहे. तुम्हाला त्या पुरवठादाराकडून पूर्वसूचना मिळालेली नव्हती त्यामुळे तुम्हाला कळत नाही काय करावे.**

**उ.** थांबा आणि विचार करा. हे सर्व अनपेक्षित आहे, त्यामुळे तुम्हाला शंका येणे रास्त आहे. लगेच तुमच्या व्यवस्थापकांना, कार्यस्थळाच्या सुरक्षा व्यवस्थापकांना किंवा जेएमच्या आयटी सेवा डेस्कला सांगा.



### या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:

- सचोटीने काम करणे
- अभिनव आणि सुधारणा
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

### अधिक सहाय्य आणि साधने

- मायजेएम सुरक्षा ज्ञान क्षेत्र साईट
- मायजेएम बौद्धिक संपदा विभाग साईट
- बौद्धिक संपदा विभाग
- समूह कायदेशीर
- माहिती सुरक्षा धोरण
- ग्राह्य वापर धोरण
- माहिती वर्गीकरण धोरण
- डेटा सुरक्षा धोरण

# बौद्धिक संपदा

**आम्ही आमच्या संशोधन आणि विकासामधील (R&D) गुंतवणुकींना मौल्यवान समजतो आणि त्यांचे रक्षण करतो.**

जॉन्सन मॅथेमध्ये आम्ही संशोधन आणि विकासामध्ये (R&D) नवीन उत्पाद, प्रक्रिया आणि व्यवसाय विकसित करण्यासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतो.

संशोधन आणि विकास आमच्या वाढीचा, तसेच जॉन्सन मॅथेच्या भावी यशाचा पायाच आहे. संशोधन आणि विकास कार्यक्रमांची निष्पत्ती, जसे नवीन आविष्कार, माहिती आणि प्रायोगिक डेटा यांना बौद्धिक संपदा (IP) म्हटले जाते. हे फार महत्वाचे आहे की आमच्या बौद्धिक संपदेची यथोचित व्यवस्था आणि संरक्षण व्हावे ज्याने जॉन्सन मॅथेची संशोधन आणि विकासामधील गुंतवणूक सुरक्षित राहील.

बौद्धिक संपदेला बौद्धिक संपदा अधिकार (आयपीआर) अन्वये संरक्षित केले जाऊ शकते उदा. पेटंट्स जे आमच्या गुंतवणुकीची सुरक्षा करतात; ट्रेडमार्क जे आमचे कार्पोरेटचे अस्तित्व आणि आमचे ब्रँड्स संरक्षित करतात; आणि कॉपीराइट जे आमच्या संवादाला संरक्षित करतात. या व्यतिरिक्त कायदा आमच्या व्यावसायिक गुपितांचे (ट्रेड सीक्रेट्स) आणि गोपनीय माहितीचे संरक्षण करतो.

आम्ही इतरांकडून अपेक्षा करतो की ते जॉन्सन मॅथेच्या आयपीआरचा आदर करतील आणि त्याचप्रमाणे आम्ही सुद्धा इतरांच्या वैधपणे नोंदणीकृत केलेल्या आयपीआरचा आदर करण्याचे, तसेच इतरांनी आम्हाला दिलेल्या गोपनीय माहितीचे संरक्षण त्याच प्रमाणे करण्याचे वचन देतो ज्याप्रमाणे आम्ही आमच्या गोपनीय माहितीचे संरक्षण करतो.

### हे मला कसे लागू होते?

- मी इतरांच्या आयपीआरचा आदर करतो/करते.
- सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या मजकुराला आणि चित्रांना वापरताना मी कोणाच्याही कॉपीराइटचे उल्लंघन करीत नसल्याची खात्री करुन घेतो/घेते.
- मी बौद्धिक संपदा विभागाला कळवतो/कळवते. जर मला कळले की आम्ही अशी बौद्धिक संपदा निर्माण केली आहे ज्याचे संरक्षण झाले पाहिजे, तर



## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही एका बाह्य जोडीदारासोबत एका एकत्रित प्रोजेक्टवर काम करीत आहात, ज्यात उत्प्रेरकांची निर्मिती केली जात आहे. या एकल कामाच्या करारामध्ये गोपनीयता बंधने सुद्धा आहेत. जेवणाच्या वेळी तुमची एक सहकारी तिला एका निराळ्या उत्प्रेरकांच्या निर्मितीच्या संबंधात येणाऱ्या समस्येचा उल्लेख करते, आणि तुम्हाला वाटते की ही समस्या तुम्ही आपल्या बाह्य सहकाऱ्यांकडून शिकलेल्या फॉर्मुलेशनच्या पद्धतीने सोडवली जाऊ शकते.**

**उ.** ती फॉर्मुलेशनची पद्धत आपल्या बाह्य सहकाऱ्यांची गोपनीय माहिती असू शकते. करारातील गोपनीयता बंधनांचा अर्थ बहुधा असा आहे की आपण या सहकार्यातून मिळालेल्या माहितीचे प्रकटीकरण किंवा तिचा उपयोग या सहकार्याच्या व्यतिरिक्त करू शकत नाही, अगदी जेएममध्ये सुद्धा. त्यामुळे, तुमच्या या सहकाऱ्याला या फॉर्मुलेशनच्या पद्धतीबद्दल सांगणे बहुदा करार भंग केल्यासारखे ठरेल. मार्गदर्शनासाठी बौद्धिक संपदा विभागाशी संपर्क साधा.

**प्र. तुम्ही नुकतीच जेएम मध्ये नोकरी धरली आहे. तुम्ही अशा प्रोजेक्टवर काम करीत आहात ज्यात केले जाणारे काम तुमच्या यापूर्वीच्या नोकरीमधील कामासारखेच आहे आणि तुम्हाला माहीत आहे की तुमच्या आधीच्या कंपनीने ही समस्या कशा प्रकारे सोडवली होती (त्यासाठी अनेक महिने संशोधन आणि विकासाचे काम करावे लागले होते). तुम्ही यासाठी केली जाणारी मेहनत वाचवून तुमच्या आधीच्या कंपनीमध्ये वापरलेला उपाय वापरू शकता का?**

**उ.** तुमच्या मागील नोकरीमधील विविक्षित माहितीचा वापर करणे बहुधा तुमच्या पूर्वीच्या नियोजकाशी असलेल्या तुमच्या गोपनीयता दायित्वाचे उल्लंघन ठरेल. तसेच, तुमच्या पूर्वीच्या कंपनीमधील उपायाबद्दल तुमच्या सहकाऱ्यांना सांगण्याने त्यांचे विचार 'दूषित' होतील, याचा अर्थ असा होऊ शकेल की आपण जो उपाय स्वतःच्या बुद्धीने शोधू शकत होतो तो उपाय जेएमला मिळू शकणार नाही. बौद्धिक संपदा विभागाशी संपर्क साधून त्यांच्याशी या माहितीच्या स्वरूपाबद्दल आणि तुमच्या दायित्वांबद्दल चर्चा करा.



**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- नाविन्य आणि सुधारणा
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- मायजेएम बौद्धिक संपदा विभाग साईट
- बौद्धिक संपदा विभाग
- तुमच्या क्षेत्र/व्यवसायासाठी बौद्धिक संपदा संरक्षण धोरण आणि गोपनीय माहिती धोरण

# व्यावसायिक आणि आर्थिक अहवाल सादर करणे

**जॉन्सन मॅथे कंपनीची लेखापुस्तके, नोंदी आणि आर्थिक अहवाल यांच्यामध्ये आमच्या व्यवसायाचे अचूक आणि प्रामाणिक चित्र प्रतिबिंबित होते आहे याची आम्ही खात्री करतो.**

आपण ज्यावर विश्वास करू शकतो असा आर्थिक डेटा केवळ आपल्या धोरणांच्या, बाह्य लेखा मानकांच्या आणि सर्व लागू कायदे आणि नियमांच्या पालनासाठीच गरजेचा आहे असे नाही, तर आपल्या व्यवसायाला वृद्धिंगत करण्यासाठी आणि आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी, सुज्ञपणे निर्णय घेण्यासाठी सुद्धा गरजेचा आहे.

### हे मला कसे लागू होते?

- मी प्रामाणिकपणाने आणि काळजीपूर्वकपणे खर्चाचे दावे आणि जेथे योग्य असेल तेथे टाइमशीट्स प्रस्तुत करतो/करते आणि हे सर्व जॉन्सन मॅथेच्या धोरणांशी सुसंगत असल्याची खात्री करतो/करते.
- कोणत्याही करारबद्ध वचनबद्धता ज्या मी जॉन्सन मॅथेच्या वतीने करतो/करते किंवा ज्या व्यवहारांना मी अधिकृत करतो/करते ते सर्व माझ्या अधिकृतता पातळीनुसारच असतात आणि तृतीय पक्षांसह व्यवहार करण्याच्या आपल्या धोरणांचे पालन करतात.
- जेव्हा मी जेएमच्या वतीने एखादी वस्तू किंवा सेवा विकत घेतो/घेते, तेव्हा जेएमला पैशाचा पूर्ण मोबदला मिळतो आहे, तसेच जिथे शक्य असेल तिथे मी निविदा मागवल्या आहेत याची सुद्धा मी खात्री करतो/करते.
- मी योग्य लेखापरिक्षण कालावधीत सर्व व्यवहारांची नोंद करतो, त्यांची पुष्टी देणारे पुरावे नोंदवतो/नोंदवते आणि हे सर्व जॉन्सन मॅथेच्या लेखापरिक्षण धोरणानुसार होते.
- अहवाल लिहिताना मी वस्तूनिष्ठ असतो/असते आणि ते सर्व संतुलित असल्याची आणि केवळ चांगले मुद्दे दर्शवत नसण्याची खात्री करतो/करते.



## तुम्ही काय कराल?

**प्र. वर्षाचा शेवट जवळ आलेला आहे आणि माझ्याकडे एका पुरवठादाराचा इनव्हॉइस आहे ज्याचे पैसे देणे आहेत. जर मी महिना संपण्याआधी याचे पैसे दिले तर माझे कार्यकारी भांडवलाचे लक्ष्य पूर्ण होणार नाही. मी महिना संपल्याची वाट पाहून नंतर याचे पैसे दिले तर चालेल का?**

**उ.** आपण इनव्हॉइसचे पैसे, याचा आपल्या कार्यकारी भांडवलावर काय परिणाम होईल यावर लक्ष न देता, जेव्हा देणे आहेत तेव्हाच दिले पाहिजेत. आपले एक पेमेंटचे धोरण असायला हवे जे सांगते की आम्ही इनव्हॉइसचे पेमेंट त्यांच्या नियत तारखेच्या नंतर जो पुढील पेमेंट “रन” होईल त्यात करू (साधारणपणे आपल्याला इनव्हॉइस मिळाल्यावर 60 दिवसांनंतर). त्यामुळे जर याची नियत तारीख महिन्याच्या शेवटच्या पेमेंट “रन”च्या आधी असेल, तर आपल्याला त्यांचे पैसे त्या पेमेंट “रन”मध्ये दिले पाहिजेत. जर त्याची तारीख महिन्याच्या शेवटच्या पेमेंट “रन”च्या नंतरची असेल, तर त्याचे पैसे पुढील पेमेंट “रन”मध्ये दिले जातील, जे पुढच्या महिन्यात होईल – याची खात्री केल्यावरच की असे करणे आपल्या अटी व शर्तींप्रमाणे आहे आणि असे करणे योग्य आहे.

**प्र. तुम्हाला एक इनव्हॉइस मिळाले आहे ज्याचे पैसे लगेच देणे आहे पण त्याची रक्कम तुमच्या अधिकारापेक्षा अधिक आहे आणि तुमचे व्यवस्थापक परदेशात आहेत. तुम्ही लगेच पैसे दिले नाहीत तर पुरवठादार कायदेशीर कारवाई करण्याची धमकी देत आहे. एका सहकाऱ्याने तुम्हाला सुचविले की आत्ता याचे पैसे द्यावे आणि नंतर तुमच्या व्यवस्थापकांना त्याची मंजूरी देण्यासाठी सांगावे.**

**उ.** पैसे देण्याआधी प्रत्येक इनव्हॉइस अधिकृत झालेला असला पाहिजे, त्यामुळे तुम्हाला तुमच्या सहकाऱ्याचा सल्ला मान्य करता येणार नाही. पण ही परिस्थिती असामान्य नाही आणि त्यामुळे जॉन्सन मॅथेच्या धोरणांशी सुसंगत असा उपाय यासाठी असू शकेल. जर परिस्थिती आणीबाणीची असेल, तर तुमच्या स्थानिक वित्त नियंत्रकांशी किंवा क्षेत्रीय वित्त संचालकांशी संपर्क साधा, त्यांच्याकडे अशी परिस्थिती हाताळण्यासाठी कार्यप्रणाली असेल.



**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- समूह नियंत्रण मॅन्युअल
- स्थानिक वित्त व्यवस्थापक किंवा वित्त नियंत्रक
- विभागीय वित्त संचालक
- समूह लेखांकन

# रेकॉर्ड्सची अचूकता

**आम्ही आमचे व्यावसायिक रेकॉर्ड आणि कुठलेही अहवाल सादर करण्याच्या बाबतीत प्रामाणिक आणि अचूक आहोत, मग ते दस्तऐवज किंवा रेकॉर्ड कोणालाही आणि कशासाठीही पाठवण्यात आलेले असो.**

हे फार महत्वाचे आहे की आपल्याकडे असलेल्या व्यावसायिक रेकॉर्ड्सवर, तसेच आपल्याला मिळणाऱ्या किंवा आपण देत असलेल्या अहवालांवर आपण विश्वास करू शकतो. जेव्हाही आपण कसलाही रेकॉर्ड तयार करतो (उदा. गुणवत्ता परीक्षण आणि उत्पाद निरीक्षणाचे परिणाम, टाइमशीट, एखाद्या प्रशिक्षणात लोकांची उपस्थिती किंवा माहिती गोळा करण्यासाठी आपण केलेली कामे), तेव्हा आपल्याला तो अचूकपणे आणि प्रामाणिकपणे तयार करायला हवा जेणेकरून आपण आणि इतर संबंधित व्यक्ती, ज्यात इतर कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार आणि शासकीय एजेंसी सामील आहेत, त्यावर अवलंबून राहू शकतो.

जर रेकॉर्ड्समध्ये आर्थिक लाभासाठी (कंपनीद्वारे किंवा लोकांद्वारे) किंवा इतर खाजगी लाभासाठी बदल केला गेला, तर ही फसवणूक ठरू शकते जो जेएम आणि/किंवा कर्मचाऱ्यासाठी एक गुन्हा आहे.

### हे मला कसे लागू होते?

- मी नेहेमी व्यावसायिक माहिती अचूकपणे, सचोटीने आणि वेळेवर रेकॉर्ड करतो/करते, जे सर्व लागू धोरणे, व्यावसायिक मानके आणि स्थानिक कायद्यांप्रमाणेच असते.
- मी कधीही खोटेपणाने किंवा अयोग्यपणे रेकॉर्डमध्ये बदल करत नाही किंवा मुद्दाम त्यातून खोटा प्रभाव पडेल असे होऊ देत नाही.
- मी दस्तऐवज धारण धोरणांच्या प्रमाणेच व्यावसायिक रेकॉर्ड्सना नष्ट करतो/करते किंवा खोडतो/ खोडते.



## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही गुणवत्ता विभागात काम करता आणि तुम्हाला सांगितले गेले आहे की चाचणीच्या प्रक्रियांपैकी एक अपेक्षित परिणाम देत नाही आणि त्याने वास्तविकता दर्शवली जात नाही आणि चाचणीचे परिणाम ग्राहकांसोबत ठरवलेल्या मर्यादेच्या बाहेर आहेत. तुम्हाला सांगितले गेले आहे की परिणाम जाणून घेण्याचा एक गणितीय मार्गसुद्धा आहे आणि त्याचे परिणाम ठराविक मर्यादेतच येतील, आणि तुम्हाला सांगितले जाते की तुम्ही त्याप्रमाणे आकडे रेकॉर्ड करावेत. तुम्ही काय करायला हवे?**

उ असे करणे खोटे रेकॉर्ड्स ठेवण्यासारखे होईल आणि तुम्ही हे करता कामा नये. जर चाचणीच्या प्रक्रियेमध्ये तसे परिणाम येत नाहीत ज्याबद्दल आपल्याला विश्वास वाटेल, तर ती प्रक्रिया बदलली पाहिजे आणि/किंवा ग्राहकांसोबत निराळ्या मर्यादा ठरवल्या पाहिजेत. तुम्हाला हे तुमच्या व्यवस्थापकांसमोर मांडायला हवे आणि जर तुम्ही त्यांच्या सोबतच्या संवादानंतर सुद्धा असंतुष्ट आहात, तर तुम्हाला **वाचा फोडली**पाहिजे.

**प्र. तुम्हाला जेएमच्या आयटी गटाला तुमच्या कामामध्ये ज्या डेटावर प्रक्रिया केल्या जातात त्याबद्दल माहिती देण्यास सांगितले गेले आहे. तुम्हाला कळत नाही की त्यांना ही माहिती कशासाठी हवी आहे आणि तुम्ही इतर कामात फार गुंतलेला आहात. काही आठवडे उलटल्यावर तुमच्या लक्षात येते की तुम्ही त्याचे उत्तर दिलेले नाही आणि तुम्ही पटकन तुमच्या आठवणीप्रमाणे, रेकॉर्ड्सची तपासणी न करता, एक उत्तर तयार करता.**

**उ.** ही परिस्थिती हाताळण्यासाठी असे करणे योग्य नाही. जर तुम्हाला माहीत नसेल की ही माहिती कशासाठी हवी आहे, किंवा अशा कामाला कसे प्राधान्य द्यावे, तर तुम्हाला जेएमच्या आयटी गटाकडून आणि/किंवा तुमच्या व्यवस्थापकांकडून स्पष्टीकरण मागायला हवे. जेएमच्या आयटी गटाला ही माहिती एखाद्या महत्वाच्या कारणासाठी (ज्यामध्ये एखाद्या नियामक संस्थेचा समावेश असू शकतो) पाहिजे असू शकते आणि ते तुम्ही दिलेल्या माहितीवर अवलंबून असू शकतात. जर तुम्ही अहवाल देताना घाई केली असेल, तर जेएमच्या आयटी गटाचे निर्णय चुकीच्या किंवा अपुऱ्या माहितीवर आधारलेले असू शकतात.

कंपनी

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- समूह कायदेशीर
- समूह नैतिकता आणि अनुपालन

# बाह्यतःसंपर्क साधणे

**आम्ही जबाबदारीने काम करतो आणि जेव्हा आपण आपल्या व्यवसायाबद्दल माहिती देतो, तेव्हा आपल्या कृतीच्या परिणामांना विचार करतो.**

बाह्य संपर्क प्रभावी, समतोल राखून, स्पष्ट आणि सुसंगत असायला हवा. आपल्या बाह्य संबंधितांशी केलेले संवाद पारदर्शक, थेट असावेत आणि चुकीचे किंवा दिशाभूल करणारे नसावेत.

जिथे जॉन्सन मॅथेला माहिती द्यायची असते जी अधिकृतपणे कंपनीचा स्वत:चा दृष्टिकोन दर्शवते (उदा. आर्थिक परिणाम किंवा समस्या व्यवस्थापन किंवा व्यावसायिक विकास), केवळ त्याच लोकांनी हे काम करावे जे लोक कंपनीसाठी बोलण्यास अधिकृत आहेत. या व्यतिरिक्त हे सर्व संवाद यथायोग्य प्रतिनिधींकडून पूर्व परवानगी मिळालेले असावेत.

कुठल्याही प्रायोजकत्वाचा ऑफर देताना किंवा कसलेही समर्थन करताना आपल्याला सावध असले पाहिजे. जर एखादी संस्था किंवा वस्तू जेएमच्या दृष्टी, नीति आणि मूल्यांशी सुसंगत नसेल तर अयोग्य निर्णय घेतल्याने आपल्या प्रतिष्ठेचेनुकसान होऊ शकते. नेहेमी सामाजिक गुंतवणूक धोरणातील मार्गदर्शनाचा संदर्भ घ्या.



जर तुम्हाला एखाद्या तृतीय पक्षाच्या उत्पादांचे किंवा सेवांचे समर्थन करण्यास विचारणा केली गेली आहे, तर तुम्हाला त्याचा नीट विचार केला पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे, असे करताना तुम्ही असे म्हणत आहात की त्या उत्पाद किंवा सेवांपासून जेएम संतुष्ट आहे आणि त्यांची शिफारस इतरांना करतील. दुसरी गोष्ट, जर आम्ही अशा समर्थनासीठी संमती दिली, तर आम्हाला याची खात्री करायला पाहिजे की तृतीय पक्षांने वापरलेले शब्द दिशाभूल तर करत नाहीत. विशेषकरून, समर्थनाचे शब्द अर्थाच्या दृष्टीने मर्यादित असायला हवेत, उदाहरणार्थ जर काम जॉन्सन मॅथेच्या यूके मधील क्लिथेरो साईटवर झालेले असेल, तर तसे स्पष्ट केलेले असायला हवे, शब्दांचा अर्थ असा व्हायला नको की संपूर्ण जेएम साठी काम केले गेले आहे. जर तुम्हाला काही शंका असतील, तर समर्थन करण्यासाठी संमती देऊ नका. जर तुम्हाला काही प्रश्न असतील, तर कृपया समूह कॉर्पोरेट संप्रेषणा विभागाशी संपर्क साधा.

### हे मला कसे लागू होते?

- जॉन्सन मॅथेच्या वतीने जेव्हा खास माहिती सांगण्यासाठी अधिकृतता दिली गेल्यावरच मी बाहेरील श्रोत्यांशी संवाद साधतो/साधते.
- मी जी माहिती देण्यासाठी अधिकृत नाही किंवा ज्या माहितीबद्दल बाहेर चर्चा करणे मला योग्य वाटत नाही त्यासाठी माझ्याकडे विनंती आल्यावर मी ती विनंती माझ्या व्यवस्थापकांना, समूह कॉर्पोरेट संप्रेषण विभागाला किंवा उत्तर देण्यास समर्थ अशा इतर लोकांना पाठवतो/पाठवते.
- मी जॉन्सन मॅथेबद्दल स्थानिक, राष्ट्रीय, वैश्विक किंवा उद्योगजगतातील प्रेसच्या लोकांना निवेदन देण्यापूर्वी समूह कॉर्पोरेट संप्रेषण विभागाकडून किंवा मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या इतरांकडून मंजुरी घेतो/घेते.
- मला प्रसार माध्यमांशी जॉन्सन मॅथेच्या वतीने बोलण्यासाठी नियुक्त केले असल्यास मी तसे करण्याआधी प्रसारण माध्यमांशी संवाद साधण्याचे प्रशिक्षण घेईन.

# बाह्यतः संपर्क साधणे

पुढे चालू

## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही एका परिषदेमध्ये आहात आणि एका पत्रकाराने तुम्हाला जॉन्सन मॅथेने नुकत्याच खरेदी केलेल्या कंपनीबद्दल विचारले. तुम्हाला याबद्दल थोडी माहिती आहे आणि तुम्हाला वाटते की तुम्ही त्या पत्रकाराच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास समर्थ आहात.**

उ. तुम्हाला या विषयावर बोलण्याची विशिष्ट अधिकृतता मिळाल्याशिवाय यावर प्रसारमाध्यमांशी बोलू नये, नम्रपणे प्रतिक्रिया देण्यास नकार द्यावा आणि स्थळ प्रवक्ता किंवा समूह कार्पोरेट संप्रेषण विभागाला प्रश्न विचारण्यास सांगावे.

**प्र. तुम्ही ज्यांच्यासोबत नियमित काम करता असा एक ग्राहक तुम्हाला जॉन्सन मॅथेच्या येणाऱ्या आर्थिक परिणामांबद्दल अनौपचारीक अपडेट्स विचारतो. तुम्ही ऐकले आहे की व्यवसाय व्यवस्थित चाललेला आहे आणि तुम्हाला वाटते की परिणाम चांगले असणार आहेत.**

उ. नम्रपणे स्पष्ट करा की तुम्ही जॉन्सन मॅथेकडून परिणामांची औपचारिकपणे घोषणा झाल्याशिवाय आर्थिक परिणामांवर प्रतिक्रिया व्यक्त करु शकत नाही.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- अभिनव आणि सुधारणा
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- माय जेएम समूह गुंतवणूकदार संबंध विभाग आणि कॉर्पोरेट संप्रेषण साईट
- समूह कॉर्पोरेट संप्रेषण
- साइट संप्रेषण प्रवक्ता

# सामाजिक माध्यमे

**आम्ही सर्व प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमांवर आम्ही केलेल्या पोस्टसाठी जबाबदार आहोत.**

सामाजिक माध्यमे आजच्या जीवनाचे सत्य आहेत, त्यांचा वापर मित्र आणि सहकाऱ्यांसोबत संपर्कात राहाण्यापासून नवीन लोकांना भेटणे किंवा ताज्या बातम्या मिळवण्यापर्यंत कशासाठीही होतो. तुम्ही ट्विटर, लिंक्ड-इन, फेसबुक, स्नॅपचॅट किंवा इतर कशाचे ही उपयोगकर्ते असलात, तरीही सामाजिक माध्यमांचा वापर जबाबदारीने करण्याची तुमच्याकडून अपेक्षा केली जाते. तुम्ही सामाजिक माध्यमांवर जे काही लिहीता, ते अनेक वर्षे सार्वजनिक राहू शकते, आणि त्याचा प्रभाव तुमच्या स्वतःच्या आणि  जेएमच्या प्रतिष्ठेवर पडू शकतो.

एक नवप्रवर्तन करणाऱ्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी जोडलेली कंपनी असल्यामुळे आपण आपल्या उद्योगजगतामधील विस्तृत संवादाचा एक नैसर्गिक भाग आहोत, आणि हा संवाद आपल्या जोडीदारांसोबत सामाजिक माध्यमांवर सुद्धा घडतो. आम्ही तुम्हाला नेहेमी त्या संवादाशी स्वतःला जोडण्यासाठी प्रोत्साहित करू, पण लक्षात ठेवा की तुम्ही जे पोस्ट करता त्याची जबाबदारी तुमचीच असते. तुम्ही कधीही गोपनीय माहिती उघड करू नये , किंवा असे काहीही बोलू नये ज्याने आमच्या प्रतिष्ठेला धोका असेल, किंवा संपूर्ण जॉन्सन मॅथेच्या वतीने बोलु नये.

सामाजिक माध्यमांवर वैयक्तिक आणि व्यावसायिक यामधील फरक कळणे अवघड असू शकते; पण हे लक्षात ठेवा की तुम्ही कुठल्याही भूमिकेतून जे पोस्ट करता, लाइक, रीट्वीट इत्यादी करता, ते धोकादयक असू शकते आणि दोन्ही प्रकारचे उपयोग आमच्या सामजिक माध्यम धोरणामध्ये येतात. जर तुम्हाला वाटते की तुम्ही या धोरणातील नियम मोडणारे काही पाहिले आहे, तर जेएम मधील योग्य व्यक्तींना ही माहिती देणे ही तुमची जबाबदारी आहे.

### हे मला कसे लागू होते?

- मी सामाजिक प्रसार माध्यमांवर माझ्या सर्व पोस्टसाठी जबाबदार आहे.
- मी बाहेर संवाद साधत असताना सारासारपणा आणि सर्वसामान्य जागरूकता बाळगतो/बाळगते.
- मी जे काही प्रकाशित करेन ते अनेक वर्षांपर्यंत सार्वजनिक राहणार असल्याची मला जाणीव आहे.
- मी इतरांच्या गोपनीयतेचे आणि जॉन्सन मॅथेच्या गोपनीय माहितीचे संरक्षण करतो/करते.
- मी सामाजिक माध्यमांवर कधीही जॉन्सन मॅथेच्या वतीने बोलत नाही.
- मला याची जाणीव आहे की आम्हा प्रत्येकावर जॉन्सन मॅथेची प्रतिष्ठा सुरक्षित राखण्याची जवाबदारी आहे.

## सामाजिक माध्यमे

पुढे चालू

### तुम्ही काय कराल?

**प्र. तुमच्या व्यवसायाची पुनर्बांधणी सुरू आहे आणि तुम्हाला होणारे बदल आवडलेले नाहीत. तुम्ही तुमच्या खाजगी फेसबुक खात्यावरून तुमच्या मित्रांना तुमच्या भावना कळवू इच्छिता.**

**उ.** जर तुम्हाला तुमच्या भावना फेसबुकच्या माध्यमाने सांगायच्या असतील, तर लिहीण्याआधी काळजीपूर्वक विचार करा. तुमच्या नियोजनाच्या परिस्थितीबद्दल काहीही सांगण्यापासून तुम्हाला थांबवणारे, तुमच्यावर निर्बंध आणणारे किंवा त्यात हस्तक्षेप करणारे असे काहीही आपल्या संहितेमध्ये नाही. तरीही, तसे करताना तुम्हाला इतरांच्या भावनांबद्दल विचार केला पाहिजे, तसेच आपल्या सामाजिक माध्यम धोरणातील माहितीसुद्धा लक्षात ठेवली पाहिजे. थेट तुमच्या व्यवस्थापकांशी किंवा मानव संसाधन विभागाशी तुमच्या शंकांबद्दल बोललेले अधिक योग्य ठरेल. लक्षात ठेवा की आपले धोरण सामाजिक माध्यमांच्या खाजगी आणि व्यावसायिक दोन्ही वापरांवर लागू होते.

**प्र. तुम्ही सामाजिक प्रसार माध्यमांवर जॉन्सन मॅथेशी संबंधित तंत्रज्ञान क्षेत्रावरील प्रतिक्रिया वाचलीत. तुमच्यामते तुमच्याकडे सांगण्यासाठी उपयोगी माहिती आहे.**

**उ.** आम्ही नेहेमीच तुम्हाला तुमच्या स्वतःच्या तसेच जॉन्सन मॅथेच्या प्रोफाईलला अधिक मजबूत करेल असे योगदान देण्यास प्रोत्साहन देतो. तरीही, लक्षात ठेवा की तुम्हाला फक्त सार्वजनिक रीत्या उपलब्ध असलेली माहितीच सांगितली पाहिजे. कामाबद्दल बोलणे आणि व्यावसायिक समुदायामध्ये संवाद साधणे योग्यच आहे, पण तुम्हाला दक्षता घेतली पाहिजे की तसे करताना तुम्ही गोपनीय माहिती किंवा बौद्धिक संपदा उघड करता कामा नये, आणि विशेषकरून हे सुद्धा महत्वाचे आहे की तुम्ही हे स्पष्ट करावे की तुम्ही तुमचे मत मांडत आहात, संपूर्ण जेएम चे नाही.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- माय जेएम कॉर्पोरेट संप्रेषण साईट
- सामाजिक माध्यम धोरण

# अंतर्गत माहिती

**आंतर्गत माहितीबद्दल आमची जबाबदारी आम्हाला नेहेमी कळते.**

आंतर्गत माहिती एक प्रकारची गोपनीय माहितीच असते जी नेमक्या विषयावर असते आणि जिला सार्वजनिकपणे उघड केलेले नाही, पण जर केले गेले असते, तर त्याचा जॉन्सन मॅथेच्या शेअर्सच्या किमतीवर मोठा प्रभाव पडला असता.

कर्मचाऱ्यांकडून अशी अपेक्षा केली जात नाही की त्यांना नक्की माहिती असेल की कुठली माहिती आंतर्गत माहिती आहे किंवा नाही, पण जर तुम्हाला शंका असेल, तर तुम्ही याबद्दल प्रकटीकरण समितीच्या (डिस्क्लोजर कमिटी) एका सदस्याला सांगितले पाहिजे (जे मुख्य कार्यकारी, मुख्य वित्तीय अधिकारी आणि कंपनी सचिव असतात). आंतर्गत माहिती मध्ये, उदाहरणार्थ, जॉन्सन मॅथेच्या व्यापारिक किंवा आर्थिक परिणामांशी संबंधित माहिती, त्यांच्या मिळकतीबद्दलचे अंदाज, इतर कंपनी खरेदी-विक्री करण्यासारखे व्यवहार किंवा त्यांच्या व्यवसायाबद्दल इतर मोठी बातमी, यांचा समावेश असू शकतो.

जॉन्सन मॅथेच्या आंतर्गत माहिती धोरणामध्ये आवश्यक प्रक्रिया दिलेल्या आहेत ज्याने खात्री होते की कर्मचारी आणि इतर लोक:

- संभाव्य आंतर्गत माहिती ओळखू शकतात;
- योग्य आंतरिक मार्गांद्वारे तो मुद्दा उपस्थित करू शकतात; आणि
- आंतर्गत माहितीचे संरक्षण आणि नियंत्रण करू शकतात.

जर तुमच्याकडे अशी माहिती आहे जी आंतर्गत माहिती असू शकते, किंवा ती भविष्यात आंतर्गत माहिती असण्याची शक्यता आहे, तर तुम्ही त्याबद्दल जॉन्सन मॅथेच्या प्रकटीकरण समितिच्या सदस्याला लगेच सांगितले पाहिजे. आंतर्गत माहितीचे आस्तित्व ओळखून त्यावर देखरेख ठेवणे, तसेच बाजारपेठेत तिला उघड करण्याची मंजूरी देणे ही या समितिची जबाबदारी आहे.

आंतर्गत माहिती तुमच्या अधिकारात असताना तुम्ही जॉन्सन मॅथेच्या शेअर्सची (किंवा इतर वित्तीय साधनांची) खरेदी-विक्री करू नये आणि तुम्ही ती आंतर्गत माहिती कुठल्याही तृतीय पक्षाला उघड करू नये किंवा त्यांना तसे करण्यासाठी उत्तेजन देऊ नये.

# अंतर्गत माहिती
पुढे चालू

**आपला व्यवसाय असलेल्या अनेक देशांमध्ये आंतर्गत व्यापार करणे हा एक गुन्हा आहे.**

आंतर्गत माहिती आपल्या अधिकारात असलेल्या कर्मचाऱ्यांनी खात्री केली पाहिजे की ती माहिती योग्य प्रकारे ठेवलेली, संरक्षित केलेली आणि व्यवस्थित ठेवलेली आहे, ज्याने गोपनीयता राखली जाऊ शकेल आणि याची ही खात्री केली पाहिजे की आंतर्गत माहितीपर्यंत अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश नाही.

आंतर्गत माहिती नसलेल्या अशा गोपनीय माहिती पर्यंत प्रवेश असलेल्या लोकांची एक गोपनीय यादी आम्ही तयार करून ठेवतो, जी माहिती भविष्यात आंतर्गत माहिती ठरू शकते. जर तुमचे नाव अशा गोपनीय यादीमध्ये असेल, तर जेएमच्या शेअर्सची खरेदी-विक्री करण्यासाठी तुमच्यावर निर्बंध असेल, यासाठी तुम्हाला पूर्व-मंजुरी घेणे गरजेचे असेल. जर तुमचे नाव गोपनीय यादीमध्ये घातले जात असेल आणि परिणामी तुमच्या शेअर्सच्या व्यवहारावर बंधने येणार असतील तर तुम्हाला त्याबद्दल सूचना मिळेल.

### हे मला कसे लागू होते?

- मी आंतर्गत माहिती हाताळत असताना जॉन्सन मॅथेच्या शेअर्समध्ये व्यवहार करीत नाही.
- मी अशी माहिती हाताळत असताना सुद्धा जॉन्सन मॅथेच्या शेअर्समध्ये व्यवहार करीत नाही जी भविष्यात आंतर्गत माहिती ठरू शकते, किंवा जर माझ्यावर शेअर्सच्या व्यवहारासाठी निर्बंध घातलेले असतील तर पूर्व-मंजुरी घेतल्याशिवाय मी शेअर्सचा व्यवहार करीत नाही.
- आंतर्गत माहिती हाताळत असताना मी तृतीय पक्षांना जॉन्सन मॅथेच्या शेअर्समध्ये व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देत नाही, विचारणा करीत नाही किंवा सूचना देत नाही.
- जर माझ्यासाठी लागू आहे असे माझ्या लक्षात आले तर मी जॉन्सन मॅथेच्या शेअर व्यवहार संहितेचे अनुसरण करतो/करते.
- मी बाजारपेठ गैरवर्तनासाठी किंवा ढवळाढवळीसाठी जॉन्सन मॅथेबद्दल चुकीची माहिती पसरवून चालना देत नाही.



## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही एका कंपनीच्या खरेदीवर काम करीत आहात आणि तुम्हाला माहीत आहे की याची घोषणा झाल्यानंतर जॉन्सन मॅथेच्या शेअर्सच्या किमतीवर खूप प्रभाव पडणार आहे आणि त्यामुळे तुम्हाला सूचना मिळालेली आहे की शेअर्सचा व्यवहार करण्यावरील निर्बंध तुमच्यावर सुद्धा लागू होतो. तुमचे वडील तुम्हाला विचारतात की त्यांनी जॉन्सन मॅथेच्या शेअर्समध्ये लवकरच त्यांनी गुंतवणूक करावी का?**

**उ.** तुम्ही कोणत्याही व्यक्तीला तुमच्याकडे असलेल्या आंतर्गत माहितीच्या आधारावर जॉन्सन मॅथेमध्ये पैसे गुंतवायचे का नाही हा निर्णय घेण्यास मदत करु शकत नाही. तुमच्या वडिलांनी स्वत: निर्णय घ्यायला हवा किंवा त्यांनी गुंतवणूक करावी अथवा नाही याचा सल्ला स्वतंत्रपणे घ्यायला हवा.

**प्र. तुमच्या भूमिकेचा एक भाग म्हणून तुम्हाला सार्वजनिकरित्या उपलब्ध नसलेल्या गोपनीय माहितीला हाताळण्याची संधी मिळते परंतु ती बाहेर माहीत झाल्यास तिचा जॉन्सन मॅथेच्या शेअर्सच्या किमतीवर काही परिणाम होईल का याची तुम्हाला शाश्वती नाही. तुम्ही काही दिवसातच रजेवर जाणार आहात आणि तुम्हाला त्या खर्चासाठी जॉन्सन मॅथेचे शेअर्स विकायचे आहेत.**

**उ.** तुम्ही कंपनी सचिवांकडून किंवा समूह कायदा विभागाकडून याबद्दल मार्गदर्शन मागू शकता की जी गोपनीय माहिती तुम्हाला हातळणी करण्याची अनुमति आहे, ती आंतर्गत माहिती आहे किंवा नाही. जर ती आंतर्गत माहिती असेल तर दुर्दैवाने तुम्ही तुमचे शेअर्स आत्ता विकू शकत नाही.



**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- सचोटीने काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- कंपनी सचिव
- समूह कायदेशीर



# पृथ्वी

मी जॉन्सन मॅथेच्या दीर्घकालीन व्यवसाय करण्याच्या महत्वाकांक्षेला पाठींबा देण्याचे वचन देत आहे.



पृथ्वी


| | |
|---|---|
| पुरवठा-साखळीची अखंडता | 78 |
| पर्यावरण | 81 |
| उत्पाद प्रबंधन | 83 |
| समुदाय गुंतवणूक | 85 |

# पुरवठा-साखळीची समग्रता

**आम्ही आमच्या पुरवठादारांकडून व्यवसायासाठी नैतिक आणि दीर्घकालीन दृष्टीकोनाची अपेक्षा करतो.**

आम्ही विकत घेत असलेला सर्व कच्चा माल आणि सेवा जिथून विकत घेत आहोत ते स्त्रोत सुद्धा जबाबदारीने आपले काम करत आहेत ही खात्री करणे हेच आमचे लक्ष्य आहे.

मानव अधिकार, श्रमिक कार्यपद्धती, स्वास्थ्य आणि सुरक्षा, पर्यावरण संरक्षण आणि व्यावसायिक नैतिकता याबद्दलच्या आमच्या आपल्या पुरवठादारंकडून असलेल्या अपेक्षा आमच्या पुरवठादार आचरण संहितेमध्ये स्पष्ट केलेल्या आहेत. विशेषकरून आम्ही इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन कोर कन्वेन्शन्स, युनायटेड नेशन्स ('यूएन') ग्लोबल कॉंपॅक्ट आणि द यूएन गायडिंग प्रिन्सिपल्स ऑन बिझनेस अँड ह्यूमन राइट्समध्ये परिभाषित केलेल्या तत्त्वांसाठी आमच्या सर्व पुरवठादारांकडून समर्थनाची अपेक्षा करतो. आम्ही आमच्या सर्व पुरवठादारांना त्यांच्या व्यावसायिक कार्यांसाठी लागू असल्यास पर्यावरण व्यवस्थापनासाठी ISO14001 प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रोत्साहन देतो.

आम्ही वैश्विक स्तरावर आधुनिक दास प्रथेच्या तसेच मानव तस्करीच्या समस्यांच्या समाधानासाठी बांधील आहोत आणि या समस्यांचे संकेत आमच्या उच्च जोखीम पुरवठा साखळ्यांमध्ये दिसत तर नाहीत याचे मूल्यांकन करण्यासाठी सुद्धा प्रतिबद्ध आहोत. सर्व लागू कायदेशीर आवश्यकतांप्रमाणे आम्ही याबद्दल एक वार्षिक सार्वजनिक प्रकटीकरण करतो.



आम्ही खालील गोष्टींसाठी बांधील आहोत:

- आमच्या नवीन आणि सध्याच्या पुरवठादारांसाठी पुरवठादार आचरण संहिता लागू करण्यासाठी.
- पुरवठादार आचरण संहितेचे अनुपालन सध्याच्या पुरवठादारंकडून होते आहे याचे पुनर्विलोकन करण्यासाठी आणि जिथे त्यांच्याकडून आवश्यकतांची पूर्तता होत नसेल तिथे त्यांना त्यांच्या व्यावसायिक पद्धती सुधारून देण्यात मदत करण्यासाठी.
- आमच्या संपूर्ण पुरवठा-साखळीमध्ये पुरवठादार आचरण संहितेच्या अनुपालनाची होत असलेली प्रगती पारदर्शकपणे आमच्या सर्व संबंधितांना कळविण्यासाठी.
- आमच्या ग्राहकांनी विकत घेतलेल्या उत्पादासाठी आमच्या पुरवठा-साखळीमधील दीर्घकालीन व्यवसाय पद्धतींबद्दल माहिती मागितल्यावर त्यांना तत्परतेने उत्तर देण्यासाठी.
- वैश्विक पातळीवर आधुनिक दास प्रथा आणि मानव तस्करीच्या निर्मूलणासाठी योगदान देण्यासाठी.

### हे मला कसे लागू होते?

- माझ्या सोबत पुरवठा-साखळीमध्ये काम करत असलेल्या लोकांना आमच्या पुरवठादार आचरण संहितेबद्दल माहीत आहे, तसेच हे सुद्धा माहीत असणे आहे की ही संहिता त्यांच्यावर कशी लागू होते याची खाली करणे माझी जबाबदारी आहे.
- मी जॉन्सन मॅथेच्या कुठल्याही भागामध्ये आधुनिक दास प्रथेबद्दल आणि इतर श्रमिकांसंबंधी गैरवर्तनांबद्दल मुद्दे उपस्थित करण्यासाठी जबाबदार आहे.
- जेएमच्या उत्पादांमधील कच्चा माल कुठून येतो यासंबंधी ग्राहकांच्या माहितीसाठी आलेल्या विनंत्यांना निश्चितपणे उत्तर देण्यासाठी मी जबाबदार आहे.

### तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही एका नवीन पुरवठादारासोबत काम सुरू करणार आहात पण तुम्ही एक वर्तमानपत्रातील लेख वाचता ज्यात लिहीले आहे की या पुरवठादाराच्या कंत्राटावरील कामगारांना पुरवठादारांकडून किमान पारिश्रमिक दिले जात नाही आणि त्या कामगारांना काम सोडून जाण्याची स्वतंत्रता देखील नाही.**

उ. पुरवठादार दास केलेले किंवा अनिच्छुक श्रमिक वापरत तर नाही ना याची खाली करण्यासाठी जॉन्सन मॅथे बांधील आहे. तुम्हाला तुमच्या व्यवस्थापकांकडे **वाचा फोडली** पाहिजे किंवा समूह कायदा विभाग किंवा समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाशी संपर्क साधला पाहिजे, जे याबाबतीत पुढील कारवाई करतील.

**प्र. एका ग्राहकाने तुमच्याशी संपर्क साधून जॉन्सन मॅथेच्या संघर्ष खनिजांच्या वापराबद्दल जाहीरनामा मागितला आहे. तुम्हाला काय करायला हवे?**

उ. जॉन्सन मॅथेआपल्या ग्राहकांसोबत तेवढीच पारदर्शिता ठेवण्यासाठी बांधील आहे जेवढी आम्हाला आमच्या पुरवठादारांकडून अपेक्षित आहे, आणि आम्ही अशा प्रकारच्या विनंतीचे उत्तर देण्यासाठी नेहेमीच तयार आहोत. आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये 'संघर्ष खनिजे' या शब्दाचा एक फार विविक्षित असा अर्थ आहे. ग्राहकाच्या विनंतीला यथायोग्य उत्तर कसे द्यावे हे जाणून घेण्यासाठी कृपया तुमच्या क्षेत्रीय दीर्घकालीन व्यवसाय गटप्रमुखांना किंवा समूह दीर्घकालीन व्यवसाय विभागाशी संपर्क साधा.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे
- एकत्रितपणे काम करणे
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- माय जेएम दीर्घकालीन योजना साईट
- मायजेएम समूह नैतिकता आणि अनुपालन साईट
- जेएमचे आधुनिक गुलामगिरी विधान
- समूह पुरवठादार आचरण संहिता
- समूह नैतिक आणि दीर्घकालीन खरेदी धोरण
- समूह स्थिरता
- समूह आणि स्थानिक मानव संसाधन विभाग
- समूह नैतिकता आणि अनुपालन
- समूह कायदेशीर

# पर्यावरण

**आपल्या लोकांचे आणि आपल्या पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी एक वैश्विक कंपनी या नात्याने आमच्यावरील जबाबदारीचे आम्हाला भान आहे.**

आपल्या व्यवसायाला सुरू ठेवण्याची ज्यांची भूमिका आहे अशा मर्यादित साधनांचे संरक्षण करणे, तसेच अशा प्रकारे काम करणे जेणेकरून ही साधने शक्य तेवढा अधिक काळ पुरतील, हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही किमानपक्षी सर्व लागू राष्ट्रीय, क्षेत्रीय आणि स्थानिक कायदे आणि नियमांचे पालन करीत काम करू. जिथे शक्य असेल, तिथे आम्ही आमचा पर्यावरणावरील प्रभाव कमी करण्यासाठी एक अधिक उच्च मानक लागू करू.

आमच्या व्यवसायमध्ये आम्ही जोखीमपूर्ण रसायने, पाणी आणि टाकाऊ माल यांना ओळखून त्यांचे व्यवस्थित व्यवस्थापन करतो. आम्ही घन आणि द्रव कचरा, तसेच वायुरुप उत्सर्जन कमी करण्याकडे शक्य तेवढ्या व्यावहारिकपणे पाहतो, त्यामुळे याची खात्री होते की आम्ही कोणत्याही परवान्याच्या किंवा कायद्याच्या अंतर्गत पूर्ण करण्यास अनिवार्य असलेल्या मर्यादांचे उल्लंघन करीत नाही.

### हे मला कसे लागू होते?

- मी कचरा किमान करतो/करते, सामुग्रीला शक्य असेल तेव्हा रिसायकल आणि पुनःवापर करतो/करते आणि फक्त तेव्हाच प्रवास करतो/करते जेव्हा गरजेचे असेल.
- मी माझ्या कार्यस्थळाच्या पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी आणि स्त्रोतांच्या उपयोगासाठी असलेल्या मानकांचे अनुसरण करतो/करते.
- मी उपकरणे नीट वापरतो/वापरते, आधारभूत संरचना राखतो/राखते आणि फक्त योग्यप्रकारे कॅलिबर केलेल्या आणि देखभाल केलेल्या सेन्सर्सचा आणि इतर संरक्षणात्मक उपकरणांचा उपयोग करतो/करते.
- मी प्लांटमध्ये किंवा प्रक्रियांमध्ये होणाऱ्या सर्व बदलांचे (किंवा संभाव्य बदलांचे) मूल्यांकन पर्यावरणात्मक, आरोग्य आणि सुरक्षा प्रभावाच्या आणि कायद्याच्या दृष्टीने करतो/करते.



## तुम्ही काय कराल?

**प्र. नवीन साइटच्या सुरु करण्यापूर्वी आधी तुम्हाला सांगण्यात आले की तुम्हाला प्रथम वायुरूप उत्सर्जन परवाना मिळवावा लागेल. परवाना मिळवावा लागत असल्याने साइट सुरु करण्यास उशीर होईल.**

उ. आपल्या साइटला किमानपक्षी लागू होणारे सर्व कायदे आणि नियम यांचे अनुपालन करायलाच हवे. त्यामुळे, सर्व नियामक परवाने हाती येईपर्यंत तुम्ही तिथे काम सुरू करू नये. तुम्हाला लगेच याबद्दल **सांगायला हवे** ज्याने वरिष्ठ व्यवस्थापनाला अतिरिक्त परवान्याची गरज असल्याची माहिती मिळेल.

**प्र. नियमित होणाऱ्या निरीक्षणाच्या दरम्यान घातक सामुग्री असलेला टँक निकामी होत असल्याचे तुमच्या लक्षात आले.**

उ. आम्ही आपली घातक सामुग्री जबाबदारीने हाताळण्यासाठी बांधील आहोत, ज्यात त्याचा उत्सर्ग टाळण्यासाठी सुरक्षित साठवण करणे सामील आहे. तुम्हाला तुम्ही पाहिलेल्या टँकच्या स्थितीबद्दल लगेच **सांगितले पाहिजे** जेणेकरून त्या टँकला एकतर दुरुस्त करता येईल किंवा बदलता येईल ज्याने लोकांचे आणि  पर्यावरणाचे संरक्षण होईल.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे
- नाविन्य आणि सुधारणा

**अधिक सहाय्य आणि साधने**

- माय जेएम ईएचएस आणि दीर्घकालीन योजना साईट
- ग्रुप इएचएस संचालक/व्यवस्थापक
- साईट आणि क्षेत्रीय ईएचएस व्यवस्थापक
- समूह स्थिरता

# उत्पादन प्रबंधन

**आम्हाला जाणीव आहे की आमची जबाबदारी उत्पादाच्या संपूर्ण जीवन-चक्रापर्यंत आहे.**

आम्ही आमच्या लोकांचे, उत्पादांच्या उपभोक्त्यांचे आणि पर्यावरणाचे संरक्षण सर्वात सुरक्षित रासायनिक उत्पादांच्या आणि प्रक्रियांच्या उपयोगामार्फत करतो ज्याने आम्ही पाहिजे असलेले तांत्रिक प्रदर्शन करू शकतो. आमची उत्पादन प्रबंधनाची बांधिलकी हा आमच्या दीर्घकालीनता नियोजनाचा महत्वाचा भाग आहे.

या बांधिलकीचा एक भाग म्हणून, आम्ही स्वीकार करतो की आम्ही वापरत असलेल्या आणि निर्माण केलेल्या सर्व रसायनांचे व्यवस्थापन जबाबदारीने केले गेलच पाहिजे. आमच्या ग्राहकांना आम्ही पुरवत असलेले उत्पाद, बहुधा अंतिम उपयोगकर्त्याला दिल्या जाणाऱ्या उत्पादाचा एक महत्वाचा भाग ठरतात. आम्ही स्वतःसाठी उच्च मानके स्थापित करतो: आमच्या ग्राहकांना याचा पुरावा हवा असतो की आम्ही आमच्या उत्पादांमधील सर्व प्रकारची जोखीम पूर्णपणे समजतो आणि हे सुद्धा, की त्यांचा उपयोग पूर्णपणे समजून, आम्ही त्यांना नंतरच्या जोखमी हाताळायला मदत करू शकतो.

याचा असा अर्थ होतो की आम्ही:

- आमच्या साइट्सवरील रसायनांशी संबंधित मानवी आरोग्य आणि पर्यावरणाला असलेल्या धोक्यांना ओळखतो आणि समजून घेतो.
- आमच्या साइट्सवरील रसायनांशी संबंधित असलेल्या जोखमीची माहिती स्पष्टपणे सांगतो.
- आमच्या उत्पादांसाठी जीवन-चक्र दृष्टीकोन बाळगतो, आणि संशोधन, विकास, व्यावसायीकरण आणि समाप्ति या प्रत्येक टप्प्यांवर पर्यावरणावर होणारे त्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणावर होणारे परिणाम मूल्यांकित करतो.
- घातक रसायनांना आणि उत्पादनांना तांत्रिक दृष्ट्या समान असलेल्या (किंवा अधिक परिणामकारक असलेल्या) परंतु सुरक्षित विकल्पांनी बदलण्याच्या संधी शोधतो.
- सर्व रसायन नियंत्रण अधिनियमांच्या पूर्ततेची खात्री करतो, जे आमच्या कार्यांना, खरेदींना, सामुग्री हाताळणी आणि पुरवठ्याला लागू होतात.

### हे मला कसे लागू होते?

- मी सुरक्षा चाचणी आणि नियामक आढावा पूर्ण केल्याशिवाय रासायनिक उत्पादांची खरेदी, उत्पादन किंवा पुरवठा करीत नाही.
- माझ्या कार्यक्षेत्रामध्ये हाताळल्या जाणाऱ्या रसायनांच्या जोखमी मला माहीत आहेत याची मी खात्री करतो/करते आणि याचीही खात्री करतो/करते की मी स्वतःच्या आणि माझ्या सहकाऱ्यांच्या संरक्षणासाठी सर्व सुरक्षा शिफारसींचे पालन करतो/करते.
- मी वास्तविक आणि संभाव्य असलेल्या रासायनिक उत्पादांच्या असुरक्षित हाताळणीच्या किंवा उपयोगाच्या परिस्थितींविषयी सतर्क असतो/असते आणि योग्य प्रकारे माझ्या शंका उपस्थित करतो/करते.

# उत्पादन प्रबंधन

पुढे चालू

## तुम्ही काय कराल?

**प्र. महत्वाचा कच्चा माल पुरविणारा एक पर्यायी पुरवठादार मिळाला आहे. ते काम करीत असलेल्या देशामधील रसायनांची नोंदणी करण्याच्या गरजा ते पुरवठादार पूर्ण करीत नसल्याबद्दल शंका पुरवठादार अर्हता प्रक्रियेमध्ये उपस्थित होत आहेत. जेएमसाठी त्या गरजा पूर्ण करणे आवश्यक नाही.**

**उ.** आम्ही सचोटीने कृती करण्यास बांधील आहोत, आणि यात आमच्या पुरवठा-साखळी मधील लोकांनी त्यांच्या नियामक अनुपालन गरजा पूर्ण करणे सामील आहे. आमचे ग्राहक सुद्धा हीच अपेक्षा ठेवतात. पुरवठादारांशी कायदेशीर गरजांबद्दल चर्चा करा. जर त्या गरजा खरंच लागू होत असल्या, आणि पुरवठादार त्या पूर्ण करू शकत नसले, तर आपल्याला पर्यायी पुरवठादार शोधायला हवा. आपण अशा पुरवठादारांसोबत व्यवहार करू शकत नाही जे कायद्यात **बसत नाहीत.**

**प्र. तुमच्या उत्पादन साईटवर एक नवीन निर्मिती प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, यात एक असा कच्चा माल वापरला जाणार आहे ज्याला हाताळण्याचा तुम्हाला मुळीच अनुभव नाही. पुरवठादार सुरक्षा डेटा शीटमध्ये याच्या धोक्यांबद्दल आणि याला सुरक्षितपणे कसे हाताळावे याबद्दल फारच मर्यादित माहिती आहे. उत्पादन सुरू करून माल पोचवण्याचे तुमच्या व्यवसायावर फार दडपण आहे.**

**उ. वाचा फोडा.** साईटवरील स्वास्थ्य आणि सुरक्षा ज्यांची जबाबदारी आहे त्या व्यक्तीला याची कल्पना द्या, त्यांनी याबद्दल संपूर्ण सुरक्षा माहिती उपलब्ध करुन द्यायला हवी जेणेकरुन आपल्या लोकांचे आणि पर्यावरणाचे आपल्या हाताळणीमुळे नुकसान होणार नाही याची खात्री होईल. जर पुरेशी माहिती नसेल, तर जेएमला सर्व जोखमी नीट समजून घेईपर्यंत सावधतेने काम केले पाहिजे.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे
- नवप्रवर्तन आणि सुधारणा
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- माय जेएम उत्पाद प्रबंधन साईट
- समूह ईएचएस व्यवस्थापन फ्रेमवर्क (यात संबंधित उत्पाद प्रबंधन आणि रासायनिक प्रभावन व्यवस्थापन धोरणे आणि मार्गदर्शन यांचा समावेश आहे)
- समूह उत्पाद प्रबंधन व्यवस्थापक
- साईट आणि क्षेत्रीय उत्पाद प्रबंधन आणि नियामक कामकाज गट

# सामाजिक गुंतवणूक

**आमचा असा विश्वास आहे की आमच्या समुदायामध्ये गुंतवणूक करणे हा आम्ही कार्यरत असलेल्या स्थळांबद्दलच्या सामाजिक वचनबध्दतेचा महत्वाचा भाग आहे.**

एक नियोजक म्हणून आम्ही स्थानिक समुदायांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्वाचे योगदान करतो, तसेच आर्थिक रूपाने आणि आमचा वेळ देऊन सुद्धा आम्ही त्यांच्या सोबत काम करतो आणि त्यांत गुंतवणूक करतो. आमच्या व्यवसायाच्या भावी वृद्धीच्या उद्देश्याने आम्ही तरुणांना विज्ञानाच्या क्षेत्रात करीअर करण्यासाठी प्रोत्साहित करतो. ही सर्व लक्ष्ये पूर्ण करण्यासाठी जॉन्सन मॅथे सर्व कामकाजांना एक  सामाजिक गुंतवणूक कार्यक्रम हाती घेण्यासाठी प्रोत्साहित करतात. आम्ही सर्व कर्मचाऱ्यांना सुद्धा स्थानिक समुदायांची मदत करणे आणि चांगल्या उद्दिष्टांसाठी पैसे उभारणे अशा कामांसाठी वेळ देण्यासाठी प्रोत्साहन देतो.



## सामाजिक गुंतवणूक
पुढे चालू

आमच्या सामाजिक गुंतवणूक धोरणात, आम्ही समर्थन करीत असलेल्या कार्यांचे आणि मदत प्राप्तकर्त्यांचे प्रकार दर्शवलेले आहेत, तसेच हे सुद्धा दिलेले आहे की कुठल्या अटी पूर्ण व्हायलाच हव्यात जेणेकरून आमचा दानधर्म आणि इतर योगदान जॉन्सन मॅथेच्या अधिक विस्तृत धोरणांच्या विरुद्ध जात नाही किंवा आमची प्रतिष्ठा डागाळीत नाही.

जेएम सर्व कर्मचाऱ्यांना वर्षाकाठी दोन दिवसांची रजा स्वयंसेवेच्या कामांसाठी देते, याचा तपशील आमच्या कर्मचारी स्वयंसेवा धोरणामध्ये दिलेला आहे. ही रजा जेएमच्या वर्ष 2025 पर्यंत एकूण 50,000 स्वयंसेवक दिवसांचे दीर्घकालीन व्यवसाय लक्ष्य पूर्ण करण्यासाठी वापरली जाऊ शकते.

या शिवाय, कर्मचाऱ्यांने उभ्या केलेल्या निधीमधून जेएम कडून प्रति व्यक्ती प्रतिवर्ष कमाल £1,000 (किंवा स्थानिक समतुल्य) एवढी रक्कम किंवा त्यांनी उभारलेल्या निधीएवढी रक्कम दिली जाते.

### हे मला कसे लागू होते?

- मला माहीत आहे की मला माझ्या साईटच्या सामाजिक गुंतवणूक कार्यक्रमांमध्ये सहभाग कसा घेता येईल आणि मला स्थानिक समाजामध्ये किंवा इतर दानधर्म करणाऱ्या संस्थांमध्ये किंवा एखाद्या दानधर्म करणाऱ्या संस्थेसाठी निधी गोळा करण्याच्या कामांमध्ये स्वयंसेवेच्या रूपाने योगदान देता येईल.
- मी या गोष्टीची खात्री देतो/देते की मी देणगी देण्यासकट कोणत्याही सामाजिक गुंतवणुकीचे वचन देण्याआधी समूह सामाजिक गुंतवणूक धोरण आणि कर्मचारी स्वयंसेवा धोरणाचे अनुसरण करतो/करते.
- मी खाजगी स्वरुपात करत असलेल्या सामाजिक किंवा राजकीय कार्यांमध्ये जॉन्सन मॅथेला सहभागी करत नाही.



## तुम्ही काय कराल?

**प्र. तुम्ही सहभागी असलेल्या एका देणगी संस्थेने विज्ञान शिक्षण संस्थेशी भागीदारी केली आहे आणि ती स्थानिक शाळेमध्ये विज्ञान मेळावा आयोजित करण्याचे नियोजन करीत आहे. तुम्हाला त्या मेळाव्यामध्ये स्वयंसेवक म्हणून जायचे आहे पण तो मेळावा कामकाजाच्या दिवशी आहे.**

उ. तुमच्या व्यवस्थापकांशी बोलून त्यांना कार्याची पार्श्वभूमी समजवा आणि तुम्ही सहभाग घेण्याची इच्छा बाळगत असल्याचे सांगून माय जेएम च्या माध्यमाद्वारे तुमची विनंती त्यांच्या मंजूरीने सहभाग घेण्यासाठी ऑनलाइन दाखल करा. किंवा, तुमच्या व्यवस्थापकांना किंवा मानव संसाधन विभागाला तुमच्या वतीने ऑनलााइन विनंती पूर्ण कराण्याची विनंती करा.

**प्र. तुमच्या साइटला आत्ताच जॉन्सन मॅथेने घेतले असून त्यामध्ये सामाजिक गुंतवणूक कार्यक्रम नाही. तुमची खूप इच्छा आहे की जॉन्सन मॅथेने तुमच्या समाजामध्ये चांगला प्रभाव पाडावा.**

उ. तुमच्या व्यवस्थापकांशी आणि समूह कॉर्पोरेट संप्रेषण विभागाशी असा एक कार्यक्रम सुरू करण्याबद्दल बोला. तुमच्या सहभाग घेण्याच्या इच्छेच्या तीव्रतेनुसार तुम्हाला कदाचित 'समाजाचा पुढारी' म्हणून नामांकन देण्यात रस असू शकेल जेणेकरून तुम्ही तुमच्या साईटवर सामाजिक गुंतवणुकीसाठी मुख्य संपर्क म्हणून काम करू शकाल.

**या विभागाशी संबंधित जॉन्सन मॅथेची महत्त्वपूर्ण मूल्ये:**

- लोकांचे आणि पृथ्वीचे संरक्षण करणे
- सचोटीने काम करणे
- नाविन्य आणि सुधारणा
- आपल्या कामाची जबाबदारी घेणे

**अधिक सहाय्य आणि साधने**

- समूह सामाजिक गुंतवणूक धोरण
- जॉन्सन मॅथे उत्तर अमेरिका सामाजिक गुंतवणूक स्वयंसेवक धोरण
- कर्मचारी स्वयंसेवा धोरण
- व्यवसाय साईट समाज विजेता
- समूह कॉर्पोरेट संप्रेषण

# संहितेतील विषय आणि धोरण मार्गदर्शिका

| संहितेचे विभाग | विषय | धोरणे आणि साधने |
|---|---|---|
| **लोक**<br>मी सुरक्षितपणे काम करण्याचे आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करण्याचे वचन देत आहे | आरोग्य आणि सुरक्षा | • समूह इएचएस धोरण<br>• समूह जीवन रक्षक धोरणे |
| | कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण | • एकलित कार्यासाठी समूह मानव संसाधन धोरण<br>• समान संधी समूह मानव संसाधन धोरण |
| | डेटा सुरक्षा | • डेटा सुरक्षा धोरण<br>• डेटा गोपनीयता नोटीस<br>• माहिती सुरक्षा धोरण |
| | मानव अधिकार | • एकलित कार्यासाठी समूह मानव संसाधन धोरण<br>• समान संधी समूह मानव संसाधन धोरण<br>• जॉन्सन मॅथे Plc आधुनिक दास प्रथा विधान<br>• जॉन्सन मॅथे पुरवठादारांची आचार संहिता |
| | हित-संबंधांतील संघर्ष | • हित-संबंधांतील संघर्ष धोरण<br>• स्थानिक भेटवस्तू आणि आदरातिथ्य नियम<br>• समूह खरेदी धोरण |
| **बाजारपेठ**<br>मी जवाबदारीने, नीतीपूर्णपणे आणि कायदेशीरपणे व्यवसाय करण्याचे वचन देत आहे | तृतीय पक्ष | • वैश्विक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण<br>• वैश्विक उच्च जोखीम व्यवहार धोरण आणि प्रक्रिया<br>• समूह आर्थिक गुन्हा आणि पैशांची अफरा-तफर विरोधी धोरण<br>• जॉन्सन मॅथे समूह व्यापार आणि निर्यात नियंत्रणे धोरण<br>• सर्व संबंधित संपूर्ण माहिती कार्यपद्धती<br>• जॉन्सन मॅथे पुरवठादारांची आचार संहिता |
| | लाच आणि भ्रष्टाचार | • वैश्विक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण<br>• वैश्विक उच्च जोखीम व्यवहार धोरण आणि प्रक्रिया<br>• तृतीय पक्ष मध्यस्थ जोखीम पुनर्विलोकन प्रक्रिया |
| | भेटवस्तू आणि आदरातिथ्य | • वैश्विक लाच आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण<br>• स्थानिक भेटवस्तू आणि आदरातिथ्य नियम |
| | प्रामाणिक स्पर्धा | • वैश्विक स्पर्धा कायदे धोरण आणि मार्गदर्शन<br>• तुमच्या व्यवसायासाठी जेएम स्पर्धा कायदे मार्गदर्शन |
| | आर्थिक गुन्हा | • समूह आर्थिक गुन्हा आणि पैशांची अफरा-तफर विरोधी धोरण |
| | व्यापार आणि निर्यात नियंत्रणे | • समूह व्यापार आणि निर्यात नियंत्रणे धोरण<br>• जॉन्सन मॅथे उत्तर अमेरिका आयात आणि निर्यात अनुसरण पत्रिका<br>• समूह हातामध्ये नेण्यायोग वस्तूंचे धोरण |

| संहितेचे विभाग | विषय | धोरणे आणि साधने |
|---|---|---|
| **कंपनी**<br>**मी जॉन्सन मॅथेचा ब्रँड, मालमत्ता आणि प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्याचे वचन देत आहे.** | कॉर्पोरेट सुरक्षा | • समूह सुरक्षा धोरण<br>• डेटा सुरक्षा धोरण<br>• माहिती सुरक्षा धोरण |
| | माहिती सुरक्षा | • ग्राह्य वापर धोरण<br>• माहिती सुरक्षा धोरण<br>• माहिती वर्गीकरण धोरण<br>• डेटा सुरक्षा धोरण |
| | बौध्दिक संपदा | • प्रकाशने मंजुरीची प्रक्रिया<br>• आविष्कार प्रकटीकरण फॉर्म दाखल करण्याच्या सूचना<br>• उद्योग / व्यवसाय बौद्धिक संपदा संरक्षण आणि गोपनीय माहिती धोरणे |
| | व्यावसायिक आणि आर्थिक अहवाल सादर करणे | • समूह नियंत्रण पुस्तिका<br>• अधिकारांचे समूह विधान<br>• स्थानिक समूहासाठी प्रवास आणि खर्च धोरणे |
| | रेकॉर्ड्सची अचूकता | • समूह नैतिकता आणि अनुपालन विभागाशी संपर्क साधा |
| | बाहेरून संपर्क साधणे | • बाह्य संपर्काचे धोरण |
| | सामाजिक माध्यमे | • सामाजिक माध्यमांसाठी मार्गदर्शिका |
| | अंतर्गत माहिती | • अंतर्गत माहिती धोरण<br>• जॉन्सन मॅथे शेअर डीलिंग कोड |
| **पृथ्वी**<br>मी जॉन्सन मॅथेच्या दीर्घकाळ टिकून राहण्याच्या धेय्याला समर्थन करण्याचे वचन देत आहे. | पुरवठा-साखळीची अखंडता | • जॉन्सन मॅथे Plc आधुनिक दास प्रथा विधान<br>• जॉन्सन मॅथे पुरवठादारांची आचार संहिता<br>• संघर्ष खनिजांवर जॉन्सन मॅथेचे प्रत्युत्तर |
| | पर्यावरण | • समूह इएचएस धोरण<br>• समूह जीवन रक्षक धोरणे<br>• ऊर्जा व्यवस्थापन धोरण P52<br>• समूह शाश्वत धोरण<br>• 2025 पर्यंतची शाश्वत व्यावसायिक लक्ष्ये |
| | उत्पादन प्रबंधन | • उत्पादन प्रबंधन धोरण<br>• समूह शाश्वत धोरण<br>• 2025 पर्यंतची शाश्वत व्यावसायिक लक्ष्ये<br>• नवोत्पादन परिचय (एनपीआय) - उत्पादन प्रबंधन धोरण<br>• प्रतिबंधित पदार्थ प्रबंधन (आरएसएम) धोरण<br>• जॉन्सन मॅथे पुरवठादारांची आचार संहिता<br>• समूह खरेदी धोरण<br>• तृतीय पक्ष मध्यस्थ जोखीम पुनरावलोकन प्रक्रिया |
| | सामाजिक गुंतवणूक | • सामाजिक गुंतवणूक धोरण<br>• जॉन्सन मॅथे उत्तर अमेरिका सामाजिक गुंतवणूक स्वयंसेवक धोरण<br>• समूह शाश्वत विभाग<br>• 2025 पर्यंतची दीर्घकालीन व्यावसायिक लक्ष्ये |

सर्व धोरणे माय जेएम वरील समूह नैतिकमूल्ये आणि अनुपालन साईटवर पाहिली जाऊ शकतात.

Johnson Matthey
Inspiring science, enhancing life